# वस्त्र-हरण

१९२८
म. ग्रं. मं. ठाणें
विषय
सं. नं.
REFBK-0003448
REFBK-0003448

प्रो० द. सी. पंगु, एम्. ए.

काव्य नं. ५३२
ना. ६२०१...

महानुभावपंथीय

पंडित दामोदर कविविरचित

# वच्छ-हरण

[ टीपा, स्पष्टीकरण, प्रस्तावना, शब्दकोश व भाषाशास्त्रविषयक परिशिष्टांसह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. 3448

लेखक
दत्तात्रेय सीताराम पंगु, एम्. ए.
मराठीचे प्रोफेसर—राजाराम कॉलेज, कोल्हापूर.

REFBK-0003448

प्रथमावृत्ति—१९२७

दीड रुपया

प्रकाशक
दत्तात्रेय सीताराम पंगु, एम्. ए.
राजाराम कॉलेज, कोल्हापूर.

[ सर्व हक्क स्वाधीन ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# अभिप्राय

[ गुरुवर्य प्रो० श्रीकृष्ण नीलकंठ चापेकर, एम्. ए., एल्एल्. बी., मराठीचे अध्यापक डेक्कन कॉलेज, पुणें.

" माझे प्रिय शिष्य-मित्र व कोल्हापूर येथील 'राजाराम कॉलेजां'तील मराठीचे अध्यापक प्रो० पंगू यांनीं संपादिलेल्या 'वच्छ-हरण' पुस्तकाचीं आगाऊ मुद्रितें पाहिलीं; शिवाय प्रस्तुत पुस्तक छापण्यापूर्वी, त्यांतील कांहीं दुर्बोध स्थळें, शब्दांचे अर्थ, पाठभेद वगैरेसंबंधींही त्यांच्याशीं मीं चर्चा केली होती. श्रीज्ञानेश्वरीपूर्वकालीन मराठी ग्रंथ विश्वविद्यालयाच्या उच्चतम परीक्षेच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट करण्याचा उपक्रम नुकताच सुरू होत आहे, अशा वेळीं, तत्संबंधाच्या नियत पुस्तकांवर साधारण विद्यार्थिवर्गास जास्त माहिती देणाऱ्या आणि तुलनात्मक अध्ययनाच्या बाबतींत मार्ग-दर्शक अशा टिपणांची विशेष उणीव भासणें अगदीं साहजिक व अपरि-हार्य आहे. ही उणीव अंशतः तरी दूर करण्याचें श्रेय, प्रो० पंगू यांनीं महानुभावपंथीय कवि दामोदर पंडित यांचें एम्. ए.च्या मराठी अभ्यास-क्रमांत लाविलेल्या 'वच्छ-हरण', या-सुप्रसिद्ध भागवती कथेच्या आधारें रचलेल्या-लहानसर पण फार रम्य अशा काव्याचें संपादन करून संपादिलें आहे असें मला वाटतें.

प्रो० पंगू यांनीं दिलेल्या टीपा, अर्थविवरण, तुलनात्मक अवतरणें, वगैरे मार्मिक, सूक्ष्म-विचार-परिश्रमदर्शक आणि विद्यार्थीवर्गास फार उप-युक्त अशा प्रकारचीं असून, त्यांवरून, काव्याचें रसिक व रहस्योद्ग्राही पद्धतीनें परिशीलन करण्याचीही त्यांची हातोटी उत्तम प्रकारें दिसून येते. व्यापक व प्रमाणभूत अशा मराठी कोशाच्या अभावीं, जुन्या शब्दांच्या व्युत्पत्ति आणि त्यांचे निश्चित अर्थ यांच्यासंबंधानें पुष्कळ संदिग्धपणा असणें अपरिहार्य आहे. तथापि मोल्स्वर्थचा मूल्यवान् जुना कोश व इतर संदर्भग्रंथ यांच्या साहाय्यानें ही अडचण कमी करण्याचा प्रो० पंगू

यांचा प्रयत्न बराच यशस्वी झाला आहे असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. शिवाय, समानार्थक स्थळांचे बाबतींत, संस्कृत व मराठी कवि या दोहोंच्याही ग्रंथांतील प्रसंगोपात्त अवतरणें दिल्यामुळें, एकीकडे संस्कृतचें वावडें अथवा 'कलिवर्ज्य' असणारा 'शुद्ध मऱ्हाठी'चा एकान्तिक अभिमानी, किंवा उलटपक्षीं विकासोन्मुख असणाऱ्या स्वतःच्याच मुलीच्या वाढत्या सौंदर्याचा, उत्कर्षाचा व अन्यकृत प्रशंसेचा मत्सर वाटणाऱ्या, अस्वाभाविक व निष्कारण स्वपराभवभीरु मातेप्रमाणें 'प्राकृत' वृत्तीचा 'संस्कृत' भाषाभिनिवेशी, या दोघांनाही एक प्रकारें उपालंभगर्भ उत्तरच मिळालें आहे. आणि वास्तविक पहातां मराठी भाषेच्या पीठिकेच्या व त्याचप्रमाणें खऱ्या काव्यरसिकतेच्या दृष्टीनें, संस्कृत व मराठी यांचा कधींही विभक्तपणा असणेंच शक्य नाहीं.

प्रो० पंगू यांची प्रस्तावनाही वाचनीय व उद्बोधक अशीच आहे. तिच्यांतील महानुभावपंथ व प्रस्तुत कवि यांचें त्रोटक इतिहासात्मक समालोचन आणि प्रस्तुत काव्यकर्त्याच्या काव्यरचनेच्या विशेषादिकांचें केलेलें सुश्लिष्ट विवेचन हे दोन्ही भाग आणि पुस्तकाच्या शेवटीं जोडलेलीं शब्दकोश व प्राकृत भाषेच्या ठोकळ नियमांचीं परिशिष्टें विद्यार्थ्यांस फार उपयुक्त होतील यांत शंका नाहीं.

प्रो० पंगू हे डेक्कन कॉलेजांतूनच मराठी व संस्कृत घेऊन बी. ए. व एम. ए. झालेले आहेत. तेव्हां आत्मीयत्वाच्या नात्यानें त्यांच्या या प्रयत्नाबद्दल मला विशेष साभिमानकौतुक व आनंद वाटणें साहजिक आहे. म्हणून त्यांच्या या प्रयत्नाबद्दल मनःपूर्वक संतोष व्यक्त करून व उत्तरोत्तर अशीच वाढत्या योग्यतेची पुष्कळ वाङ्मयसेवा त्यांच्या हातून दीर्घकाळ होत राहो असें इच्छून, मी हें अभिप्राय-लेखन पुरें करितों."

पुणें
ता. १६।१।२७.

श्रीकृष्ण नीलकंठ चापेकर.

# उपोद्‍घात

प्रस्तुत काव्यग्रंथ इ. सन १९२७ व १९२८ या दोन्ही वर्षी एम्. ए.च्या परीक्षेस नेमिला आहे. सर्वसाधारण रसिक वाचकांस व विशेषतः वरील परीक्षेचा अभ्यास करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस याचा चांगला फायदा घेतां यावा व जुन्या वाङ्मयासंबंधीं आदर वाढावा या बुद्धीनें या ग्रंथाची एक सर्वांग-परिपूर्ण अशी आवृत्ति काढावी असें गेल्या ऑगस्टमध्यें माझ्या मनांत आलें, व तोच विचार बळावत जाऊन, त्या वेळीं हयात असलेले प्रस्तुत ग्रंथाचे संशोधक प्रसिद्ध वाङ्मयभक्त रा॰ रा॰ विनायक लक्ष्मण भावे यांजकडे अशा प्रकारची आवृत्ति काढण्याबद्दल मत व परवानगी मीं विचारली. त्याही सद्‍गृहस्थांनीं प्रोत्साहनपर पत्र पाठवून, आपलें अनुकूल मत व परवानगी असल्याचें कळविलें. इतक्या गोष्टी अत्यंत आनंददायक आणि सुखकर झाल्या. परंतु वरील गोष्ट होऊन दोनतीन आठवडे होतात, तोंच रा॰ रा॰ भावे यांच्या दुःखदायक निधनाची बातमी येऊन धडकली. केवळ त्यांचें प्रोत्साहन म्हणून मीं तें काम पुढें चालू केलें व संपविण्याचा निश्चय केला. अत्यंत खेदाची व दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ही आवृत्ति पाहण्यास रा॰ भावे आज नाहींत. ते असते तर त्यांच्या कृपादृष्टीचा लाभ मिळून हें पुस्तक याहीपेक्षां सरस व परिपूर्ण झालें असतें, यांत शंका नाहीं. असो; ईश्वरेच्छा बलीयसी असें म्हटल्यावांचून येथें गत्यंतरच नाहीं.

वच्छहरणाचा कर्ता पंडित दामोदर हा महानुभाव पंथाचा अनुयायी होता हें सर्वविश्रुत असल्यानें, त्या पंथाची व त्याची थोडीबहुत हकीकत येथें देणें अस्थानीं होणार नाहीं, असें वाटतें. अशा प्रकारची विस्तृत हकीकत कै॰ भाव्यांच्या 'सारस्वता'च्या नवीन आवृत्तींत व भाव्यांच्या 'वच्छ-हरणा'च्या प्रस्तावनेंत आली असून त्यांतून जरूरीपुरता थोडाफार भाग उद्धृत करण्याचें मीं योजिलें आहे. 'सारस्वत' हा मराठीमध्यें प्रमाणग्रंथ झाला असून त्याबद्दल मराठी रसिक कै॰ भाव्यांचे ऋणी आहेत. त्यांच्या वच्छहरणाच्या आवृत्तीची प्रस्तावनाही अत्यंत मार्मिक आहे.

असो; सुमारें आठशें वर्षांपूर्वी गुजराथ देशामध्यें त्रिमल्लदेव नांवाचा राजा राज्य करीत होता. विशालदेव नांवाचा ब्राह्मण त्याचा प्रधान होता. त्रिमल्लदेवास पुत्रसंतान नसल्यानें त्यानें आपलें सर्व राज्य विशालदेवास दिलें. या विशालदेवासही पुष्कळ दिवस संतान नव्हतें. पण पुढें श्रीदत्तात्रेयस्वामींच्या कृपेनें त्यास एक पुत्र झाला. त्याचें नांव हरपाळ असें ठेविलें. हरपाळ मोठा होऊन सुखानें राज्य करूं लागला, पण त्याला द्यूतक्रीडेचा भयंकर नाद लागला व त्यांत तो सर्व गमावून बसला. अखेर तो जुवा खेळण्यास अत्यंत आतुर होऊन आपली सुशील भार्या कमलादेवी इजकडे तिचें द्रव्य होतें तें मागूं लागला. कमलादेवीनें दिलेलें सर्व या नादापायीं नाहींसें झालें व हरपाळदेव कफल्लक होऊन कमलादेवीच्या मागें त्याचा पुन्हा ससेमिरा लागला. सामदानादि सर्व प्रकार फुकट गेल्यावर हरपाळदेव एके दिवशीं फारच हट्ट घेऊन बसला. नवऱ्याचा हा नाद पाहून कमलेस फार वाईट वाटलें. तिनें त्यास झिडकारून लावलें व तो बळजबरीनें अंगावरचे दागिने काढून घेईल असें पाहून ती त्यास म्हणाली, " हे दागिने मला देतां येणार नाहींत, व ते घेणें पाप आहे. ते माझ्या बापानें माझ्या अंगावर घातल्यामुळें त्यावर तुमचा व माझा दोघांचाही हक्क नाहीं." बायकोच्या तोंडून असले कठोर व निर्भर्त्सनापर शब्द ऐकून हरपाळ रागानें म्हणाला, " तूं दागिने देणार नाहींस तर ते मिळाल्याशिवाय मी अन्नग्रहण करीन तर श्रीगोपालकृष्णाची शपथ आहे." नवऱ्याची ही शपथ ऐकून कमलादेवीनेंही दागिने न देण्याबद्दल श्रीकृष्णाच्या पायाची शपथ वाहिली. नवराबायकोच्या या झग्याची हकीकत हरपाळदेवाचा बाप विशालदेव व आई माल्हणदेवी यांच्या कानांवर जाऊन, त्यांनीं हा हट्ट सोडण्याविषयीं त्या दोघांस पुष्कळ प्रकारें सांगितलें. अखेर आपला एकुलता एक मुलगा उपोषण करणार त्यापेक्षां त्यास द्रव्य द्यावें हें बरें असा विचार करून विशालदेवानें हरपाळदेवास त्या दिवशीं द्रव्यही दिलें व तो दिवस कसा तरी निभावून नेला. पण यापुढें हरपाळाचे मनांत एक तऱ्हेची उद्विग्नता आली व त्याची आनंदी वृत्ति जाऊन तो दिवसेंदिवस उदास दिसूं लागला.

पुढें एके दिवशीं हरपाळाच्या मनांत रामटेक येथें यात्रेस जाऊन श्री-

रामाचें दर्शन घ्यावें असें आलें व त्यानें ही गोष्ट आपल्या आईस कळविली. शत्रूंचा जास्त सुळसुळाट आहे तर हरपाळानें जाऊं नये असा प्रधानानें सल्ला दिला. पण हरपाळाचा फारच हट्ट पडला. शेवटीं बरोबर हत्यारबंद रजपूत देऊन आईनें त्याची रवानगी केली. अशा रीतीनें यात्रेनिमित्त निघाला असतां वाटेंत त्याची व त्याच्या लोकांची चुकामूक पडली. हरपाळदेव रामटेकचा रस्ता सोडून ऋद्धिपुराकडे गेला, व तेथें पोंचला (ही गोष्ट शके ११०७ विश्वावसुनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १५ स घडली ) ऋद्धिपुरास हरपाळदेवानें गोविंद प्रभू नांवाच्या अयाचितवृत्तीनें राहणाऱ्या पंडितांची गांठ घेतली. तेथें असतांनाच गोविंद प्रभूनें त्यास मंत्रोपदेश दिला व त्याचें नांव " चक्रधर " असें ठेविलें. त्यानेंही आपलें 'हरपाळ' हें नांव सोडून देऊन तो आपणास 'चक्रधर' असें म्हणवूं लागला.

अशीं कांहीं वर्षें गेल्यावर चक्रधरानें आपला विवाह केला व हा लग्नसमारंभ औरंगल शहरांतील कमळ नाईक नांवाच्या ब्राह्मणाच्या मुलीशीं शके ११२२ रौद्रनाम संवत्सरे ज्येष्ठ शुद्ध ७ मीस गोरजमुहूर्तावर मोठ्या थाटानें झाला. व नूतनपत्नी हंसांबा व चक्रधर हीं दोघें संसारसुख अनुभवूं लागलीं

पुन्हा थोडीं वर्षें लोटल्यावर चक्रधरानें वैराग्याचे भरांत तें गांव सोडलें व तो पुन्हा देशपर्यटणास व तीर्थयात्रेस निघाला.

पर्यटण करीत असतां चक्रधर अचळपुरास ( इलिचपूर ) आला. तेथें रामदेऊराऊ दरणा म्हणून एक संस्थानिक होता, त्याची व चक्रधराची गांठ पडून त्यानें त्यास आपल्या नगरास नेलें, व चक्रधरास तेथेंच कांहीं दिवस ठेवून घेतलें.

रामदेऊ दरणा यानें श्रीचक्रधरास आपलें एकुलतें एक कन्यारत्न स्वीकारण्याबद्दल एके दिवशीं विनंति केली. पुष्कळ विनवण्या केल्यानंतर चक्रधरानें त्याचें म्हणणें कबूल केलें व लागलीच राजानें वैशाख शुद्ध २ स आपली कन्या उमादेवी हिचें चक्रधराशीं लग्न लाविलें. अशा तऱ्हेनें गृहस्थाश्रमांत तीन वर्षें घालविल्यावर श्रीचक्रधराचें मन संसाराकडून पुन्हा फिरलें, व तो पुन्हा उदासवृत्तीनें राहूं लागला. उमादेवी ऊर्फ गौरीदेवी इनें त्याची समजूत घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण व्यर्थ ! त्याची उदासवृत्तीही जाईना व गौरीदेवीचें म्हणणेंही त्यास मान्य होईना. अशा

स्थितींत असतां चक्रवर हा चंद्रभागेंत जलक्रीडा करण्यास गेला व त्या नादांत तो खोल पाण्यांत जाऊन पाहतां पाहतां दिसेनासा झाला. नदीकांठच्या लोकांनीं "महाराज बुडाले" अशी ओरड केली. गौरीदेवीस ही बातमी कळतांच तिनें सभोंवतालच्या लोकांस "हें खरें कां ?" म्हणून विचारलें व लोकांनीं 'खरें' म्हणून सांगतांच तिनें जमिनीवर धाडकन् अंग टाकलें, व तिचें चैतन्य विलयास गेलें. इकडे चक्रधर कांठास लागून नदीबाहेर आला व त्याला गौरीच्या निधनाची दुःखवार्ता समजली व तो अगदीं विरून गेला. यापुढें त्यास बिलकुल करमेनासें झालें व तें स्थान त्याला स्मशानवत् भासूं लागलें व म्हणूनच तें स्थळ सोडून तो निघून गेला. अशा विदेह स्थितींत हिंडत चक्रधर अल्पस्थानीं भोगावतीचे कांठीं आला व तेथें त्यास श्रीदत्तात्रयाचें दर्शन घडलें व त्याच ठिकाणीं शके ११८५च्या कार्तिकांत त्यानें संन्यासदीक्षा घेतली आणि यानंतर तो शिष्यसंप्रदाय वाढवून उपदेश करीत हिंडूं लागला.

श्रीचक्रधराच्या मठांत तो फिरतीवर असतांनाही त्याची सर्व व्यवस्था नीट आंखलेली असे. निरनिराळीं कामें शिष्यमंडळीकडे वांटून दिलेलीं असत. उदाहरणार्थ—आमंत्रणें देणें, बाजारहाट करणें हें **नागदेवाचार्य** करी.

गृहस्थाश्रम सोडून संन्यासदीक्षा घेतल्यावर चक्रधर धर्मोपदेश करीत सर्व देशभर संचार करी. उत्तरेकडे प्रचार करून त्यानें आपला पंथ पसरला व तो दृढमूल केला. हें करीत करींत व हिंडत तो बदरिकाश्रमाकडे गेला. बरोबरच्या शिष्यमंडळीस तो ठिकठिकाणीं ठेवीत गेला. त्याचा श्रेष्ठशिष्य नागार्जुन हा त्याच्याबरोबर हिमालयापर्यंत होता, पण त्यासही मागें ठेवून चक्रधरस्वामी निघून गेला. त्याचें पुढें काय झालें याची प्रत्यक्ष माहिती कोणासही नाहीं. चक्रधरानें हिमालयाकडे जातांना नागदेवाचार्यास वर्तनक्रमाबद्दल उपदेश केला तो केशवराजसूरींनीं आपल्या 'मूर्तिप्रकाश' ग्रंथांत ग्रथित केला आहे.

श्रीचक्रधरमहाराजांनीं काढलेल्या या पंथास 'महानुभाव' पंथ ऊर्फ 'महात्मा' पंथ ऊर्फ 'जयकृष्णीय' पंथ ऊर्फ 'अच्युत' पंथ अशीं नांवें दिलेलीं आढळतात. याच्या यात्रापरिभ्रमणाची नोंद 'लीलाचरित्रांत' आहे. सिद्धान्तसूत्र-

पाठ वगैरे अनेक मानभावी धर्मग्रंथ प्रथम मराठी भाषेंत व बालबोधी लिपींत लिहिले गेले, पण पुढें हे ग्रंथ सांकेतिक लिपींत लिहिले गेले. ही लिपी राघव ऊर्फ खळव्यास यानें कल्पून बसविली. या लिपीस 'सकळ लिपी' असें म्हणतात. पुढें दुसरे संकेत निघून, सातआठ लिप्या निर्माण झाल्या.

महानुभावपंथाच्या व आमच्या धर्मतत्त्वांत फारसा फरक नाहीं. परमेश्वर निर्गुण, निराकार असून तो कृपावशें साकार होतो; परमेश्वराहून अन्य दैवतें खालच्या पायरीचीं आहेत असें ते म्हणतात. माया ही निर्गुणाला सगुणत्व आणते, जीवाला जीवत्व आणते म्हणजे जीवाकडून सर्व व्यापार करविते असें ते म्हणतात. मनुष्य पूर्वकर्मानुसार फळें भोगतो व कर्मानुसारच चतुर्विध कर्मफलास पावतो.

महानुभावपंथी लोक दशावतार कबूल करतात, पण त्यांपैकीं श्रीकृष्णावतारासच पूर्ण अवतार मानतात. परमेश्वराचे गुण व अंश श्रीकृष्णावतारांतच एकवटलेले आहेत व तोच सर्व प्रकारें अत्यंत पूज्य आहे.

वच्छ-हरणामध्यें 'भणे मुनि केशवराजु' असा उल्लेख जवळ जवळ चार पांच वेळ आला आहे, त्यावरून या ग्रंथाचा कर्ता 'केशवराज' असावा असा वाचकांचा समज होतो व तसेंच भासविण्याचा उद्देश या ग्रंथाचे खरेखुरे कर्ते पंडित दामोदर यांचा होता हें खालील आख्यायिकेवरून दिसून येतें.

केशवराज हा पैठणाजवळचा राहणारा. हा प्रसिद्ध कवि गोपाळपंडित याचा लहान भाऊ. यानें रचलेले पंधरा सोळा ग्रंथ उपलब्ध आहेत. "मूर्तिप्रकाशा"-चा उल्लेख मागें आलाच आहे. पंडित दामोदर हा केशवराजाचा एक आप्तसंबंधी होता. दामोदराच्या बायकोचें नांव हिरांबा. हीं दोघेंही गंगाकांठीं आपल्या गांवीं राहत. तेथें नागदेवाचार्य सहज आले असतां, शके ११९४ मध्यें त्या दोघांनीं त्यांचा उपदेश घेतला. नागदेवाचार्यांच्या उपदेशानें नवऱ्यापेक्षां बायकोचेंच मन जास्त विरक्त झालें व संन्यास घेऊन "आचार्यांकडे जाण्याबद्दल ती आपल्या नवऱ्यास विनवूं लागली." "त्या पुत्रांचे विवाह व शिक्षण झाल्याशिवाय मला संन्यास घेतां येणार नाहीं." असें पंडित दामोदरानें उत्तर दिलें व नागदेवाचार्यांकडे तिला एकटीलाच जाण्यास त्यानें सांगितलें. हिरांबा म्हणाली, "मी एकटी कैसी जाऊं सको! तुम्ही मज सांगातें चाला." बायकोचा जास्तच आग्रह आहे असें पाहून

दामोदर तिला नागदेवाचार्यांकडे घेऊन गेला. पंडितांनीं तिच्या संन्यस्त-वृत्तीची खाली करून दिल्यावर व नवराबायकोचीं निग्रहाचीं भाषणें ऐकून नागदेवाचार्यांनीं तिला दीक्षा दिली व ज्ञानोपदेशश्रवणासाठीं तिला आपल्याजवळ ठेवून घेतली.

इतकें झाल्यावर दामोदर पंडित आपल्या घरीं निघून गेले व त्यांनीं पुत्राचें अध्ययन व विवाह केला. या कृत्यानें आपला नवरा संसारपाशांत जास्त गुरफटला आहे असें समजून हिरांबेनें त्यास " जिये चुलीची क्षिरू खादली तियेची चुलीची आतां राखू काई खाल पा " अशा अर्थाचा निरोप पाठविला. हा निरोप ऐकून दामोदर पंडितांस अनुताप होऊन ते तात्काळ नागदेवाचार्यांकडे आले. भेटीक्षेम झाल्यावर पंडितानें त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं संन्यास घेतला. हिरांबेनें धर्मबंधुत्वाच्या नात्यानें पंडितांना नमस्कार केला. यापुढें पंडित कायमचे भिक्षावृत्तीनें राहूं लागले.

पंडित दामोदर हा जसा विद्वान् होता तसाच गायनपटुही होता. सारा वेळ हा आपल्या प्रेमळस्वरगायनानें ईश्वरास आळवीत असे. परंतु त्यास नागदेवाचार्यांनीं गाण्याची बंदी केली, त्यापासून त्यानें उघडपणें गाणें बंद केलें नेहमींची गाण्याची संवय न सुटल्याकारणानें पंडित एके दिवशीं मधुर कंठानें ईश्वरचरित्र गात असतां नागदेवाचार्य तेथें आले. आचार्य आल्याचें भान न राहून ते तसेच गात राहिले. त्या वेळीं ते " आणिका बोलना : न लगो श्रवणा : रुपु तरी नयनां : आवडो तुझे : तूंची परदेव इतुले मी जाणें : बहुतेचि विघ्नें झांकौळितीती : धृ० : जीवे मी न कदा : विसंबे बा तुज : हेंचि देइ मज : गोविंदु राजा : २ : निरंतरीं करो तुझेचि स्मरणा : हेंचि एॐ मना : गोविंदु राजा : ३ : आणिके बुजवितां : डिंभू न बुझावे : मातेलागीं रोवें : ते कां अपराधि : ४ : माझी से न सांडी : आर्तांचा तूं दानी : नागदेवास्वामी : चक्रधारा : ५ ! " हें पद गात होते. या प्रेमळ गाण्यानें आचार्यांनाही तंद्री लागली व त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहूं लागले. त्यांनीं पंडिताची पाठ थोपटली व केलेली मनाई रद्द करून गाण्याची आज्ञा केली.

याच्या या गायनपटुत्वामुळें व विद्वत्तेमुळें केशवराजाचा व पंडिताचा विशेष स्नेह असे. वच्छ-हरणग्रंथांत दामोदरानें 'केशव पंडिताचें'

नांव घातलें आहे आणि केशव पंडितानें आपल्या 'रत्नमाला' स्तोत्रांत दामोदर पंडितांचें नांव घातलें आहे. अशा रीतीनें दोघांनींही आपले ग्रंथकर्तृत्व लपवून परस्पराचा सन्मान केला आहे. वच्छहरणांतील 'भणे मुनि केशवराजु' ही शेवटची ओंवी ऐकल्यावर पंडिताची स्त्री हिरांबा म्हणाली "माझी माता घरी वांझिरू : निराभिवाणी अहंकारू" हें ऐकून पंडित म्हणाले, 'हो ही आमची चुकी झाली', व ते त्या ओंवीवर हरताळ फासूं लागले. यावर केशवराजसुरी म्हणाले, "परस्त्री संतापाचा ज्वरू: न भोगी ऐसा नाहीं नरू : एक पंडित दामोदरू : वाचौनिया :" व त्यास लिहिलेली ओंवी खोडूं दिली नाहीं. तेव्हां हल्लीं ग्रंथाचे शेवटीं असलेली ओंवी ( ५०३ ) दामोदरानें लिहिली व ग्रंथ समाप्त केला. अशा तऱ्हेनें दोघांचींही नांवें ग्रंथांत आलीं आहेत.

हा ग्रंथ प्रथम छापतांना कै० भाव्यांनीं तो अस्सलबरहुकूम छापिला आहे. त्यांना सांपडलेली या ग्रंथाची पोथी शके १४९७ मध्यें लिहिली असावी असें त्यांचें म्हणणें आहे. पोथींत शब्द तोडलेले नव्हते ते कै० भाव्यांनीं आपण प्रसिद्ध केलेल्या आवृत्तींत तोडले आहेत, व मीही फारसा फरक न करतां त्यांच्या आवृत्तीबरहुकूमच मूळग्रंथ छापिला आहे. वच्छहरणाची ग्रंथसंख्या ५०५ आहे असे उल्लेख आहेत. आमच्या उपलब्ध ग्रंथांत ५०३ ओंव्या आहेत. २ ओंव्या लिहितांना गळल्या असाव्या. मला तरी एके ठिकाणीं संशय येतो. ओंव्या ५१–५४ मध्यें "श्रीकृष्ण नवरसांचें निधान आहे" याचें वर्णन करतांना वीररस सोडून बाकीच्या आठ रसांचेंच वर्णन आलें आहे, व ५५ व्या ओंवींत मात्र 'ऐसें नवरसुं नाटकुः देॐ खेळे जनमोहकु ॥" असा उल्लेख आला आहे. यावरून श्रीकृष्णाच्या वीररसवर्णनाचा भाग गळला असावा, असें वाटतें.

वच्छ-हरण हें काव्य श्रीमद्भागवताच्या दशम स्कंधातील १२।१३ व १४ या अध्यायांच्या आधारें लिहिलें आहे. या कथानकावर लिहिलेलें हें जरी अगदीं पहिलें काव्य असलें, तरी अशा प्रकारचे प्रयत्न पुढें झालेच नाहींत असें म्हणवत नाहीं. वामनपंडितांच्या 'वनसुधा' व 'ब्रह्मस्तुति' या स्फुट प्रकरणांवरून तशा प्रकारचा कांहींसा प्रयत्न झाला आहे असें दिसतें. पुढें दिलेल्या स्पष्टीकरणामध्यें वच्छहरणाच्या कांहीं ओंव्यांना

समानार्थक म्हणून वामनपंडितांच्या वनसुधेंतील श्लोक दिले आहेत. त्यावरून वाचकांची याबद्दल खात्री होईल.

वच्छहरणाची मराठी भाषा प्राकृताच्या पुष्कळशी जवळची आहे. यांतील आंगवण, अंतुरी, आंदोळणें, आधाडा, आपणपें, उगाणणें, उजुकार उपसाहणें, कामारें, कीळ, खेवण, घणवट, चोखाळ, जोहर, तेसणें, थडी, थोकडे, दिघडा, दी, निन्हां, नरिाजन, परगुणें, पंधरे, परिया, पवाडा, पसाय, पांतिकर, पाहुणेर, बागडें, बांदोडी, बीजें, भांगार, मरगज, मौवाळ, यातायात, वडप, वेध, साउमा, से, सोवाणे, हरित, हातिरूं, क्षुद्रघंटिका इ० शब्द ज्ञानेश्वरीप्रमाणेंच यांत आले आहेत. त्याचप्रमाणें उन्मेख, खेवण, टिकलग, थोकडे, नव्हाळी, पडळ, पाणियाडे, पालख, बहकणें, मोकाट, वरिपडा, वोडवों, पंधर इ० शब्द अनुक्रमें—अन्मेख, खेवनी, ठीकलग, तोकडे, नवाळी, पढळ, पाणिअेडा, पालखत, बाहकणें, मोकार, वरिवडें उ॰डउ॰, पव्हर अशा थोड्याशा निराळ्या स्वरूपांत म्हणजे प्राकृताच्या पद्धतीवर असलेले आढळतात. बैकार, तडवा, पुडुरा, ओतवरा, रापदाळिआ, मालगंठी, फूटा, परिवट, देशसाया, सांगडी, सोनेखैरी, रोंवणे, कूकें, फडतरीं, ताराण, साटका, हुंबर इ० शब्द ज्ञानेश्वरींतही न आलेले असे आहेत. 'वांचौनि' 'पासौनि' हे शब्द जरी ज्ञानेश्वरीप्रमाणेंच येथें आले आहेत तरी त्यांच्या मागें ज्ञानेश्वरीप्रमाणें द्वितीया किंवा षष्ठी न येतां प्रथमा विभक्तीच आलेली आढळून येते ही चाल जुनी दिसते पहा ओंवी " तों वांचौनि " (४९) " तूं एक वांचौनि " (४३७). त्याचप्रमाणें विशेषणाची व नामाची एकच विभक्ति घालण्याची चाल संस्कृतावरून घेतलेली दिसते. पहा—'चोरां शंखा' (३५०), 'भूतां ग्रामां' (३९३) याबद्दल अे व ओ किंवा वो बद्दल उ॰ लिहिण्याचीही चाल प्राचीनच दिसते. दिक्पाळु हा शब्द दिग्पाळु असा लिहिलेला आढळतो (ओंवी ३६४). शशी सिरणें हा खेळ कोणता होता, त्याचप्रमाणें पीतांबर किंवा रेशमी वस्त्राबद्दल प्रसिद्ध असणारा मालगंठ देश असावा व तो असल्यास कोणता व कोठें होता हें समजत नाहीं. बैकार, निशानि, दाखाळा इ० शब्द मुसलमानी असावे असें सकृद्दर्शनीं वाटतें; पण प्रस्तुत ग्रंथाच्या रचनाकाळीं रामदेवराव जाधवाची राजवट असल्यामुळें तसा संभव दिसत नाहीं. 'तगर' व 'डोडपणें' हे शब्द ठगर व दोड्डु या कानडी

शब्दांवरून आले असावे. 'साटकेचे अग्निस्तंभन' ही कल्पना किंवा 'एक टेकितु महि-बळें पावळी', 'थडिवा चरावेआं टेंकिलीं', 'मी असैनु श्रीकृष्णा तुझा होता' अशा तऱ्हेचीं वाक्यें जुन्या रचनेचीं निदर्शक आहेत.

पंडित दामोदरानें शके ११९४ मध्यें महानुभवपंथ स्वीकारला व तो पुरंदर मार्गानें वैरागराकडे गेला व तिकडेच त्याचें देहावसान शके १२२६ चे सुमारास झालें. यावरून ११९४ ते १२२६ याचे दरम्यान 'वच्छ-हरण' हा ग्रंथ रचला गेला असावा. केशवराजसूरीनें शके १२०७ मध्यें लिहिलेल्या रत्नमालास्तोत्रांत पंडित दामोदराचा उल्लेख केला आहे. यावरून ११९४ ते १२०० या मधल्या काळांत हा ग्रंथ रचिला गेला असावा. वरील शकांवरून व भाषेच्या आणि शब्दांच्या विवरणावरून हा ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या पूर्वीं लिहिला गेला असें सिद्ध होतें.

कै० भाव्यांना उपलब्ध झालेली वच्छ-हरणाची पोथी शके १४९७ मध्यें लिहिलेली असावी असें त्यांचें म्हणणें आहे. यावरून वच्छ-हरण रचल्यावर दोनतीनशें वर्षांनीं त्याची प्रत कोणीतरी केलेली असावी. कोणत्याही ग्रंथाची प्रत करीत असतांना ती मुळाबरहुकूमच होईल अशी खात्री देतां येत नाहीं. प्रत काढणाऱ्याच्या नजरचुकीनें पुष्कळ भाग गळूनही, कदाचित् मूळ ग्रंथ-काराचें हस्ताक्षर न लागल्याकारणानें व त्याची स्वतःची लिहिण्याची पद्धत अगदींच निराळी असल्यामुळें पुष्कळ प्रमाद घडतात, व मूळग्रंथाचें खरें स्वरूप कायम रहात नाहीं. पुढें आणखी असें होतें कीं, त्या प्रतीवरून पुन्हा प्रत काढणारेही वरील प्रकारच्या चुका करतातच. यावरून प्राचीन पुस्तकांत अपपाठ दृष्टीस पडल्यास त्यास जबाबदार कोण याचा उलघडा होत नाहीं. प्रस्तुत पुस्तक शके १२०० च्या सुमारास लिहिलें गेलें असें मानलें तर त्याची प्रत कोणीतरी १४९७ त काढली असावी. पुन्हा त्याची प्रत शके १८४६ मध्यें कै० भाव्यांनीं करून छापली. अशा रीतीनें पुस्तक दोघांतिघांच्या हातून गेल्यामुळें तें वरील दोषांस अपवादात्मक आहे असें म्हणतां येत नाहीं. आपणवे (९३), निरोपसु (३५७), अन्मीखें (७३), नावती (४८३), वटे (४२३), हे शब्द पाहिले म्हणजे वाचणाराची किंवा लिहिणाराची चूक झाली असली पाहिजे असें वाटतें. ग्रंथकाराच्या स्वतःच्या—

हातची प्रत मिळाल्याशिवाय पाठभेद किंवा अपपाठ यांचा उलघडा होणें शक्य नाहीं.

काव्यदृष्ट्या वच्छ-हरणाचें स्वरूप अत्यंत मनोहर आहे. कर्त्याच्या बुद्धीचे नवनवोन्मेष जागजागीं येथें पहावयास मिळतात. एकाद्या कवीनें कोणत्या तरी कथेच्या आधारें आपलें काव्य रचलें असतां त्यास निव्वळ भाषांतऱ्या म्हणून आपणांस चालणार नाहीं. तीच कथा आपल्या भाषेंत सांगत असतां कवि जे उपमा, उत्प्रेक्षादि अलंकार योजतो त्यावरून त्याची कविता-शक्ति किंवा प्रतिभा अजमावण्यास पुष्कळ जागा असते. पंडित दामोदरांनीं भागवती कथेच्या आधारें जरी प्रस्तुत काव्य रचलें असलें तरी त्यांत त्यांच्या प्रतिभेचा उठाव उत्कट रीतीनें स्पष्ट दिसून येतो. हरिकथेबद्दल लिहितांना ते म्हणतात:—

**जैसी कुलस्त्रिअेची गुणसंपत्ती : भोगावी एकेंचि पतीं ॥**
**तैसी हरिकथारसीं रती : भक्ता वांचौनि नाहीं ॥ २ ॥**

पहिल्या ओळींत दिलेली उपमा अनुरूप असून हरिकथेसंबंधीं इतरांपेक्षां भक्तालाच जास्त गोडी असते हें उत्कट रीतीनें सिद्ध झालें आहे. अशा प्रकार-च्या उपमांनीं कवीच्या कथ्यास विशेष भव्यता येते. आपल्या ग्रंथांतील जो गुण आहे तो थोडा जरी असला तरी त्याकडे वाचकांनीं लक्ष्य द्यावें अशा बुद्धीनें सज्जन वाचकांचा स्वभाव सांगून त्याचें स्पष्टीकरण पंडित दृष्टान्तानें करितात:—

**"जो चंद्रु चकोरां चें जीवन : अमृतें नीववी त्रीभुवन ॥**
**तो हीं गुणें एकें नीराजन : मानी कळावंतु ॥ २३ ॥**
**तैसे सकल गुणभरितु : परमानंदैक निरतु ॥**
**तो तोकडेआं हीं परगुणां संतु : संतोखतीं ॥ २४ ॥**

संतजनांना दिलेलें चंद्राचें साम्य व मनुष्याच्या अंगांतील असणाऱ्या गुणांस दिलेलें निरंजनाचें साम्य नवीन व बुद्धीस पटणारें असून 'गुण' या शब्दांवर नकळत झालेली कोटि हृदयंगम वाटते.

अशा तऱ्हेचीं उदाहरणें पुष्कळ देतां येतील. परंतु याहीपेक्षां दामोदरां-च्या प्रतिभेचा किंवा वर्णनशैलीचा बहर आपणांस त्यांच्या या छोट्या

काव्यांत दोनतीन ठिकाणीं दृष्टीस पडतो. त्यांच्या पंथाच्या तत्त्वाप्रमाणें श्रीकृष्ण हा त्यांचा देवाधिदेव होता, व त्याचें वर्णन करतांना त्यांनी इतकी एकतानता होते कीं, कितीही चांगले शब्द योजले तरी त्यांची तृप्ति होत नाहीं. त्यांच्या कवित्वशक्तीला त्यांच्या उज्ज्वल भक्तीची व प्रसादाची जोड मिळाल्याकारणानें तिला एकप्रकारचें अभिनवरमणीय स्वरूप प्राप्त झालें आहे. त्यांच्या उत्तम वर्णनापैकीं श्रीकृष्णरूपवर्णन हें एक असून तें त्यांनीं दोन ठिकाणीं केलें आहे. पहिल्या प्रथम ७९ ओंवीपासून दिलेलें वर्णन थोड्या संकुचित स्वरूपांत असून २१८ ओंवीपासून दिलेलें श्रीकृष्णवर्णन त्याच्या आयुधालंकारावयववर्णनाच्या अंतर्भावानें विस्तृत व व्यापक झालें आहे. मृदुल, मंजुल व मधुर वर्णनाला तशाच प्रकारची शब्दयोजना करण्याचें दामोदरांचें चातुर्य पाहिलें म्हणजे जास्त नाहीं तरी क्षणभर जयदेवाच्या गीतगोविंदाची आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

**वेढिलीं सोने-सळा : देउ इंद्रनीळु सांवळा ॥**
**वरि उटी मिरवे पातळा : विचित्रा धातूंचीं ॥**

❀ ❀ ❀

**इंद्रनीळाची दीप्ति : नीलोत्पलांची कांती ॥**
**एकवटली तैशी सांवळी श्रीमूर्ति : मिरवतुसे ॥**

या दोन ओंव्यांत श्रीकृष्णांच्या अंगकांतीचें वर्णन दिलें आहे. आतां त्याच्या मुखकमलाचें वर्णन कसें करतात पहा:—

**कवण श्रीमुखाचें बरवेपण : कैसें सदोदितु प्रसन्न ॥**
**तेआंचे इंदु लाहांता पाईकपण : वरि कलंकिआ न होता ॥**

येथें व्यतिरेकअलंकारानें श्रीकृष्णमुखाचें रमणीयत्व सिद्ध केलें आहे. अशाच प्रकारें ठिकठिकाणीं अलंकारांचा अवलंब केल्यामुळें पंडितांचा साहित्यशास्त्राशीं दृढपरिचय दिसून येतो.

**सुनीळे गगनीं विस्फुरतु : जैशी कां विद्युल्लतु ॥**
**तैसा फूटा असे मिरवतु : स्कंदावरी ॥**

श्रीकृष्णांनीं आपल्या खांद्यावर धारण केलेलें उत्तरीय पांढऱ्या वर्णाचें असलें पाहिजे अशी खात्री होण्यास पहिल्या ओळींतील उपमाच कारण

झाली आहे. श्रीकृष्णाच्या गगनवर्णनसदृश अंगावर पांढऱ्या वर्णाचें तकतकीत रेशमी उत्तरीय विद्युल्लतेप्रमाणेंच शोभलें असेल यांत शंका नाहीं.

पुढें थोडेंसें आभरणाचें वर्णन करतातः—

**कमलकर्णिका श्रवणीं : माजी गुंजांची खेवनी ॥**
**रत्नें होतांती ठेंगणी : तें देखौनिआं ॥**

या ठिकाणींही वरचाच अलंकार कायम आहे. श्रीकृष्णाचे सर्वच पदार्थ इतके चांगले कीं, जगांतील अत्युत्तम गणल्या गेलेल्या पदार्थांची त्यांच्याशीं तुलना करणेंदेखील शक्य नाहीं. असें वर्णन करण्यांत कवित्वापेक्षां कवि भक्तीनेंच जास्त प्रेरित झाला आहे असें वाटतें. श्रीकृष्णाच्या भालपटावरील टिळा, त्याचे कुरळे केश व मुख यांवर कवीनें केलेलें रूपक सुललित मनोहर असून तें संस्कृत कवींच्या नेहमींच्या वर्णनरूढीस अनुसरूनच आहे.

**अर्धचंद्रु टिळा भालस्थळीं : सुनीळें कुरळें तेची भ्रमरावळीं ॥**
**लुब्ध जाली परिमळीं : मुखकमलाचा ॥**

श्रीकृष्णाच्या कृष्णकुरलकुंतलांना भ्रमरावली म्हणणें तर अत्यंत अनुरूप आहेच; पण तीच कुंतलरूपी भ्रमरावली श्रीकृष्णाच्या मुखकमलसुवासास लुब्ध झाली असें म्हटल्यानें श्रीकृष्णाचे केश त्याच्या मुखावर लांबपर्यंत लोळत होते हा व्यंग्यार्थ कवीनें सुश्लिष्ट तऱ्हेनें व कुशलतेनें वर्णिला आहे.

येथपर्यंत व्यक्तिवर्णन झालें. आतां आपण या काव्यांतील निसर्गवर्णनाकडे वळूं. मराठी काव्यांत स्वतंत्रपणें निसर्गवर्णनें जरी सांपडत नाहींत तरी तशी संधि आली असतां ती मात्र मराठी कवींनीं दवडलेली नाहीं. आमच्या मराठी कवींनीं निसर्गवर्णनें स्वतंत्रपणें कां लिहिलीं नाहींत याबद्दल त्यांना दोष देणें अत्यंत अन्यायाचें होईल. त्यांचा जर तो उद्देशच नव्हता किंवा तें जर त्यांचें ध्येयच नव्हतें, त्यांची कविता जर निवळ पारमार्थिक किंवा आध्यात्मिक स्वरूपाची होती, तशाच प्रकारची कविता रचण्यांत जर त्यांनीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्चण्याचें ठरविलें असतें तर त्यांना त्याबद्दल नांवें ठेवून चालणार नाहीं. उद्दिष्ट ग्रंथरचना करीत असतांना इतस्ततः विखुरलेलीं सृष्टिवर्णनें आमच्या महाराष्ट्र-कवींत कांहीं कमी नाहींत. प्रसिद्ध कवि मुक्तेश्वरांचें आदिपर्व किंवा सामराजाचें

रुक्मिणीहरण यांसारखीं काव्यें पाहिलीं असतां त्यांत निसर्गवर्णनाची रेलचेल दृष्टीस पडते. नुसत्या सृष्टिवर्णनविषयक कविताच रचण्याचें आमच्या कवींनीं मनांत आणलें असतें तर त्यांतही त्यांनीं उत्तम कौशल्य व बुद्धि-सामर्थ्य दाखविलें असतें याबद्दल तिलप्राय शंका वाटत नाहीं.

असो. आमच्या पंडित दामोदरांचेंही असेंच झालें आहे. आपली भक्तिप्रवण कविता लिहितांना त्यांनींहि एकदोन ठिकाणीं निसर्गवर्णनास जागा दिली आहे. त्यांपैकीं पहिलें स्थल म्हणजे वृंदावनवर्णन. कोणत्याही गोष्टीचें अगोदर सर्वसाधारण वर्णन देऊन नंतर तिच्या अवयवांचें किंवा भागांचें यथाक्रम व साग्र वर्णन करण्याची पंडितांची नेहमींची पद्धतच दिसते. पहिल्यानें वृंदावनाची सर्वसाधारण शोभा सांगतातः—

**जैसे वृंदावन पावनु : तैसें वर्णौं नेणिजे महिमान ॥**
**जें नीरंतरें क्रीडास्थानु :. सर्वेश्वरां चें ॥**

पण पुढेंच तेथील फलवृक्षांचें वर्णन करून पुष्पवृक्षांचें वर्णन करतांना त्यांची प्रतिभा अत्यंत उच्चतेस पोंचल्याचें आढळतें. सुनील अशा वृंदावनांतील पांढऱ्या शुभ्र व उज्ज्वल पुष्पांवर केलेली उत्प्रेक्षा वाचकांची चित्तवृत्ति क्षणभर तल्लीन केल्याशिवाय राहणार नाहीं.

**वृंदावनाची सुनीळता : गगंणीसे प्रतिबिंबता ॥**
**सुमनसें उमटत : ते जैसे तारागणु ॥**
**कीं दी असतां तारा न दिसे : तें उणें फेडावेआ दोसें ॥**
**वनश्रीआ वेढिले जैसे : अंबरु नक्षत्रे सीं ॥**

यांतील भावना किती उच्च आहे! आपल्या कल्पनेच्या भरारीबरोबर रसिक वाचकांनाही कवीनें उच्च वातावरणांत विहार करण्यास लाविलें आहे; यानंतर सर्व फलपुष्पवृक्षांचीं नांवें त्यांच्या उपमाद्यलंकारमंडित वर्णना-सह दिलीं आहेत. त्यावरून पंडितांची बहुश्रुतता चांगलीच प्रत्ययास येते.

वन असेल तेथें सरोवरें असावयाचींच म्हणून त्यांचें वर्णन १।२ ओंवींत सुंदर रीतीनें करतातः—

**ते आं जवळीं सरोसरें : चंद्र मंडळांकारें ॥**
**दाखविलीं श्रीचक्रधरें : सवंगडे आं सीं ॥**

**सुधाजल भरितें : जलक्रीडा खेळेंती दैवतें ॥**
**जेथें जाली निर्वैरें भूतें : उदकपाणें ॥**

वृंदावनांतील सरोवरांचें जलपान करतांना पशूंनीं देखील परस्परांतील वैरभाव विसरला असें तेथील महत्त्व सांगून सरोवरांतील कमलांचें वर्णन आपल्या गोड शब्दांत करतातः—

**कनक कमल विकाशत : भ्रमरांचिआं झांका वरी पडत ॥**
**तेथ राजहंस चारा वाटित : अमृतकुंदांचें ॥**

यापुढें तेथील मुनिजनांच्या व तपोधनांच्या हटयोगाचें विस्तृत वर्णन १४६–१५२ पर्यंत आलें असून त्यावरुन पातंजलयोगाची माहिती आमच्या कवीस किती पूर्ण होती हें स्पष्ट होतें. पुढें पुष्पवृक्षांचें नांवनिशीवार वर्णन करून आपली बहुश्रुतता पुन्हा दर्शवूं इच्छिणारा कवि वृंदावनांतील पक्ष्यांच्या गोड व मधुर शब्दालापांचें वर्णन किती नितांतरम्य करतो, पहाः—

**वेणुध्वनीचे उ्तवरू : तैसे मकरंद मत्त भ्रमरू ॥**
**प्रिया तें बोलांवितांति द्विजवरू : पंचमालापीं ॥**

वरील ओंवीवरून " मधुमत्तमधुकर भ्रमति । गुंजारव कितितरि करिती " या पदाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं.

वृंदावनाचें वर्णन किती जरी उत्तम उत्तम शब्दांनीं केलें तरी त्याचें यथार्थ वर्णन होणें शक्य नाहीं असें सांगून कवि याहीपेक्षां अद्भुतरम्य अशा कालिंदीवर्णनाकडे वळतो व आपणांसही त्याच्या पाठीमागून जाणें प्राप्त आहे.

**असो हे शब्दरचना : वर्णौ नेणिजे वृंदावना ॥**
**देउ पहावेआं जमुना : नीगते जालें ॥**

कालिंदीच्या वर्णनास १६८ पासून आरंभ होतो. कालिंदीच्या नवोनव तरंगपक्तींबरोबर पंडितांच्या प्रतिभेच्याही अभिनवतरंगमाला एकामागून एक येऊन रसिक वाचकांच्या मनस्तटांवर जोरानें आपटत आहेत असें वाटतें. कालिंदीचें हें सर्वच वर्णन इतकें उत्तम साधलें आहे कीं, त्याची कोणत्याही अत्युत्तम काव्यांत गणना होण्यास हरकत नाहीं.

कालिंदीजल निर्मल : श्रीकृष्णकांती श्यामल ॥
प्रतिबिंबैली भणौनि सुनील : होऔनि ठेलीं ॥ १ ॥
भक्तिभावें ऊळगितां : केवि वर्णावी सायुज्यता ॥
जे आं चिआं सन्निधीं सरूपता : जडा जालीं ॥ २ ॥
देखौनि श्रीचक्रपाणी : कैसीं सं-भ्रमीतु जाली तरंगिणी ॥
कीं आनंदैली अंतःकरणीं : ते रोमांचु दाटिलें ॥ ३ ॥
कीं आलिंगावें आं श्रीकृष्णराजा : तिआं बहुतीं केलिआं भुजा ॥
तैसें तरंगु पढियासलें मज : कालिंदिअे चे ॥ ४ ॥
मग आनंदसागरीं मीनिली : तैसी निश्चलु जाली ॥
कीं देहभाऊ विसरैली : श्रीकृष्णवेधें ॥ ५ ॥
कीं जन्मैली देवां चां चरणीं : ते उतावेळु फुण असें मणीं ॥
भणौनि भेटों आली मंदाकिणी : कालिंदी नोहे ॥ ६ ॥
कीं श्रीकृष्णाचिआं संगतीं : आमुची फिटैलु अधोगती ॥
भणौनि भेटों आली भोगावती : पाताळौंनि ॥ ७ ॥

नुसत्या यमुनेवर, तिच्या श्यामलकान्ति सलिलावर व तिच्या तरंगांवर कवीला एकावर एक कल्पना कशा सुचल्या आहेत हें आपणांस वरील उताऱ्यांतील 'कीं'नें आरंभ झालेल्या उत्प्रेक्षांनीं स्पष्ट दिसत आहे. वरील सहाव्या ओंवीच्या दुसऱ्या ओळींतील अपन्हुतिअलंकार पाहण्यासारखा आहे. यावरून " प्रकृतं प्रतिषिध्यान्यस्थापनं स्यादपन्हुतिः । " हें त्या अलंकाराचें लक्षण पंडित दामोदरांना अवगत होतें हें सिद्ध होतें.

यानंतर यमुनेच्या घाटांचें, तिच्या वाळवंटाचें, तेथील पक्ष्यांचें तेथें जल-पानार्थ आलेल्या निर्वैर पशूंचें व स्नानार्थ आलेल्या यतिवरांच्या ध्यानतपस्या-दिकांचें विस्तृत वर्णन आलें आहे. तेथें असलेल्या बगळ्यांचें विनोदप्रचुर वर्णन व चक्रवाक पक्ष्याच्या नेहमींच्या वृत्तीस अनुसरून त्यांना दिलेली उपमा फारच यथार्थ वाटते. हें बगळ्याचें वर्णन वाचून माझ्या एका डॉ० स्नेह्यांचें " संध्यापरं मा नु विडंबयंति " असें बगळ्यांच्या खालमुंडी वर्तनाचें केलेलें वर्णन डोळ्यांपुढें उभें राहिल्याशिवाय रहात नाहीं. दामोदरांची एकच ओंवी पहाः—

**एकांगुष्टतपिअे बक : नासाग्रीं दृष्टि घालिती ढोंक ॥**
**-यज्ञदीक्षीत तैसें चक्रवाक : प्रिया तें सांडिती ना ॥**

पंडित दामोदरांच्या उत्तम उत्तम वर्णनाचे उतारे याच छोटेखानी काव्यांत आणखी पुष्कळ सांगतां येतील. उदाहरणार्थ, २०५ ओंवीपासूनचें गोपालपरिवेष्टित श्रीकृष्णाचें वर्णनही सुंदर आहे. त्याचप्रमाणें श्रीकृष्णाच्या अवयवांचें ओंवी २१७ पासूनचें वर्णनही मनोज्ञ आहे. एखादा प्रसंग किंवा पदार्थ वर्णनाकरितां पुढें आला असतां त्याचें वर्णन करून नंतर त्यावर आपली उत्प्रेक्षा चालवावयाची असा पंडितांच्या वर्णनशैलीचा विशेष आहे. हा विशेष गोपालपरिवेष्टित श्रीकृष्णवर्णनामध्यें जास्त दिसून येतो, त्याचप्रमाणें अघासुरवधवर्णनप्रसंगीं व ब्रह्मदेवकृत वच्छ-हरण प्रसंगींही दिसून येतो.

असो, पंडितांच्या साहित्यशास्त्रासंबंधींच्या ज्ञानाचा उल्लेख मागें केलाच आहे. त्यांनीं योजलेल्या शब्दालंकारावरून हें उघडच दिसतें. वाचकांनींही त्यांच्या स्थलपरत्वें दिलेल्या उपमा पाहिल्या असतां त्यांना त्याची खात्री होईल. त्याचप्रमाणें साहित्यशास्त्रांतील नवरसांशीं त्यांचा चांगलाच परिचय दिसून येतो.

**उपमा श्लेष वर्णुक : एहीं रंजउ सकळैकु लोक ॥**
**कीं पवाडे संसारुमोचक : वाणौ मुकुंदाचे ॥**

या ओंवीवरून शब्दार्थालंकाराचें पंडितांचें ज्ञान व्यक्त होऊन ओंव्या ५१–५५ मध्यें दिलेल्या श्रीकृष्णाच्या नवरसनिधानत्ववर्णनानें वरील उक्तीस चांगलीच पुष्टि येते. ५५ ओंवीमध्यें, "एसें नवरसु नाटकु" या उक्तीनें "नवनाट्ये रसाः मृताः" असें लक्षण देणाऱ्या भरतमुनींच्या ग्रंथाचेंही पंडितांनीं अवलोकन केल्याचें सिद्ध होतें.

दामोदरांच्या बहुश्रुततेबद्दल पूर्वी थोडा उल्लेख केलाच आहे. ओंवी ८५ पासून केलेलें खेळाचें वर्णन, २८० ओंवीपासून केलेलें वांसरांच्या रंगांचें वर्णन 'चतुर्विधा दंडीचें विद्यावंत' यानें व पावें, तोरमी, मोहरी, सिंगें इ०नें केलेला गायनांचा व वाद्यांचा उल्लेख यावरून त्यांचें बहुश्रुतत्व विशेष दृष्टोत्पत्तीस येतें.

पंडित ज्याप्रमाणें उत्तम कवि होतें त्याप्रमाणें ते चांगलेच विद्वान होते. त्यांचें वाचन विस्तृत होतें. त्यांचें महाभागवताचें परिशीलन दांडगें होतें व त्याचें परिपक्क फल म्हणजेच हें त्यांचें सुंदर काव्य. या ग्रंथांत इतस्ततः दिलेल्या पौराणिक उल्लेखांवरून हेंच दिसून येतें. एकदोन महाभारतांतील उल्लेखांवरून त्यांचा ह्या ग्रंथाशीं परिचय दिसून येतो. इतकेंच नव्हे तर "तियेवेळीं विश्वतोमुख हे श्रुती : देवें साचु केली" व "अन्नब्रह्म हें वचनः देवें साचु केलें" या उल्लेखानीं, व "कीं महंताची मती : दशोपनिषदां चि आं श्रुती" या वाक्यानें त्यांचा श्रुतींचा व दशोपनिषदांचा अभ्यासही व्यक्त होतो.

आतां पंडित दामोदरांच्या मतासंबंधानें लिहावयाचें तर ते अद्वैतमताचे पुरस्कर्ते होते. "ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः।" अशाच मताचे ते होते हें खालील उताऱ्यांवरून दिसून येईलः—

**जैसें तरंगू सागरां : तैसें अनंतावतारू ईश्वरां ॥ १ ॥**

❀ ❀ ❀

**जैसें मायामोहीं जनु पडिलें : संसारकूपीं ॥ २ ॥**

❀ ❀ ❀

**एकु कवि झाला अनेकु : ऐसें बोलें नेणता लोकु ॥**
**तरी सहस्रघटीं सशांकु : प्रतिबिंबतुसें ॥ ३ ॥**
**जैसा मणिगणीं : तंतु मेघावली गगनांतु ॥**
**तैसा भूतीं विश्वनाथु : कीं भूतें तेआ माजी ॥ ४ ॥**

जीव हे परमात्म्याचीं प्रतिबिंबें आहेत. जीव व परमात्मा हे वास्तविक एकच आहेत हें भगवद्गीतेचेंच तत्त्व ३ ऱ्या व ४ थ्या ओंवींत सांगितलें आहे. ४ थ्या ओंवीनें तर 'सूत्रे मणिगणा इव' व "अहं सर्वेषु भूतेषु, सर्वभूतान्यथो मयि" ॥ या गीतेच्याच श्लोकांचा अनुवाद केलेला आहे.

गीतेंतील प्रकृतिपुरुषांचें विवेचनही पंडितांना मान्य आहे. सर्व जग म्हणजे प्रकृतीचाच खेळ असून प्रकृतिपुरुष विवेक करून प्रकृतीपासून पुरुषाची सुटका केल्याशिवाय या भवचक्रापासून प्राणिमात्राची सुटका नाहीं असें त्यांचें स्पष्ट मत आहे.

प्रकृति पुरुष विवेका तें : जैसें परमहंस जाण ते ॥
तैसें क्षीरा नीरा निवाडू करीतें : निर्मळ राजहंस ॥

❀ ❀ ❀

जीवु प्रकृतीपासोनि उजिडें : जेणें भवबंध विघडे ॥

❀ ❀ ❀

सहजेंची आवडे प्रकृती : वरी श्रवणीलिं फलांची श्रुती ॥
तेणें दुणाविली जीती : ते जीवें न संडे ॥

❀ ❀ ❀

अहंकारें मुक्ति मानिती : परि आत्मतत्वां नेणतीं ॥
प्रकृती वेगळे न होतीं : कव्हणीं काळीं ॥

निवळ यज्ञयागांबद्दल व कर्मासक्तीबद्दल भगवद्गीतेप्रमाणेंच पंडितांचें विरुद्ध मत आहे. अंतःकरणांत असणाऱ्या परमेश्वरास किंवा परब्रह्मास न ओळखतां यज्ञयागांमध्यें किंवा हटयोगामध्यें गढून गेलेले लोक आपलें नुकसान करून घेत आहेत असें त्यांस वाटतें.

एक अघमर्षणीं रिगत : एक मृत्तिकास्नानें करीत ॥
एक कर्माचि तारकु मानित : नेणतीं परब्रह्म तें ॥
घाटीं जप्रिआं चिआं कोडीं : कूर्मासनीं बैसिलें त्रि-दंडी ॥
नमस्कारीं व्याकुळ एकदंडी : जवळाचि देऊ देखती ना ॥
आश्रमधर्माचेनि अभिमानें : कर्मयागाचे नि यजनें ॥
ईश्वरतत्त्वांचें जाणणें : तें अरुतें चि ठेलें ॥

जन्मास आलेल्या प्रत्येक मनुष्यास कर्म सुटत नाहीं. तो कर्माच्या कात्रींत सांपडून शिवाय तो षड्रिपूंच्याही तावडींत सांपडतो. पण अशीं सारखीं कर्मेंच करीत मनुष्य बसला तर त्याचा कर्मबंध फिटणार नाहीं. त्याला परमेश्वराच्या किंवा श्रीकृष्णाच्या कृपेशिवाय दुसरा मार्गच नाहीं.

तैसा कर्में कर्म-बंधु न फिटे : जेवि संबंधें मोहो न तुटे ॥
हें अघटितु वटे : जरि तूं कृपा करीसी ॥

यामप्रमाणें शेवटीं भक्तीकडे धाव घेतली आहे. भगवद्गीतेमधील राजविद्या किंवा राजगुह्य म्हणजे हेंच असून या ग्रंथानें दामोदर पंडितांची श्रीकृष्णभक्तिच येथें उत्कट रीतीनें दिसून येते. सर्व भोगापेक्षां भक्तिमार्गच त्यांना श्रेयस्कर वाटला. श्रीकृष्णसेवाच मनुष्यास भवचक्रांतून सोडवील अशी त्यांची खात्री होती. श्रीकृष्णभक्तीपुढें बाकीचे सर्व मार्ग फिके पडतात.

**आतां सांडा अन्य-भजनें : कां नाइकां वेदपुराणें ॥**
**सुंचिजे ना आनां कव्हणें : एकु श्रीकृष्णसेवा ॥**

❀ ❀ ❀

**कव्हणा हीं जपतपतीर्थां : यागदानें व्रतां ॥**
**कृष्णमाहिमेसीं समता : आथी चि, ना ॥**
**परि भक्ति एकीं सलभु मुरारी : हे जाणविलें ययापरी ॥**
**जो ऊळगीजे सुरवरीं : तो गोवळ गोळिआं सीं ॥**

त्यांनीं आपला सर्व वाचकांना हाच निरोप सांगितला आहेः—

**सांडा सांडा अहंकारा : अनुसरा श्रीचक्रधरा ॥**
**मग जाणाल परात्परा : विचारा तें ॥**

पंडितांच्या भक्तीचा आणखी मासला म्हणजे त्यांनीं वर्णिलेली ब्रह्मस्तुति. ती ४६७ पासून पुढील दहा ओंव्यांत असून स्तोत्ररूपांत असल्यामुळें प्रत्येक श्रीकृष्णभक्तानें पाठ करण्यास अत्यंत योग्य आहे.

या ग्रंथाच्या, ओंव्या बहुतेक ज्ञानेश्वरीप्रमाणेंच साडेतीन ओळींच्या आहेत. हा ग्रंथ ज्ञानेश्वरीपूर्वकालीन असल्यामुळें त्या काळींही साडेतीन ओळींच्या ओंव्यांचा प्रघात होता असें सिद्ध होतें.

झालें! हातीं घेतलेलें काम तडीस गेलें. गडबडीमुळें व नजरचुकीनें बऱ्याच चुका राहून गेल्या आहेत याची जाणीव मला आहे. रा० देशपांडे यांनीं उल्लेखिलेल्या मानभावपंथीय " साती " ग्रंथावरील टीपा उपलब्ध झाल्याशिवाय पुष्कळ गोष्टी संदिग्धच राहतील. मीं शक्य तो प्रयत्न केला आहे. रसिक वाचकांनीं सरळ भावनेनें आणखी कांहीं सूचना केल्यास, त्या स्वीकारून त्यांचा विचार पुढें मी अवश्य करीन.

# आभार

माझ्याकडून ही अल्प वाङ्मयसेवा घडविण्याचें सर्व श्रेय माझे गुरु प्रो० चापेकर यांनाच आहे. त्यांनीं हें पुस्तक रचीत असतां जो मार्ग दाखविला व विशेषतः माझ्यावर जें त्यांचें प्रेम आहे त्याबद्दल मी त्यांचा कसा उतराई होऊं हेंच मला कळत नाहीं. त्यांचा अभिप्राय म्हणजे तो एक मला आशीर्वादच आहे.

त्याचप्रमाणें प्रो० पोतदार यांनीं वेळांत वेळ काढून मला ज्या उपयुक्त सूचना केल्या व रा० रा० वासुदेव गोविंद आपटे यांनीं प्रकृतीचें अस्वास्थ्य असतांही माझ्याशीं जी थोडी चर्चा केली त्याबद्दल वरील दोघांही विद्वानांचे मी मनःपूर्वक आभार मानतों.

कै० भाव्यांचे चिरंजीव रा० रा० लक्ष्मण विनायक भावे यांनीं आपल्या वडिलांप्रमाणेंच उदार बुद्धीचें व उत्तेजनपर पत्र पाठवून या पुस्तकप्रसिद्धी-बद्दल जी आपली पूर्ण सम्मति दर्शविली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

'विजय' छापखान्याचे मालक रा० रा० अनंत सखाराम गोखले यांनीं पुस्तक शक्य तितक्या लवकर व सुबक छापून दिल्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहें.

पंगुवाडा–कोल्हापूर,
मकरसंक्रमण,
ता. १३ जानेवारी १९२७.

**दत्तात्रेय सीताराम पंगु.**

३८८५

# वच्छहरण कथा

ॐसच्चिदानंदायनमः : परब्रह्मपरानंद स्वछंदोपातविग्रहः ॥
जीवोद्धारविहारश्री—चक्रपाणेनमोस्तुते ॥

जेआं पासौनि जगा जन्मु : जें परिपूर्ण आत्मारामु ॥
तें ध्याइलें परब्रह्मु : गुरूप्रसादें ॥ १ ॥

तेआं साकारां सगुणां : सर्वभावीं केलें नमनां ॥
त्रीभवनंजीवनां : श्रीकृष्ण-रायां ॥ २ ॥

जें सकळतीर्थांचें जन्मस्थान : देवतां करीति आराधन ॥
तेआं श्रीचक्रधरां चें चरण : नमस्कारिलें ॥ ३ ॥

भक्त उद्धरावेआं अपारु : जें जें ईश्वरां चें अवतारु ॥
तेआं साष्टांगीं नमस्कारु : केला मिआं ॥ ४ ॥

नमनु उद्धवादिभक्तां : नागार्जुनादिकां महंतां ॥
ब्रह्मविद्याशरणागता : श्री प्रभू चेआं ॥ ५ ॥

नागार्जुना चेंनि प्रसादें : परमपुरुषा चेंनि बोधें ॥
श्रीकृष्णकथा ॐवीप्रबंधें : भणे मुनि केशवराजु ॥ ६ ॥

स्मरौ ईश्वरा चे गुणां : आनंदें विकासु जाला मनां ॥
तो अनुवाद करीतुसें रसनां : वाणौ कवणु जाणे ॥ ७ ॥

महिमा मनां अगोचरु : परि कवीं सी हां चि परिहारु ॥
जें स्वमतीं वाणावा ईश्वरू : जेणें पवित्र वाचा ॥ ८ ॥

निरौतें जीवु कांई जाणेंति : जेआं तें श्रुतीं भणतीं नेती ॥
परि भक्तीं कारितां स्तुती : दूषणु न लगे ॥ ९ ॥

जें अनुभवें जाणिजे : तें बोलु कोवें वर्णिजे ॥
परिश्रवणें वीणु सुख न पाविजे : आणिकें परी ॥ १० ॥

डोळांजनें न शोभेति : तरि निधानें न दीसेंति ॥
न होता नवीदिशीं : अंधःकारू न वचें ॥ ११ ॥
तैसे हरिकथाश्रवणें वीण : जीवां कांईं चोखाळेंपण ॥
तरि पर–ब्रह्म चें दर्शन : केंवि होअे ॥ १२ ॥
ययां चीं कारणें आदि-नाथें : धरिलें मायावेषां तें ॥
यऱ्हवीं शुकादिक कांईं वाणिते : अरुपा निर्गुणां तें ॥ १३ ॥
उपमा श्लेष वर्णुक : एहीं रंजउं सकळैंकु लोक ॥
कीं पवाडें संसारुमोचक : वाणौं मुकुंदा चे ॥ १४ ॥
प्राकृत जण मानवतीं : तैसी उडउ कथासंगती ॥
कीं पढों परब्रह्म ची कीर्ती : जें जीवणु संतांचें ॥ १५ ॥
नागरीं बोलीं स्छल वाणिजे : सकल रसां तें पोखिजे ॥
कीं निरसां होऔनि श्रीकृष्णीं भजीजे : यां दों कवणु चांग ॥ १६ ॥
पुराणिचे आरिख बोल : परि प्रबंध-रचना से नवल ॥
ते सुगंध कदंबीचे परिमळ : तैसें वेधकु होतीं ॥ १७ ॥
जो सुरवरां चां दातारू : सकळवेधु दीक्षागुरूं ॥
तो सर्वज्ञ नाथु श्रीचक्रधरू : जेथ कथा–नाअेकु ॥ १८ ॥
भणऔनि हे मंगलां चीं निधी : इयें चेंनि श्रवणें सकळां सिद्धीं ॥
परमार्थु निरवधी : हें चि कारण ॥ १९ ॥
जैसी कुलस्त्रिअे ची गुणसंपत्ती : भोगावी एकें चि पतीं ॥
तैसी हरिकथारसी रती : भक्ता वांचौनि नाहीं ॥ २० ॥
जे श्रवणां सीं अ-मृत-पाण : धर्मा चें जन्मस्छान ॥
वस्तू तें दाविंतें दिव्यांजन : सकळजनां सीं ॥ २१ ॥
तैसें स-कौतुक श्रीकृष्णचरित्र : वर्णिजैलु विचित्र ॥
जेणें चमत्करैलु चित्त : संतजणां चें ॥ २२ ॥
जो चंद्रुचकोरां चें जीवन : अ-मृतें नीववी त्रि-भुवन ॥
तो हीं गुणें एकें नीराजन : मानी कळांवंतु ॥ २३ ॥

तैसें सकलगुणभरितु : परमानंदैकनिरतु ॥
तो तोकडेआं हीं परगुणां संतु : संतोखतीं ॥ २४ ॥
जेआ संताचिआं संगती : निन्हां होअे निर्मळमती ॥
उपजे श्रीकृष्णीं भक्ती : अ-खंडितु ॥ २५ ॥
जैसा विकाशु पद्मिणी : उदेलिआ तरणी ॥
तैसें संत-जनां चां मनीं : श्रीकृष्णचरित्रु ॥ २६ ॥
सहजें अनुराग भक्तां : वरि आनंदनी श्रीकृष्ण-कथा ॥
जैसें चंद्रें चंद्रकांता : अमृतू द्रवतीं ॥ २७ ॥
असंख्यातु कवी बेकार : वाणितांति निरंतर ॥
परि नित्यनूतन मधुर : श्रीभागवतीकथा ॥ २८ ॥
जैसें अमृत नव्हे जूनें : उरंगें ना साडे पव्हर सोनें ॥
तैसें श्रीकृष्णकीर्तीचें वाणनें : सदासुरंगमधुरा ॥ २९ ॥
जंवं मेरु सीं अ-चलता : चंद्रीं वसैलु अ-मृता ॥
तंवं वर्तैलु श्रीकृष्णकथा : तिहीं लोकीं ॥ ३० ॥
अवतरलासे कैवल्यकंदू : भणऔनि त्रीभुवनां जाला आनंदू ॥
हें सांगतसे मुनी नारदू : भक्तां भागवतां सीं ॥ ३१ ॥
सुरवनितां मनोहरूं : सकळ गंधर्व किंन्नरूं ॥
मिळौनि वाणितांति श्रीचक्रधरूं : राणेआं तें ॥ ३२ ॥
आनंदें मुदीतु गोपांगणां : ओविअें गातांति यादवां चां राणा ॥
तो ध्वनी आइकौनि दिग्गणा : होंति मंगलरूपां ॥ ३३ ॥
भोगावती चां तीरीं : वीणावाद्यु घेऔनि करीं ॥
वेधें गातांति राओ मुरारी : नागकन्यां ॥ ३४ ॥
ऐसें लोक-त्रय-पावन : परममंगल निधान ॥
मोक्षैकुसाधन : आनंदरूप ॥ ३५ ॥
शुकमुखें परिक्षिती : आइकितां सहारात्रें मुक्ती ॥
जेथ आत्मारामु रमती : निरंतरूं ॥ ३६ ॥

तें सांडौनि कर्माभिमानु : होऔनि दत्तचित्त अवधानु ॥
करी कां श्रीकृष्णमहिमा श्रवणु : भक्ति-भावें ॥ ३७ ॥
श्रीकृष्णगुणनामीं कराल आदरू : तरि तुम्हां तुटैलु संसारू ॥
जैसा दिनकरें अंधकारूं : नासौनि जाअे ॥ ३८ ॥
जैसे तरंगु सागरां : तैसें अनंतावतारूं ईश्वरां ॥
परि लीलां मुंचिजे संसारां : ऐसा एकु श्रीकृष्ण चि होअे ॥ ३९ ॥
आतां सांडा अन्य-भजनें : कां नाइकां वेदपुराणें ॥
मुंचिजे नां आनां कव्हणें : एकु श्रीकृष्णसेवा ॥ ४० ॥
जेआं चीं नामें उच्चारितु : नारद ब्रह्मानंदें पावतु ॥
तो ध्वनी आइकौनि देश-धडी होतु : महापातकें ॥ ४१ ॥
कव्हणा हीं जप-तप-तीर्थां : यागदानेंव्रतां ॥
कृष्णमहिमे सीं समता : आथी चि ना ॥ ४२ ॥
तीर्थें जन्मैलीं श्रीचरणीं : सकळ देवतां जेआं चीं करणी ॥
तो कैवल्यनाथु श्रीचक्रपाणी : जैसें तोखें ॥ ४३ ॥
जे अज्ञानतमा चीं तरणी : कैवल्यपदा चीं निशानी ॥
ते श्रीकृष्णकथा वत्साहरणीं : सांधीजैलु ॥ ४४ ॥
जें जीवां तें चोखाळीति : कां मना तें नीववीति ॥
भक्तिभावा तें पोखिती : श्रवणमात्रें ॥ ४५ ॥
वाचां जन्म सुफळ करावें : तिहीं लोकीं सरतेआं होआवें ॥
तेहीं तन्हीं श्रीकृष्णमहिमे तें वाणावें : सदा बुद्धिमंतीं ॥ ४६ ॥
भक्तीरसीं नाहीं आदरूं : जेआं कवी पढिअे श्रृंगारू ॥
तेहीं तन्हीं सुंदरा चां सुंदरूं : राअ मुरारी चि वाणावा ॥ ४७ ॥
जेंआं चे आइकौनि बरवेपणा : वेधु लागैला देवांगनां ॥
नेटकें रूपु देखौनि मदनां : भुलीं ठेलीं ॥ ४८ ॥
जो सकळविद्यांचें जन्मस्थान : नवां रसां चें निधान ॥
तो वांचौनि सदैवु कवीजन : आण कांई वाणीति ॥ ४९ ॥

जेआं चां बहूरूप खेळु खेळतां : योगिअें परमसिद्धि पावतां ॥
ताप-त्रयो निवारितां : सकळजनां चें । ॥ ५० ॥

जै देउ रास क्रीडा खेळींविला : तै मूर्ती शृंघारू जाला ॥
गोळनीं विनोदें नाचाविला : तै हास्यरसू ॥ ५१ ॥

जै जसोदां भेडाविला : तै करुणारसू उठाविला ॥
विखारूं काळिआं जिंतिला : तै रुद्रु जाला ॥ ५२ ॥

मातें श्रीमुखं दाखविलें : तै अद्भुतां सी रूप जालें ॥
विश्वरूपु प्रकाटिलें : तै भयानकूं ॥ ५३ ॥

जै दैत्यां करी संहारूं : तै विभत्सु अणिवारू ॥
शान्तु तो निरंतरूं : तेथ चिं असे ॥ ५४ ॥

ऐसें नवरसु नाटकु : देउ खेळे जन-मोहकु ॥
निज रूपु तें ब्रह्मादिकु : ठाउकें न होअे ॥ ५५ ॥

निर्गुण कां जालें सगुण : निराकारां साकारपण ॥
निराभिमानां दैत्यनिर्दलन : हें केवीं घडे ॥ ५६ ॥

अरूपां रूप सुन्दरू : अमूर्ता मूर्ती मनो-हरू ॥
अद्वैतां अनंतावतारूं : हें नवल देखा ॥ ५७ ॥

अ-नामआ सहस्रनामां : कुमर आंतोरं आत्मआरामां ॥
आश्रमधर्मू पर-ब्रह्मां : हें विरुद्ध देखा ॥ ५८ ॥

जो असे भूत-ग्रामीं सकळीं ; तो खेळे एकी गोकुळीं ॥
ब्रह्माण्डे नाभी-कमळीं : तो पाह्लकीं सूतें ॥ ५९ ॥

साना हो औनि निन्हां थोरू : भीतरीं असौनि सकळां परू ॥
अकर्ता करी सृष्टिसंहारू : हें अघटीतु नोहे ॥ ६० ॥

ऐसिआं विरुद्धधर्मा चिआं प्रवृत्ती : एकी ईश्वरीं चि आती ॥
ते वेद शास्त्रे तर्कें नेणती : जाणती भक्तीजनुं ॥ ६१ ॥

हें जाणिजे तो परमार्गु : यया परौतां नाहीं अध्यात्मयोगु ॥
म्हणऔनि न करावां प्रसंगु : भणे मुनी केशवराजु ॥ ६२ ॥

कवन दैवें केलें गोकुळ : जे परब्रह्म होऔनि सांवळें ॥
असें गौळिआं चानि खेळमेळें ! मनुष्यवेखें ॥ ६३ ॥

धन्य धन्य ते गोकुळ : जेथ परदैवं रांगतें बाळ ॥
डोळस आंगें वेल्हाळ : गोपी परिअें देतीं ॥ ६४ ॥

सकळ भुवनें जेआं चीं करणी : जो वाणिजे वेदीं पुराणीं ॥
तेआ तें लोणी देऔनि गौळनीं: नाचावितांतीं ॥ ६५ ॥

जो त्री-भुवनां चा दातारू : सकळ प्रामाणां अ-गोचरू ॥
तो होऔनि नंदा चा कुमरू : राखे वासुरवें ॥ ६६ ॥

जो सकळयज्ञांधीपती : जेआं तें आत्मारामु ध्यातीं ॥
तो गोवळें करौनि सांगाती : आखरीं राहिला ॥ ६७ ॥

पेंधा वडजा वांकुडा : सुधामा वामा बागडा ॥
बळ सुबळ सवंगडा : बळिभद्रा चे ॥ ६८ ॥

हे नावां चे गोवळे मुखरीं : एरूं सहस्रसंख्या वऱ्हीं ॥
मीनलें आखरी : जेथ गो-पाळ-राऊ ॥ ६९ ॥

पावें तोरमी मोहरीं : विचित्रां डांगां झेलितीं करीं ॥
नीगेतां सिंगाचा गजेरीं : गगनु गाजीनिलें ॥ ७० ॥

तंवं जाणीतिलें सुर-गणीं : खेळौं निगालें श्रीचक्रपाणी ॥
भणऔनि विमानारूढ होऔनी : पाहों आलें ॥ ७१ ॥

श्रीकृष्णा देखौनि मनें निवालीं : जंवं देवें क्रीडा केली गोकुळीं ॥
तंवं दुजी आला अंतराळीं : अ-मरावती ॥ ७२ ॥

आनंदें निर्भरू जालें : निजस्थानें विसुरैलें ॥
अन्मीखें पाहों ठेलें : राआं मुरारि तें ॥ ७३ ॥

नव-लक्ष-धेनू नंदा ते : एरें गो-धनें असंख्यातें ॥
तेतुलेंआं वासुरूआं ते : पथीं लाविते जालें ॥ ७४ ॥

तंव थोवेंकारीं भणितिलें गोपाळीं : अरे कल्पी कल्पी करा वेगळीं ॥
एक टेकीतु महि-बळें पावंळीं : एकु साउमे नीगेतां ॥ ७५ ॥

चारीतु हरित सोज्वलें तृणें : गोपु भ्रमीति वने उप-वनें ॥
एके श्रीकृष्णां सन्निधाने : चालितांतीं ॥ ७६ ॥
सकल हीं चंदनें चर्चितें : एकें धातु चिआं उटीं घेतें ॥
कस्तुरीपरि-मळे बाहका तें : वरि मसी चीं बाउलीं ॥ ७७ ॥
लेइलें रत्नां चें लेणें : वरि पुष्पां चीं धारितीं भूखणें ॥
एके घालीति गुंजां चीं आभरणें : माथां मोर-विसां वेठीं ॥ ७८ ॥
वेढीलिं सोने-सळां : देउ इंद्रनीळु सांवळा ॥
वरि उटी मिरवे पातळा : विचित्रां धातू चीं ॥ ७९ ॥
वन पुष्पां चिआं माळां कंठीं : मिरवे रुळतिअें वीरागंठीं ॥
शिरीं राजवल्लभा वरी वेठी : मोक्तिकु मोर-विंसा ची ॥ ८० ॥
काखे सिंग वेताटी मोहरी : मरगज पावा साजे करीं ॥
हटोपरीं बाउलीं तोडरीं : काढाति दैत्यां चीं ॥ ८१ ॥
बरवेपणां होईलु दिठी : भणऔनि मसी टिळा ललाटीं ॥
तंव निऱ्हा मिराविला जग-जेठी : गोपाळां माजी ॥ ८२ ॥
ऐसां शृंगारैला राउ मुरारी : सवैल गोवळें नानां परी ॥
जा रे दैत्य व्हो भणतु पेंढारी : क्रीडें उभारितांतीं ॥ ८३ ॥
ठाइं ठाइं उडवतु : सुछंदें टाळ-घोळ वातु ॥
एकु सुहावे पवाडे पढतु : दैत्यु विभांडा चें ॥ ८४ ॥
खेळों आदरिलें गो-पाळीं : शशी सिरणें चेंडुफळी ॥
एकु हामामां घालीति हुंबली : एकु वेली गातांतीं ॥ ८५ ॥
एकु विहंगमा ची करीतिं कुंजनें : एकु ना-नरां चीं उत्पवनें ॥
एकु तगरां ची जुंझणें : दावितांतीं ॥ ८६ ॥
एके मयूरनृत्यें नाचेतीं : एकें राजहंसा गती चालेतीं ॥
एके तितूरवाउली धावेतीं : श्रीकृष्णां पुढें ॥ ८७ ॥
ऐसें नानांविध खेळु खेळतु : देउराआं सीं रुंझी उपजवीतु ॥
पसाएदानु मागतु : चरण-सेवां ॥ ८८ ॥

तंवं कंसें धाडिला दैत्यां घरू : जेआं नांव अघासुरूं ॥
तो थोर सापरूपुधरू : होऔनि आला ॥ ८९ ॥
तो आंगे निन्हा उच्च थोरू : दीर्घु पर्वताकारू ॥
वदना चा विस्तारू : जेवि अंतराळु ॥ ९० ॥
जेणें वधिली पूतनाणि बकासुरू : तो गिळौ नंदा चा कुमरू ॥
एणें एकें गौळिआ चा संहारू : साहजें ची होइल ॥ ९१ ॥
ऐसी पैजा घेऔनि आला : वंदा-वन-मार्गी राहिला ॥
जैसा काळ कळौ आला : महाकाळां तें ॥ ९२ ॥
कीं पतंगु पावका तें : अंधकारूं दिनकरा तें ॥
तैसें तो आपणवे देऔनि श्रीकृष्णा तें : मुक्ती मार्गां आला ॥ ९३ ॥
तंवं आंगवणे चे गोवळें : पातीनिलें तेआं जवळें ॥
रूपु देखौनि बोलों लागीनिलें : एकमेकां ॥ ९४ ॥
हां रे हें जाणा पां कांइ : एक भणेति आम्हीं देखिले चि नाहीं ॥
श्रीकृष्णा तें पुसिजे तरी कांई : निरुतें ठाकितें ॥ ९५ ॥
बाळगोपाळु बोलेंती : हां रे पर्वतु देखा सर्पाकृती ॥
जैसें पूर्वे तें पश्चिमु भणती : दिग्मोहितु ॥ ९६ ॥
घाटु टेंकुळिआं तें चि दशन : उजुवाट तें चि रसना ॥
कपाटुं तें चि वदना : ययां चें भआनकू ॥ ९७ ॥
श्रीकृष्णां सांडौनि साउमें निगालें : भणऔनि अन्य-मार्गी पडिलें ॥
जैसें कां ज्ञानें वीणु पथू चुकलें : साधकजणुं ॥ ९८ ॥
पर्वत-बुद्धीं साउमे जाती : शब्दें तरि सर्पु भणती ॥
जैसीं कां अनात्मेआं आत्मप्रतीति : अज्ञानुजनां ॥ ९९ ॥
अन्यथा-ज्ञानें प्रवर्तलें : भणऔनि काळा वरि-पडें जालें ॥
जैसें मायामोहीं जनु पडिलें : संसारकूपीं ॥ १०० ॥
जैसें गतानुगतिकें लोकु : नेणेतिं परमार्थीक सुखु ॥
न देखैति ब्रह्मविद्ये चें मुखु : जेविं कां पाखांडुमती ॥ १०१ ॥

तैसें पुढीलें गोवळें भूलिलें : मागील देखोवेखी रीगालें ॥
एकु मैळलेनि मार्गें प्रवर्तलें : न विचारितां ॥ १०२ ॥
ऐसेंनि अघवें रीगालें पोटीं : तेणें श्रीकृष्ण सूदलासे दृष्टीं ॥
एऱ्हवीं दे ना कां मीठीं : तेतुलेआं सीं ॥ १०३ ॥
अ-संख्यातु वासुरुवें : तेसनीं चि गोवळरुवें ॥
देखा एकी कुसी माजी किडरुवें : सामावीलि कीं ॥ १०४ ॥
तंवं भक्त-वच्छल श्रीकृष्णु पातला : रूप देखौनि विस्मितु जाला ॥
गोप वच्छें गिळौनि ठेला : आतां कांई कीजे ॥ १०५ ॥
तडवा हाणौनि करौं मारू : तरि आपुलेआं चा होअे संहारू ॥
ऐसें विचारौनि सर्वेश्वरू : कांई करितां जाला ॥ १०६ ॥
जैसें संसारा माजी अवतरौनु : उद्धारिलें भक्तजनु ॥
तैसें तेआं सर्पमुखा माजी रिगौनु : आपुलीं रक्षितां जाला ॥ १०७॥
उत्तरा संकटीं स्मरिला : तै चक्रधरु होऔनि पातैला ॥
मग गर्भस्थितु राखिला : जेणें परिक्षीति ॥ १०८ ॥
जोहरीं लागलेआं वन्ही : कां कोपलेआं दुर्वासु मुनी ॥
तै राखिले संकटा पासौनि : पांडवु जेणें ॥ १०९ ॥
जमलोकीं धाडी-घालौनी : अर्जुनेन सीं क्षीराब्धां जाऔनी ॥
मृत्यापत्यें दिले आणौनी : ब्राह्मणु तोषविला ॥ ११० ॥
तो आर्तां चा कैवारी : रीगाला सर्पमुखा माझारीं ॥
तंवं गजबाजिलें अंबरीं : देवतां गण ॥ १११ ॥
भणौति यया चा अवतारूं : फेडावेआं भूमी चा भारूं ॥
करावेआं दैत्यां चां संहारू : अधुना कैसें वर्तैल ॥ ११२ ॥
देउ अघासुरा सांपडिला : तंवं दैत्यां मनीं हर्खु जाला ॥
परि सृष्टि-संहारु जेयां ची लीळा : तें बळु जाणे चि ना ॥ ११३ ॥
श्रीकृष्णरुपु हृदई प्रवेशलें : तंवं अघासुर-पणु गेलें ॥
आत्मस्वरुपु निर्मळ जालें : तेणें सन्निधानें ॥ ११४ ॥

भीतरी वाढीनिली श्रीमुर्ती : तंवं कुंढैली मनु-पवना ची गती ॥
इंद्रिआं जाली निवृती : जैसीं ब्रह्मविदां ॥ ११५ ॥

आत्मा ब्रह्मद्वारीं राहिला : परमात्मा श्रीकृष्णु बाहीरिं प्रकटैला ॥
मग परिवारू वेगळा केला : दैत्यदेहां पासौनी ॥ ११६ ॥

कर्मेंद्रियां लयो पवनीं : ज्ञानेंद्रियां लयो मनीं ॥
मनपवनु निरंजनीं : स्वात्मस्वरुपीं ॥ ११७ ॥

आत्मा तेज-पुंजु निगाला : तेथ ची श्रीकृष्णीं लयां गेला ॥
जैसा सरितां समुद्दे मीनला : सागरां सीं ॥ ११८ ॥

भीतरीं देवें कांहीं एक दीन्हले : भणऔनि प्रकाशवंतु जालें ॥
कीं तें विज्ञानु प्रकटीलें : तें महंतु जाणेती ॥ ११९ ॥

अघासुरा चा वधु देखिला : तंवं सुर-गणां विस्मयो जाला ॥
मग आनंदभरितें सकळा : चरित्र गातें जालें ॥ १२० ॥

सन्निधीं उद्धरीलीं तृणचरें : एके मुक्ती पाववीलि वैरें ॥
भक्तां कांई दीन्हलें उदारें : तें श्रीकृष्णु ची जाणे ॥ १२१ ॥

जें श्रीकृष्णा चिआं जवळिकां : अवदीतीं कृमीं कीटकां ॥
तेसनीं नाहीं सनकादिकां : ब्रह्मसुखां. ॥ १२२ ॥

सदैवें तेथींची तिर्यचें : जेआं दर्शनु अच्युता चें ॥
जें जीवनु श्रीउद्धवादिकां चें : भणे मुनी केशवराजु ॥ १२३ ॥

वधीनिला अघासुरू : देवीं केला जअेजअेकारू ॥
मग सपूजीतु श्रीकृष्ण सपरिवारू : आलें वृंदावनां ॥ १२४ ॥

देवें वन प्रीतीं पाहिलें : भणऔनि श्रीमंत पावन जालें ॥
जेथिचें वृक्षु धन्य भणातिलें : श्रीउद्धवादीकीं ॥ १२५ ॥

जैसें वृंदा-वन पावनु : तैसें वर्णों नेणिजे महिमानु ॥
जें नीरंतरें क्रीडास्थानु : सर्वेश्वरां चें ॥ १२६ ॥

सुफळें तरूं ची जीवितें : आपण देऊ वाणी जेआं तें ॥
जेहीं नीववीलीं आर्त्त-भूतें : शरीरसंपत्ती ॥ १२७ ॥

तरूं ची देखौनि नम्रतु : मनीं जनु विस्मयीं पावतु ॥
भणौति फलपुष्पें पूजा करीतु : श्रीचरणकमळांची ॥ १२८ ॥
दर्शणें सदा फल जालें : स्पर्शें सात्वीक भोअ प्रकाटिलें ॥
इंद्रनीलकांती वेधिलें : तैसें सु-नीळु दीसतांतीं ॥ १२९ ॥
आनंदें फल पुष्प रसु श्रवतां : पृथिवी साद्रव होऔनि गळतां ॥
तो पुडुरा होतुसें अमृता : पाताळीं चेआ ॥ १३० ॥
पापिएं न देखतीं वृंदावन : जेथ अखंड असेंति सुरगण ॥
तेथ मोकारा केलासे जनां : दिव्य फल-पुष्पां चा ॥ १३१ ॥
वृंदावना ची सुनीळता : गगंणीसें प्रतिबिंबता ॥
सुमनसें उमटत : ते जैसें तारागणु ॥ १३२ ॥
कीं दी असतां तारा न दिसें : तें ऊणें फेडावेआं दोसें ॥
वनाश्रिआ घेढिलें जैसे : अंबरूं नक्षत्रे सीं ॥ १३३ ॥
वनां बाहिरीली आंगीं विशाळ : साल ताल तमाल ॥
आंगें जतन करीतें परिमळ : ते जैंवी राखणांइतु ॥ १३४ ॥
तेआं भीतरींली अळीं : गगनचुंबितां नारिअेळी ॥
उच्चां तेआं खर्जुरी पोफळी : आंदोळतांती ॥ १३५ ॥
तेआं हीं आंतुली आंगीं : साकरानेंओनीं नारंगी ॥
मधुकाकडिआं मातुलंगी : फनसु गंभीरी ॥ १३६ ॥
वारिखतु रसा चें वडप : तैसें निबिडतरूं द्राक्षिमंडप ॥
उघडिलें माणिका चें मोप : तैसें पक्क दाळिंबु ॥ १३७ ॥
कवण गणी तें चंपक : जेथ असंख्यातु पाजतिक ॥
पल्लवीतु दीसतीं अशोक : लक्षसंख्या ॥ १३८ ॥
चंदना चा आरू थोरू : माजी नीबिडु कल्प-तरू ॥
जेआं तळीं नंदा चा कुमरू : खेळे गोपाळें सीं ॥ १३९ ॥
तेआ जवळीं सरोवरें : चंद्र-मंडळाकारें ॥
दाखवीलीं श्रीचक्रधरें : संवगडेआं सीं ॥ १४० ॥

सुधाजलभरितें : जलक्रीडा खेळेती दैवतें ॥
जेथें जाली निर्वैरें भूतें : उदकपाणें ॥ १४१ ॥
गज सिंह शार्दूल : एकत्र मृग व्याघ्र चितळ ॥
श्रीकृष्णें नीववीलें पशु सकळ : आनंदें रावंतांतीं ॥ १४२ ॥
कनक-कमल विकाशत : भ्रमरां चिआं झांका वरी पडत ॥
तेथें राजहंसु चारा वाटित : अमृत कुंदां चें ॥ १४३ ॥
स्फुटिका शिलातलां वरी : गौरी पूजितांतीं विद्याधरीं ॥
वरू मागितांतीं राउ मुरारी : आह्मां पती होआवा ॥ १४४ ॥
इंद्रनीळां चां सोवाणी : वरी बैसौनि पद्मासनीं ॥
योगिअें चिंतीति मुनीं : कान्हो सांवळेआं तें ॥ १४५ ॥
एक मुनीजन ध्यानें चीं रतु : एक आनंदें आपणपें विसरितु ॥
एकु काष्ठी भूतें लयांगतु : परमतत्वीं ॥ १४६ ॥
एकु एका सीं निरौपिंती : हां चीं श्रीकृष्णु कैवल्य-पती ॥
हा चीं परमगती : भक्तां जनां सीं ॥ १४७ ॥
एकु जीवु-परमात्मेआं एक्य भावितु: एकु सेव्य-सेवकभावें उपासितु॥
एकु भेदाभेदाविवर्जितु : राहिलें निरालंबी ॥ १४८ ॥
एकु मध्यशक्ति चेनि आधारें : तिहीं वज्रां चेनि मारें ॥
शरीरें अमरामरें : करीतांती ॥ १४९ ॥
एकु मध्यमे चेनि उद्धारें : लंघौनि तिन्हीं पीठें ॥
जाऔनि पूर्णगिरी चेनि घाटें : कळां आस्वादितांती ॥ १५० ॥
एकु षटचक्रां चेनि उजुकारें : पवना चेनि ऊर्ध्वसंचारें ॥
मेरू चीं तिन्हीं शिखरें : लंघितांती ॥ १५१ ॥
एके सोऽहंप्रतीति राहिलें : एकें सहजानंदें बोधिलें ॥
एके उन्मनीअवस्थां पातिलें : साधकजनु ॥ १५२ ॥
ऐसीं सरोवरें मुनीमंडितें : देखीनिली गोपीनाथें ॥
मग श्रीकरें धरौनि सु-दामेआं तें : देउ साउमेआं निगालें ॥ १५३ ॥

कामिनी प्रिया ते आळंगितु : तैसिआं मंदारां वरी कल्पलतु ॥
नाना फळीं उ॰तवरा होतु : श्रीकृष्णभेटी लागीं ॥ १५४ ॥
एकां रसरूपें फळें : एक फुललें परिमळें ॥
अमृतां चीं कंदपत्रमुळें : तेआं चीं नांवें नेणो ॥ १५५ ॥
योजनसुगंध पाडळ : आळिकुळामंद बकुळ ॥
सोनेकेतकी सु परिमळ : दीसतांतीं ॥ १५६ ॥
कुंकुमकेशरां जवळीं : कापूरकर्दळी चिआं उ॰ळीं ॥
तेथ क्षेण एकु वन-माळीं : उभा ठाकैला ॥ १५७ ॥
जेथ वन पुष्पजातीं : दिव्युपरिमळें उधाती ॥
तेथ लावनी चिआं मालती : कांई वाणौ ॥ १५८ ॥
रत्नबद्धा खेळकुळिआं जवळी : विकाशेति तिहीं काळीं ॥
वाहाकाति आणु आणी परिमळीं : सकलपुष्पजाती ॥ १५९ ॥
जेआं कैलासीं उमावनी : अमरावतिअे चा नंदन-वनीं ॥
सकलद्वीपी चिआं वृंदावनीं : रायां मुरारी चां ॥ १६० ॥
जेथ सानुरागें सु-मनसें : मकरंदआस्वादनमिषें ॥
श्रीकृष्ण पावावेआं दी-वसें : मुनीं षट्पदु जालें ॥ १६१ ॥
जेथ क्रीडैलु श्रीमंत-सुन्दरू : भणौनि मळयानील निरंतरू ॥
अनंगु राहिला स-परिवारू : रूपसौभाग्या लागी ॥ १६२ ॥
वेणुध्वनीं चे उ॰तवरू : तैसें मकरंदमत्त भ्रमरू ॥
प्रिया तें बोलाविताती द्विजवरू : पंचमालापीं ॥ १६३ ॥
देखौनी मेघ-सांवळी श्रीमूर्ती : आनंदें मयुरें नृत्यें करीती ॥
शुकसारिका सवादेति : वेदान्तसिद्धान्ती ॥ १६४ ॥
वेधें एऔनि वृंदावनां : आडी गातातीं देवांगणां ॥
तेथ क्षेणु एकु श्रीकृष्णमना : स्छीराविलें ॥ १६५ ॥
जेथ सदा ऋतु सीं ऋतु-पती : यक्ष यक्षिणी क्रीडा करीती ॥
वन-देवतां नाचेती : आनंदभरीतें ॥ १६६ ॥

असो हे शब्दरचना : वर्णों नेणिजें वृंदावनां ॥
देउ पहावेआं जमुना : नीगते जालें ॥ १६७ ॥
कालिंदीजल निर्मल : श्रीकृष्णकांतीश्यामल ॥
प्रतिबिंबैली भणऔनि सु-नील : होऔनि ठेलीं ॥ १६८ ॥
भक्तिभावें उळगितां : केवि वर्णावी सायुज्यता ॥
जेआं चिआं सन्निधीं सरूपता : जडा जाली ॥ १६९ ॥
देखौनि श्रीचक्रपाणी : कैसीं सं-भ्रमीतु जाली तरंगिणी ॥
कीं आनंदैली अंतःकरणीं : ते रोमांचु दाटिलें ॥ १७० ॥
कीं आलिंगावेआं श्रीकृष्णराजा : तिआं बहुतीं केलिआं भुजा ॥
तैसें तरंगु पढियासलें मज : कालींदिअे चें ॥ १७१ ॥
मग आनंदसागरीं मीनिली : तैसी निश्चलु जाली ॥
कीं देह-भाउ विसरैली : श्रीकृष्णवेधें ॥ १७२ ॥
कीं जन्मैली देवां चां चरणीं : तें उतावेळु फुण असें मणीं ॥
भणऔनि भेटों आली मंदाकिणी : कालिंदी नोहे ॥ १७३ ॥
कीं श्रीकृष्णा चिआं संगतीं : आमुची फिटैलु अधोगती ॥
भणऔनि भेटों आलीं भोगावती : पाताळौनि ॥ १७४ ॥
आधी ची पढिजे पुराणीं : वरि-स्पर्शैली देवां चा चरणीं ॥
तेथौनि तिर्थां शिरोमणी : ऐसें बिरुद जालें ॥ १७५ ॥
सोमकांती बांधिलें घाट : जेथ हीरें नग वाळवंट ॥
मुक्तीगर्भ सूक्तिसंपुट : दीसतांती ॥ १७६ ॥
श्रीकृष्णकांती ची फांकितुसे किळ : तैसें ठाईं ठाईं इंद्र-नीळ ॥
रत्नकूटां ची के वाळु मौवाळ : ऊदका जवळीं ॥ १७७ ॥
कीं तें रत्नाकरां चे अर्धांग : भणऔनि आंगाथिलें ठाकलग ॥
तैसें पके वेळें सप्तांग : लेणें लेइलीं ॥ १७८ ॥
कीं कैवल्यनाथां श्रीचक्रपाणी : नवां रत्नां चीं उवाळनी ॥
करी कमळां ची उचलनी : तैसीं दीसतुसें ॥ १७९ ॥

उभअे कुळीं द्विज-वृंदें : निजकर्मरतें निःशब्दें ॥
दृष्टीपूतें ठेविती पदें : जैसें मुनीराजु ॥ १८० ॥

एकांगुष्टतपिअे बक : नासाग्रीं दृष्टी घालिती ढोंक ॥
यज्ञदीक्षीत तैसें चक्रवाक : प्रिया तें सांडिती ना ॥ १८१ ॥

प्रकृती-पुरुषविवेका तें : जैसें परमहंस जाणते ॥
तैसें क्षीरा नीरा निवाडु करीतें : निर्मळ राजहंस ॥ १८२ ॥

जेया चेंनी जडें वेधिती : लतातरू रोमांचु दाटेती ॥
पशु चरों विसरेंती : तो ध्वनी आईकौनिआं ॥ १८३ ॥

जेआ चेनी दृष्टीपातें : पांखिरूवें जाली आनंदभरितें ॥
हें कांईं वाणावे श्रीकृष्णां ते : जेआं चां नामी चि वेधु ॥ १८४ ॥

मेघीं झाकोळतेंआं रवीं चा प्रकाशु : न धरे पद्मिनीचा विकाशु ॥
तैसां गोप-वेखें गुप्त परेशु : परि वेधु संचरताती ॥ १८५ ॥

हातिरुवें सिंहे सीं खेळतु : मृग व्याघ्रा सीं कुरवाळें करितु ॥
मोरां चां पाखवां विश्रामतु : फणिकु देखा ॥ १८६ ॥

मूखकु मार्जरां चिअें पांलखतीं : अश्व माहिखां परमप्रीती ॥
जमुने चा पानिअेडा दीसतीं : निर्वैरें भूतें ॥ १८७ ॥

धन्य तेथि चीं जल-चरें : जिअें अवलोकिलीं ईश्वरें ॥
वरौतीं एऔनी आनंदभरें : पाळाति श्रीमूर्ति तें ॥ १८८ ॥

श्रीकृष्णां चें रूप सांवळें : जलां भीतरीं प्रतिबिंबेलें ॥
तें उतवेळुपणें आळांगिलें : सकलमत्स्यांदिकीं ॥ १८९ ॥

ब्रह्मादिकु भूलवीलें विज्ञानें : देवांगणां बरवेपणें ॥
चरांचरां वेधु जिअे चेनि गुणें : तें शक्तीं वाणौ नेणें ॥ १९० ॥

ब्रह्मचारी गृहस्छ : वानप्रस्छ यतीं सुस्नात ॥
नित्यक नैमित्यकें कर्में करीत : आश्रमुभेदें ॥ १९१ ॥

एक अघमर्षणीं रीगत : एक मृतिकास्नानें करीत ॥
एक कर्में चि तारकु मानित : नेणतीं पर-ब्रह्मातें ॥ १९२ ॥

घाटीं जपिआं चिआं कोडीं : कूर्मासनीं बैसलें त्रि-दंडी ॥
नमस्कारीं व्याकुळ एकदंडीं : जवळां चि देउ देखतींना ॥ १९३ ॥
आश्रमधर्मा चे नि अभिमानें : कर्मयागा चें नि यजनें ॥
ईश्वरतत्वां जें जाणणें : तें अरुतें चि ठेलें ॥ १९४ ॥
नसतां प्रकाशसंपत्ती : अंधःकारा तें दवडो पांती ॥
ईश्वरकृपें वीणु जाणौ भणतीं : परा वस्तू तें ॥ १९५ ॥
जैसा जवळां असतां परमात्मा : ठाउवा न होऐं विषयारामां ॥
तैसा श्रीकृष्ण मूर्त परब्रह्म : न देखती कर्मासक्तें ॥ १९६ ॥
हा अपराधु नाहीं जनां : प्रवृती निवृती ची कारणां ॥
साउमीली आइकां कथानुसंधानां : भणे मुनी केशवराजु ॥ १९७ ॥
ऐसी देखोनि जमुना : संतोषु जाला देवां चां मनां ॥
मग देतां जालां सूचना : गोपाळा सीं ॥ १९८ ॥
हां रे वत्सां करा ऊदकपानें : बरवीं जमुने चीं पुलिनें ॥
एथें करौं या भोजनें : खेळें-मेळें ॥ १९९ ॥
तिऐं वेळीं पाणिऐडां सूदलीं : थडिवां-चरावेआं टोंकिलीं ॥
मग आसनु रचिलें गोपाळीं : श्रीकृष्णां लागीं ॥ २०० ॥
जो राउ कैवल्या चा दानी : तो बैसीनिला तिऐं आसनीं ॥
मग आपुलालिआं मोटां घेऔनि : सकळै एतें जालें ॥२०१॥
गोपाळ तृप्त ब्रह्म-रसे : वरि देवांसीं प्रवृत्ती असे ॥
हें चरित्र करावेआं तोषें : ते भोजनुरचना ॥ २०२ ॥
होआवेआं श्रीकृष्णां नीडें : एरूं रीगें एरां पुढें ॥
ऐसेनी अघव चोहीं कडें : बैसितें जालें ॥ २०३ ॥
पांळातां नेत्रु आनंदेती : भणऔनि अघवें ची अभिमुखें होती ॥
तिऐ वेळीं विश्वतोमुख हे श्रुती : देवें साचु केली ॥ २०४ ॥
तेआं परमानंद-चंद्रा जवळी : गोपाळु तारागनां चिआं उळी ॥
कीं देवशिरोमणी चिआ प्रभावळी : रत्नपंक्ती ॥ २०५ ॥

सु-नीळे गगनीं मेघ-मंडळ : तैसें दीसतांती गोपाळ ॥
कीं ब्रह्मविद्ये तें ऊळगीतें सकळ : वेदुविद्यां ॥ २०६ ।
कीं परमात्मेआं जवळीं तत्त्वें : कीं आदिभैरवा भवंही भूतें ॥
तैसें आदिनाथा तें ऊळगतें : देवताचक्र ॥ २०७ ।
कीं परमपुरुषा चिअें गळां : ब्रह्मगोळकां चिआं माळां ॥
तैसें श्रीकृष्णां जवळें गोपाळां : मिरवतांतीं ॥ २०८ ।
जाळिआं मोटां सोडीतिं : आपुलालीं अन्नें आणिती ॥
रुचिकरें शाकें वाणीतिं : श्रीकृष्णां पुढां ॥ २०९ ।
एकें वेडें विचित्रें अन्नें : चाखिलीं जगज्जीवनें ॥
गोपाळां प्रसादु भोजनें : होआवेआं ॥ २१० ।
मग देवा चां पांतिकरीं : अन्नें घातेलीं कमलदलां वरी ॥
एकीं सुरतरूं चिआं मंजिरी : आंथुरैलिआं ॥ २११ ॥
एकीं घातेलीं कमलवनें : एक वृक्ष-त्वचां चीं भाजनें ॥
एकीं पोमिनी चीं पानें : कारितांतीं ॥ २१२ ॥
मग देवां चां राऊ श्रीमुरारी : दधीभातु घेऔनि श्रीकरीं ॥
आवळें बेलें आंगुलिआं माझारीं : मिरवतांतीं ॥ २१३ ॥
कीं तिअें ब्रह्मादिकें पदें : हातीं घेऔनि परमानंदें ॥
उदारपणां चेनि विनोदें : गोपाळां देआंवेआं ॥ २१४ ॥
कीं तो राऊ कैवल्या चा दानी : भणऔनि ब्रह्मविद्यां हातीं घेऔनि ।
पाळांतुसें देआंवेआं लागौनी : शरणागतां तें ॥ २१५ ॥
उभा ठाकैला गोपि–नाथु : बरंवेआं चां राऊ श्रीमंतु ॥
रळियां रापढ़ाळिया करीतु : गोपाळां सीं ॥ २१६ ॥
आडनामीं वमीं बोलावितु : गोपाळ हांसां आड-पडनु ॥
तेवीं ची अमृतां दृष्टीं नीववीतु : सवंगडेयां तें ॥ २१७ ॥
इंद्रनीळां ची दिप्ती : नीलोत्पलां चीं कांती ॥
एकवटलीं तैसी सांवळी श्रीमूर्ती : मिरवतुसे ॥ २१८ ॥

सकुमारें चरणकमलें : आनंदमकरंदु बहळें ॥
जेथ मुनीजनु अळि-कुळें : लुब्धें जालीं ॥ २१९ ॥
ध्वजवज्रपद्मांकितें : लावण्यें लक्ष्मी रंगली जेथें ॥
जिअें पुरविलींती मनोरथां तें : सेवकुजनां सीं ॥ २२० ॥
जेंआं चिआं नख-चंद्रदिप्ती : भक्तसोमकांतें द्रवेती ॥
योगीजनुकुमुदें विकाशती : निवारी तापत्रयें ॥ २२१ ॥
जैसें परिसें लोह-होअे-कनकु : तैसें चरण-रजें जालें उदकु ॥
परि फेडी जगाचें महा-पातकु : संग-मात्रें ॥ २२२ ॥
सुवृत्त अहरते जंघायुगळ : धनीं पीटिलें तैसें जानुविभाग ॥
जेथ जन्मभूमी अनंग : ते न वर्णवे कटीस्थानु ॥ २२३ ॥
तेजा चां गुणीं विनिला : पव्हरे यशो निरंगे-रंगिला ॥
तो पीतांबरू असें वेढिला : मालगंठी ॥ २२४ ॥
वरि मेखळा रत्न-खचीती : जेथ क्षुद्र-घंटिका रूणझुणिती ॥
जैसिआं श्रुती भणती नेती : तेयां पर-ब्रह्मां तें ॥ २२५ ॥
नादु ब्रह्मा चा घडला : कीं सांभव वेधु मूर्ती सीं आला ॥
तो वेणु असें खोंविला : परि-वटां माझी ॥ २२६ ॥
ब्रह्मगोळकां अ-पारां : भीतरीं एतेंजातें द्वारां ॥
तैसां नाभी-कमळीं भोंवरा : मिरवतुसें ॥ २२७ ॥
मुक्तीक्षेत्रीं आनंद-वल्ली : तैसीं दिसें रोमावळी ॥
कीं मुनीजनुभ्रमरां चिआं अळीं : तिअें नाभिकमळीं ॥ २२८ ॥
त्री भुवनु सामाविलें भीतरी : तो उल्लासु दिसें ऊदरीं ॥
त्रि-वळी मिरवे जेआं वरी : जोवि मर्यादा केली ॥ २२९ ॥
जेआं वक्षस्थला तें अळगतां : लावण्यश्री जाली सायुज्यता ॥
तेथ कौस्तूभसें मिरवता : पदक एकावळी ॥ २३० ॥
जे विराश्रिया वल्लभे वरिलें : अभय-दानीं वाखाणिलें ॥
तें भुजा-दंडु मिरविलें : श्रीमंत सरळ ॥ २३१ ॥

जेआं चेनि गजरें अभंग : त्रासु पावतीं दैत्यां चें संग ॥
ते काखें घातलें असे सिंग : मुरारि-मलें ॥ २३२ ॥

सु-नीळे गगनीं विस्फुरतु : जैसीं कां विद्युलतु ॥
तैसा फूटा असे मिरवतु : स्कंदा-वरी ॥ २३३ ॥

त्री-रेखीं अलंकृतु : कंठु मिरवे सुवृत्तु ॥
जो प्रमदासें आलंगितु : वैजयंतियां ॥ २३४ ॥

कवण श्रीमुखा चें बरवेंपण : केसें सदोदितु सुप्रसन्न ॥
तेआं चें इंदु लाहातां पाईकपण : वरि कलंकिआं न होता ॥ २३५ ॥

जेथि चें लावण्यु पांतां : जगाचिआं डोळेआं घडे पडता ॥
आनंदामृतपान होता : संसारतृसां ॥ २३६ ॥

एककीं अवअेवीचा बरवेंपणी : मदना ची कीजे ओवाळनीं ॥
तेआं श्रीमुखा ची सारिखी वांटणी : चंद्रा सीं कैची ॥ २३७ ॥

जेथिचें अमृतघोळिलें बोल : फेडितीं महा मोहा चें पढळ ॥
तें न वर्णवे श्रीमुखकमळ : आदिपुरुषां-चें ॥ २३८ ॥

हास्यु कारितां गोपाळा : दंत-पंक्ती ची फांकतुसें किळा ॥
ते सानुराग सु-निर्मळा : जैसी कां ब्रह्मविद्या ॥ २३९ ॥

सरळ सुप्रसन्न नयन : देखतांती त्रिभुवन ॥
ते सांगों जातांती श्रवण : जैसें कानें मातु तें ॥ २४० ॥

जेआ चेनि लीलानुकारें सृष्टी उपजे संहारें
तिअें मिरवतांती धनुषाकारें : भूमंडळें ॥ २४१ ॥

कमलकार्णिकां श्रवणीं : माजी गुंजा ची खेवनी ॥
रत्नें होतांति ढेंगणी : तें देखौनिआं ॥ २४२ ॥

अर्धचंद्र टिळा भालस्थलीं : सुनीळें कुरळें तें ची भ्रमरांवलीं ॥
लुब्ध जाली परिमळीं : मुखकमला चां ॥ २४३ ॥

मोरपिसां चिअें निहटीं : मिरवे सुढाळा मौक्तिकां चीं वेढीं
बिरलीं रुळतिअें वीरगंठी : जाति केतकीदळें ॥ २४४ ॥

गुणलावण्या चें निधानु : जो कमनीयु त्रीभुवनु ॥
तो न वर्णवे एकी रसनु : प्राकृता मसीं ॥ २४५ ॥
ऐसा सुंदर श्रीचक्रधरू : आरोगन करीतुसे स-परिवारू ॥
ब्रह्मादींकुं न लहाती अवसरूं : गगनीं पांतु ठेलें ॥ २४६ ॥
पांतिकरां होतसे भोजन : तें अमृता सीं नाहीं गोडपण ॥
ते व्हेळीं अन्नब्रह्म हें वचन : देवें साचु केलें ॥ २४७ ॥
देव अमृतपानु करीती : परि तथोंनिआ पुढती ॥
जन्ममरणें नित्रारितीं : श्रीकृष्णप्रसादें ॥ २४८ ॥
तेआं चें देखौनि सदैव-पणा : आपणपें धिःकारितीं सुर-गण ॥
भणोति सांडौनि मुकुटां चें भूषण : रीगो गोपाळां माजी ॥ २४९ ॥
या चां चरणें सीं होओ संन्निधी : तरि तरीजैलु भव-जलधी ॥
तिर्यंचें पावतांती सिद्धी : ते आम्हां देवपणें नाहीं. ॥ २५० ॥
ऐणें कैवल्यनाथें वीण : पारुखे ना आगमन ॥
तरी रीगों ययां शरण : सर्वभावीं ॥ २५१ ॥
परि देवपणें नाहीं अधिकारू : हा उंळगावेआ श्रीचक्रधरू ॥
एऱ्हवीं या चेंनि दास्यें संसारू : निभ्रांति तरतो ॥ २५२ ॥
उसिटें लाहावेआ चें सायासु : तेथ सेवे ची कवणि आसु ॥
पथ रीगों नओ आपैसु : ययां ची कृपे वीण ॥ २५३ ॥
आघासुराचां मोक्ष देखौनु : विस्मयो पातिला चतरानन ॥
वरि देवां चे बोल आइकौनु : कांई वदतां जाला ॥ २५४ ॥
अवतरलासे कैवल्य-दानीं : हा ध्वनी पडिलासे माझां कानीं ॥
तें पाहों आलां लोचनीं : तंवं नवल बळ देखिलें ॥ २५५ ॥
कें गोपाळ-वेखें खेळनें : कें आघासुरां मोक्षु-देणें ॥
हें आम्हां देवां तें भूलविणें : पुरुखु सामान्यु नोहे ॥ २५६ ॥
आतां गोपाळवांसुरुवें चोरूं : मग जाणिजैलु हा निरधारूं ॥
मागिला सारिखा अवतारूं : कीं कांहीं नवाइसें ॥ २५७ ॥

ऐसें निर्धारिलें चित्तीं : एणे सत्य-लोकींचेनि पतीं ॥
जंवं कैवल्यनाथा जाली प्रवृत्ती : आरोगणविनोदीं ॥ २५८
गोपाळें प्रसादु-भोजनें आनंदैलें : मी माझेंपणु विसुरैले ॥
तंवं देउची पाहावेआं निगालें : वासुरुवां तें ॥ २५९
चरतें चरितें दूरि गेलीं : तेथौनि ब्रह्मेनी नेलीं ॥
मग सर्वज्ञ-नाथें नटणा केली : भवंतीं पाहों ठेलें ॥ २६०
तंवं एरी कडे चतुराननु : गोपाळ नेलें करीतु भोजनु ॥
जंवं श्रीकृष्ण मागौतें आलें जमनु : तंवं ते हीं न दखतीं ॥ २६१
जेआं ईश्वरां चिआं प्रवृत्तीं : ब्रह्मेयां चिआं कोडीं उपजेतीं ॥
तेआं वांसुरुवें आणितां मागौती : सायास कवनु ॥ २६२ ॥
परि चतुराननु भूलवावां : पवाडा थोरू करावां ॥
गोपगो-धनां संबंधु देआवां : निजस्वरूपा चां ॥ २६३ ॥
या काजां देउ नेणता जाला : तंवं ब्रह्मां निज-भुवनां गेला ॥
गोपवांसुरुवां सुखाडु केला : राउळींचीं भणौनी ॥ २६४ ॥
कीं तें मज गमलें आन : करितां श्रीकृष्णां चें सन्निधान ॥
तेआं कांहीं जालें विघ्न : भणौनी ब्रह्म-पदां नेलीं ॥ २६५ ॥
ना तरि जालेंआं ईश्वरा चें पण : पशु सीं तिहीं लोकीं विचरण ॥
हें दाखविलें समर्थपण : नारदादिकां ॥ २६६ ॥
कीं वस्तू चीं जवळीक जाली : भणौनि सिद्धावस्था पातलीं ॥
ना तिअे ऋद्धी भोगावेआं नेलीं : सत्यलोका सीं ॥ २६७ ॥
कीं श्रीकृष्णां चें उसिटें सेविती : तें ब्रह्मादिकां वंद्य होतीं ॥
साहानुक सत्यलोकु भोगिती : शेखीं कैवल्यपद ॥ २६८ ॥
असो हा बोलां चा विस्तारू : कांई करिता जाला नंदा चा कुमरू ॥
जो आदिमरूपा चा अवतारू : आर्त्त रक्षावेआं ॥ २६९ ॥
गोकुळां जाती जाली वेळ : तंवं आपण ची जालें वच्छें गोपाळ ॥
एऱ्हवीं गाई स्त्रियां चें मन व्याकुळ : निऱ्हां होतें ॥ २७० ॥

अवतरैलासि परमात्मा : तेथ दुःख नाहीं भूत-ग्रामां॥
तेआं चिंअे-दृष्टी पुढें संसार धर्मा : रीगावां नाहीं ॥ २७१ ॥
तेआ तें आइकौनि जें भाविती : तें मायामोहीं सांडीजेतीं ॥
आनंदसागरू श्रीकृष्ण सेविती : तें होतीं जीवन-मुक्त ॥ २७२ ॥
आधीं ची देउ सर्वगतु : वरी तैसां ची जाला मनोरथु ॥
तेतुलीं रूपें धरौनि असे खेळतु : हें कांई नवलु हेआं ॥ २७३ ॥
जेआं ची जैसीं प्रकृती : जैसा वर्तणु जैसीं आकृती ॥
तें तो जाला कैवल्यपती : एकें वेळें ॥ २७४ ॥
एकु केवि जाला अनेकु : ऐसें बोलें नेणता लोकु॥
तरि सहस्रघटीं शशांकु : प्रतिबिंबतुसे ॥ २७५ ॥
जैसा मणि-गणीं तंतु : मेघावलीं गगनांतु ॥
तैसा भूतीं विश्व-नाथु : कीं भूतें तेआं माजी ॥ २७६ ॥
हा कवनु करि निरधारू : जो वेदीं बोलता अपारू ॥
जें श्रीकृष्णु कृपा करी आदिगुरू : तें भ्रांती फिटे ॥ २७७ ॥
जेआ चिअें घरींचीं कामारी : ब्रह्मांडें निजरूपें आकारी ॥
तो वासुरूवां चीं रूपें धरी : हें कांई विशेषांवें ॥ २७८ ॥
परि ईश्वरा चीं लीलाप्रवृत्ती : भणौनि निन्हांसें वाखाणीजेतीं॥
जें आइकौनि जीवें मुंचती : संसारदुःखें ॥ २७९ ॥
दूधवडीची कराडिं कांबरीं : रोद्रं चीं सोनेखैरीं ॥
निन्हां तेजाथिरीं भांगाळीं : जुआं सांगडीं ॥ २८० ॥
एकें मोहरीं मोरी पारडीं : एके वाघी चितळी पुंडीं॥
आणिके देशशाया सांगडी : कोसी कनकवर्णी ॥ २८१ ॥
क्षीरसागरा चें जाउपें तैसीं धवळीं : एकें शुद्धें तांबीं नेपाळी॥
इंद्रनीळें प्रभे चीं नीळीं : विविधवर्णा ॥ २८२ ॥
धेंनु सी होताति गर्भधानें : श्रीकृष्णा तें चिंतिताति मनें ॥
तें बहत दीसतुसे काळें वानें : वासुरुवां सी ॥ २८३ ॥

[stamp]

गोपवनिता चें कवणु जाणें : जिआं उमटलें ते कि नाणें ॥
काटकीं भृंगी होअे जेणें : ते काँई तया नाहीं ॥ २८४ ॥
एक काळें गोरें सांवळें : एक काणें तारसें वेंभळें ॥
एक मीरवलें भुरळें पींगळें : घोडमुखें ॥ २८५ ॥
एक बहिरें मुकें बोंबडें : एक वेडें बागडें दीघडें ॥
एक दांतिरें राखोडें फेंगडें : जामुन खुजें ॥ २८६ ॥
एक निऱ्हां सगुण साकारू : एक श्रीमंतु सुन्दरू ॥
जैसें देवतां चे अवतारू : तैसें दीसतीं ॥ २८७ ॥
जेआं चा जैसा शृंगारू : जैसीं वस्त्रें जैसा अलंकारू ॥
तें तो जाला सर्वेश्वरू : आदिनाथू ॥ २८८ ॥
पावें तारपीं मोहरीं : सींगें डांगा पेंडारी ॥
राजसां तामसां भावा चीं परी : ते हीं नटिला तो ॥ २८९ ॥
ऐसें अवगौनि मुरारी : येतुसें गोकुळा माझारीं ॥
तंव संभ्रमु जालीं नरनारीं : तो वाणौ नेणिजे. ॥ २९० ॥
जेआं चेनि तुषारें एकें पीजे : तेआं अमृता चां सागरू पाविजे ॥
परमाणु दुर्लभ माणिजे : तेउयां चा मेरू जोडे ॥ २९१ ॥
तैसें गोकुळजनां सीं जालें : जें न पाविजे कव्हणें बोलें ॥
तें घरपूसत आलें : पर-ब्रह्म देखा ॥ २९२ ॥
आधीं वाणिजे जैशोदा नंदु : जेआ घरीं खेळे एकु गोविंदु ॥
आता घरोंघरीं परमानंदु :॥ गौळिआ चा ॥ २९३ ॥
सांडौनि सकळैक संगातें : योगिअे चिंतिति जेआं तें ॥
पुत्र-भावें आलिंगिता तेआं तें : ते सुख कैसें होईल ॥ २९४ ॥
जरि मुखें मागिजेति शेपा तें : तरि वाणौ नेणिजे तेआं चेआं दैवां तें ॥
जेआं घरीं लेंकुरुवें सालंकृतें : परब्रह्मा चीं ॥ २९५ ॥
कवण ठाउ॰ वेऱ्हीं सदैव-पण : जे वस्तु निराकार निर्गुण ॥
तें आळि करौनि मागे जेवण : गौळनीं ते ॥ २९६ ॥

अगाधु चांतु स्तवितां : न बोले वेदां बोलवितां ॥
तो गाई हंबारव करितां : पाठीं धावे ॥ २९७ ॥
योगियां नावरे कव्हणीं परी : ठाउ नें दी यजितां स्वाहाकारी ॥
तो जेवीतुसे घरों घरों : गौळिआं चां ॥ २९८ ॥
जो तृत ब्रह्मरसें : आत्मारामु होऔनि असें ॥
तो देखा ढेंकुर देतुसे : ताकें दुधां ॥ २९९ ॥
देहांद्रिआं तें दंडौनी : जेआं पाठीं धांवती मुनी ॥
तो गौळिआं शयनासनु भोजनीं : सुलभु जाला ॥ ३०० ॥
यजितां अनेकीं अध्वरीं : न रीगेसी दीक्षीतां चां घरीं ॥
कां लोळसीं गौळिआं द्वारीं : श्रीकृष्णा तें तूंचि जाणसीं ॥ ३०१ ॥
परि भक्ति एकीं सलभु मुरारी : हे आणविलें यया परी ॥
जो उळगीजे सुरवरीं : तो गोवळ गौळिआं सीं ॥ ३०२ ॥
जरि भणावें विज्ञानु रचिलें : तरी सकळां सीं प्रेम वाढीनिलें ॥
हे न घडे आने बोलें : तुझिअें कृपें वीण ॥ ३०३ ॥
घरींचीं सांडोनि तान्हीं : गाई बाइलां पढिअेताति जाणी ॥
ते प्रीति सहस्त्रवदनीं : शेषु वांणों नेणें ॥ ३०४ ॥
श्रीकृष्णरूपें डिंभें देखतां : उरसे पाण्हाउ न धरें माता ॥
तेणें दुग्धें भरीलिआ सरितां : गोकुळा माजी ॥ ३०५ ॥
कीं आदिपुरुष जाला दूधपीरू : तेआं करावेआं पाहोनरूं ॥
नारायणें धाडिला क्षीरसागरू : मज पांतां ॥ ३०६ ॥
तेथ असें कैवल्यपती : भणओनि घरां रीगालिआ सकलसंपत्ती ॥
ऋद्धिसिद्धीं अवसरूं पांती : उळगावेआं ॥ ३०७ ॥
घरोंघरीं परगुणें : होतुसें मर्दना मादनें ॥
दीव्यु लाविताति चंदनें : सुगंधुपुष्प-जातीं ॥ ३०८ ॥
पेडपीं होतुसें आरोगणु : उंवाळौनिआं नींब लोणु ॥
वीडां देऔनि श्रीचरणसहवाणु : करतांतीं ॥ ३०९ ॥

क्षीरोदका पासवडेआं वरी : पहूडतुसे राऊ मुरारी ॥
वीजणे जाणवीति विद्याधरी : दास्य करीतांती ॥ ३१० ॥

पाहातेआं पाहारां दधि-मंथनी : गौळनीं गातीं श्रीचक्रपाणीं ॥
तो ध्वनी आयकौनि श्रवणीं : देऊ उपहौडलें ॥ ३११ ॥

एकी गातीं श्रीकृष्णचरित्रातें : परिअे देतीं बालकां तें ॥
तिअे आइकौनि निजकीर्ती तें : श्रीकृष्ण तोखतु ॥ ३१२ ॥

मंगलरागा तें आळवीत : चतुर्विधा दंडीचे विद्यावंत ॥
एकसुहावीं रूपकें गात : राया गोविंदा चीं ॥ ३१३ ॥

बंदीजन मागध नागारी : पवाडे पढीति नानां परीं ॥
तेआं जाणा चा राऊ मुरारी : देत पसाअेदान ॥ ३१४ ॥

ऊवाळौनिआं मंगलोच्चारू : मंत्रघोषु करीति द्विजवरू ॥
स्तविताति योगीश्वरू : कैवल्यापती तें ॥ ३१५ ॥

तंवं उदेला दिनकरू : बलिभद्रे सीं नंदा चां कुमरू ॥
निगाला वांसुरुवें चारूं : वृंदावनां ॥ ३१६ ॥

गोवर्धना चां पाठारीं : गोधनें चारितांतिं खीरांरीं ॥
तळवटीं असे राऊमुरारी : वत्सपाळरूपें ॥ ३१७ ॥

तेआ चां आइकौनि वेणुध्वनी : आनंद जाला धेनु चां मनीं ॥
श्रीकृष्णरूपें वत्सें देखौनि : चरौं विसुरिलिआं ॥ ३१८ ॥

माडां चीं सप्रेमळें चित्तें : वरी वेधिलीं गोपिनाथें ॥
तिआ न सांभाळितीं आपणपआं ते : तेथौनि उढावलि आं ॥ ३१९ ॥

गोपाळु माघारिआं वळितीं : परि धेनू बंबाळैलिआं न संवरेतीं ॥
जैसिआं अ-निवारूं शक्ती : ईश्वरीचिआं ॥ ३२० ॥

जैसें कर्म-मार्गा तें सांडौनी : ब्रह्मज्ञानीं प्रवर्तैलें मुनी ॥
तैसिआं निजपथां तें लंघौनी : आधाडा उतरितांती ॥ ३२१ ॥

तिआं स्नेहो दूधभरितां सरितां : आनंदसागरीं मिळतां ॥
कीं वत्सशिशुआं वरी वरिषतां : मेघवृष्टी ॥ ३२२ ॥

*

कीं महंता ची मती : दशोपनिषदां चिआं श्रुती ॥
कीं सांबवादिका मूर्ती : पाळांती ईश्वरा तें ॥ ३२३ ॥
वारौनि उतरतां गोवर्धना : कैसिआं तें धापसिआं पढिआसलिआं मनां
कीं अंतराळौनि देवांगना : श्रीकृष्णवेधें ॥ ३२४ ॥
वत्सां मीनलीआं धेनु : दर्शनें निवालिआं तनु ॥
स्पर्शसुखांतें तें सहस्रवदनु : वाणौ नेणें ॥ ३२५ ॥
तिअें वांसुरुवें तरि जाणी : परि परमानंदु भरलासे मनीं ॥
तेणें धातुआदिकरौनी : अमृत उ‍ळतांती ॥ ३२६ ॥
वत्सां करितां स्थनधानु : धेनु चां न सावरे पान्हु ॥
तेणें होतसें त्री-भवनु : क्षीरभरितु ॥ ३२७ ॥
जैसें योगिअें हृदंई प्रवेशविती : इंद्रियद्वारां ईश्वरमूर्ती ॥
तैसिआं धेनु चाटितां दीसती : वांसुरुवां तें ॥ ३२८ ॥
गौळीं आलें गो-धनां पाठीं : ते पुत्रसुखरूप देखौनि दृष्टीं ॥
आनंदु जाला तो अे सृष्टीं : निरौपमू ॥ ३२९ ॥
प्राकृतां अपत्यां चें आलिंगण जालेआं भीवतीं सकळै जन ॥
वरि तें कैवल्यानंदुघन : बालवेषें ॥ ३३० ॥
नेणतां कीजे अमृत-पानु : तरी मानवां होअें अमर-पणु ॥
तैसें पुत्र-भावें ब्रह्मालिंगनु : दे निर्वाणसुखा तें ॥ ३३१ ॥
सगुणा इश्वराचिआं संगतीं : कैसीं जीवस्वरूपें नीवतीं ॥
तें निरौता खुणू जाणेंती : भक्त-योगीजनु ॥ ३३२ ॥
गाईं गौळियां चें प्रेमु देखैनी : विस्मयो जाला रामा चां मणीं ॥
मग ज्ञान दृष्टीं ठाकौनीं : निहाळितां जाला ॥ ३३३ ॥
मग वदे बलिभद्र देउ : हा देखो दिव्यशक्तीं चा प्रभाउ ॥
कीं हा आपण चि देवां चां देउ : ऐसें खेळतुसे ॥ ३३४ ॥
कवण जाणें यां चें महिमाण : एणें मुखा माजी दाविलें त्रिभुवन ॥
राक्षसी पूतने चें शोखण : केळें स्थनपाणु करितां ॥ ३३५ ॥

आणीक एकु नवल जालें : जै अर्जुना चे रुख मोडिलें ॥
तै आम्हां दिव्य-पुरुष दाखविलें : एणें श्रीकृष्णें ॥ ३३६ ॥
अनंता सृष्टीं जेआं ची करणी : तो अवतरिला इअें मेदिनीं ॥
भक्तकैवारी श्रीचक्रपाणी : मायावेषें ॥ ३३७ ॥
जीवु प्रकृती पासोनि उजिडे : जेणें भव-बंध विघडे ॥
तो हा करितुसे पवाडे : आर्ती रक्षावेआं ॥ ३३८ ॥
ऐसें निरधारिलें ज्ञान-पथें : मग पाळाइले वत्सगोपाळां तें ॥
तंवं अवधी चीं वस्त-रूपें मूर्तें : पढियासलीं ॥ ३३९ ॥
एरें प्राकृतें कांईं जालीं : तंवं देखे ब्रह्मेनीं नेलीं ॥
भणे हां चि खेळतुसे अणेकीं खेळीं : स्वामी माझा ॥ ३४० ॥
तंवं शंकर्षणु देवां तें भणे : तुझें महिमानु कवण जाणे ॥
जेणें एके शक्ती चेनि गुणें : ब्रह्मां अपमानिला ॥ ३४१ ॥
देवा तुझें अवतरण : दुष्ट दैत्यु निर्दलन ॥
शरणागता चें उद्धरण : करावेआं ॥ ३४२ ॥
वस्तु संबंधें बोधु पातैला : भणऔनि स्तुती करौं लागेला ॥
तंवं हास्य करौनी श्रीकृष्णें मोहिला : बळिभद्रदेऊ ॥ ३४३ ॥
मग गात प्रभुचरित्रां तें : आनंदवीतु त्रीभुवनां तें ॥
पुढां करौनि वांसुरवां तें : आले गोकुळा माजी ॥ ३४४ ॥
ययां परी प्रत्यदीनीं : देऊ खेळे गोकुळ-वृंदावनीं ॥
तंवं से जाली मनीं : चतुराननां ॥ ३४५ ॥
ब्रह्मेआ चां क्षण एकु भरिला : तंवं संवत्सरू पालिटैला ॥
मग तो आपुलें केलें पाहौं आला : मर्त्यलोकां ॥ ३४६ ॥
तंवं विवरौं लागैला चित्तीं : हा देखा सत्यलोकिचा पती ॥
अधुना गाई स्त्रियां कांई करीतीं : निन्हा मोहाकुळां ॥ ३४७ ॥
परि नेणें ईश्वरां चें महिमान : जेणें आनंदवीलें त्रीभुवन ॥
तेआं चीं होतीं तेआं व्याकुळपण : हें केंवी घडे ॥ ३४८ ॥

सिंहा चें बल विसरैला : जसा गजु मदां चढला ॥
तैसा असासितु बोलों लागैला : चतराननु ॥ ३४९ ॥
चोरा शंखा पाठीं धावीनिला : हरिणाक्षु मारिला ॥
हिरण्यकशिपु विदारिला : अतुलबलिआं ॥ ३५० ॥
तें शक्तिसामर्थ्यु कें गेलें : कां तेणें अभिमानु सांडिलें ॥
कीं अवक्रिअे ब्रह्मु अवतरैलें : हें साच मानों ॥ ३५१ ॥
कीं मानुषपणां आवगला : भणऔनि सत्यलोकां एऊ बिहाला ॥
कीं नवल प्रपंचु रचिला : तेणें देवराअें ॥ ३५२ ॥
ऐसें विवरितु चतुराननु : आला निज भुवनां पासौनु ॥
तंवं प्रतापु देखिला गहणु: विज्ञान शक्तीं चा ॥ ३५३ ॥
पावेआं सिंगां चा गजरीं : पडिसादु पडितांअें अंबरीं ॥
सुताल ताल घोळ मोहरी : वातांतीं ॥ ३५४ ॥
विसरौनि देह-भावां तें : गातु श्रीकृष्ण-चरित्रां तें ॥
गोपवांसरुवं आनंदभरितें : देखियेलीं ॥ ३५५ ॥
भणें मीं आला एथें : तंवं तिअें आणिली गोपि-नाथें ॥
ज्ञान-दृष्टीं पाहे मागौतें : तंवं देखे सत्यलोकीं ॥ ३५६ ॥
पुनरपि पाहे भू-मंडळीं : तंवं समवेतु वत्सगोपाळीं ॥
श्रीकृष्णु मिर्वतुसे गोकुळीं : जो सृष्टीं निरोपसु ॥ ३५७ ॥
ययां परि दों ठाईं पांतां : संदेहां पडिला सृष्टी कर्ता ॥
तंवं आणिक एकु जाला देखतां : तें परिअेसां पां ॥ ३५८ ॥
सकळ हीं चतुर्भुज गोपाळ : करीं शंख चक्र गदा कमळ ॥
पीतांबरधारीं सुनिळ : कौस्तुभकंठीं ॥ ३५९ ॥
पदकीं नीळेंआं ची खेवनी : भुजीं अंगदां ची मिरवणी ॥
मकरकुंडलें श्रवणीं : झळकतांतीं ॥ ३६० ॥
सकल-मुकुट-पाटवर्धन : वन-माळां विराजमान ॥
आघवें श्रीवत्स-लंछन : देखिअलें ॥ ३६१ ॥

तंवं तिन्हां विस्मयो पातैला : मग मनीं निर्धारों लागैला ॥
तंवं एकैकू ब्रह्मा देखिला : एकैका पासीं ॥ ३६२ ॥
धरोनी साकारू मूर्ती तें : एकैका पासीं सकळें तत्त्वें ॥
उंपासतातीं एकमेंकां तें : शक्तिचक्रें ॥ ३६३ ॥
ब्रह्मा विष्णु महाकाळु : सकलसव्हानदिग्पाळु ॥
सप्तसमुद्राष्टकुलाचळ : मूर्तधारी ॥ ३६४ ॥
आणिकें हीं महाभूतें खेचरें : क्षुद्रदेवतां जलचरें ॥
तिअें देखिलीं सपरिवारें : उंळगतां ॥ ३६५ ॥
ते व्हेळीं मज गमलें ऐसें : जे देवां तें थोर विसुरासें ॥
भणऔनि दारवाळा पांतुसें : सर्वदळा च्या ॥ ३६६ ॥
कीं देवतां तें सदा उंळगतां : परि तें रूप कहीं न देखतीं ॥
भणऔनि पाहों आलीं श्रीमुर्ती : परब्रह्मा चीं ॥ ३६७ ॥
श्रीकृष्णां चीं नवलें कवतुकें : जो नारायणु नाभीकमळीं कूकें ॥
तो ब्रह्मांडें देखताअें अनेकें : भू मंडळीं ॥ ३६८ ॥
चतुराननां नाहीं मनी : ते व्हेळीं भणों लागैला चित्तीं ॥
अठवें साचु कीं भ्रांतीं : तें जाणावे ना ॥ ३६९ ॥
जैसें साटके चें अग्निस्तंभनु : तैसा जाला चतुराननु ॥
कवण मीं कवण स्थानु : ऐसा विसरौनि गेला. ॥ ३७० ॥
एकैका गोपाळां चीं रिद्धी देखौनु : भूलैला चतुराननु ॥
परि एकैका सीं थोर अभिमानु : जाणुपणा चा ॥ ३७१ ॥
ऐसें आं ब्रह्मआं चिआं कोडी : रोम-कूपीं असतीं एकी कडी ॥
तेआं रूपा ची थोरी केवढी : कवणु जाणें ॥ ३७२ ॥
तेआं ईश्वराचें करणें : ठाउवें करों आला ब्रह्म पणें ॥
सुखें असें ना लेंकरुवेंपणें : सत्यलोकीं ॥ ३७३ ॥
सांडा सांडा अहंकारा : अनुसरा श्रीचक्रधरा ॥
मग जाणाल परात्परा : विचारा तें ॥ ३७४ ॥

तो ची धेआवां मनीं : तेआं चे पवाडे आइका वे कानीं ॥
भणे कैशवराजु मुनी : श्रोतेयां तें ॥ ३७५ ॥
हे चि नारदु भणे ब्रह्मेआं तें : आझौनि सांडौनि अहंकारा तें ॥
उ॰ळगै श्रीकृष्णा तें : भ्रांती फिटावेआं ॥ ३७६ ॥
मग ब्रह्मसुतु गोकुळा सीं आला : तेणें श्रीकृष्णु देखिला एकला ॥
विस्मयो पाऔनि भणों लागैला : नेणीजे चरित्र तुझें ॥ ३७७ ॥
माते पितया देखतां : बळां भूलि टाके सर्वथा ॥
तो बोलु कवणां सर्वज्ञनाथा : हें विचारि पां ॥ ३७८ ॥
मशंकां चें पाहावेआ ताराण : कांई सिंहा चें विचरण ॥
तुझी शक्ती विश्व-मोहन : तेथ ब्रह्मा कांई ॥ ३७९ ॥
राउळींची चोगी केली थोरी : ते उपसाहावा जी मुरारी ॥
कां सृष्टिकर्त्ता पूर्व धरी : भणऔनियां ॥ ३८० ॥
नारदा चेआं बोला हासिनिला : भणें म्हातारपणें भूलैला ॥
मग अपराधु उपसाहिला : कृपा-वंतें ॥ ३८१ ॥
प्रसन्न जाला देवां चां राउ॰ : आकर्पिला दिव्यशक्ती प्रभाउ॰ ॥
तवं देखिलें तें जालें वाउ॰ : एकला श्रीकृष्ण साचु ॥ ३८२ ॥
फीटली ब्रह्मेआं ची भ्रांती : देउ॰ देखिला आनंदमूर्ती ॥
चिद्घणु श्यामल-कांती : पुतळा कैवल्याचा ॥ ३८३ ॥
आरोगितु निगाला : तेणें चि वेपें नटला ॥
गोपवांसुरुवें पाहों लागैला : वना माजी ॥ ३८४ ॥
तो चि दधी-भाता चा उंडा वामकरी : आवळें वेलें आलेआं चिआं फडतरीं ॥
धरिलिआं असतीं आंगूलिआं माझारीं : परमानंदे ॥ ३८५ ॥
मग दातारा जवळिकें आला : विनत्कंधरें नमस्कारू केला ॥
मग तो विणवितां जाला : करां जोडौनीं ॥ ३८६ ॥
भणें जालेआं रवीचा प्रकाशु : न दिसे खद्योतांचा अभासु ॥
तैसा माझियां बुद्धि चा विकाशु : तुज पुढें ॥ ३८७ ॥

परमाणु ची केसनी थोरीं : परि मेरू सीं हीं करी सरी ॥
तैसीं मिआं केली परी : तूं सीं देवा.	॥ ३८८ ॥
मशकां प्रौढी खग-पती सीं : विरुळेआं शेखें सीं सरी सीं ॥
तैसें मिआं केलें तुजसीं : प्रभु आदिनाथा	॥ ३८९ ॥
कीं कोल्हा मर्दे न सांभाळी : सिंहेन सीं बोले बिरुदावली ॥
तैसीं मिआं केली थोरी आगळीं : तूं तें नेणौनिआं	॥ ३९० ॥
उदरीं करी चलनवलनां : तेआं दुःखां नाहीं गणनां ॥
माते सीं निन्हा लोभाळुपणा : तेणें बालकें जीती	॥ ३९१ ॥
रोगिआं विरुद्ध बोलतां : वरि वैद्यु अवेळु करितां ॥
तरि तेआं कैचें जीवितां : सांधे जी देवा	॥ ३९२ ॥
आढऔनि अपकारां तें : पृथिवी सांडी जरी धैर्या तें ॥
तरि चतुर्विधां भूतां ग्रामां तें : संवरितें कवण	॥ ३९३ ॥
देउ सहजे चीं कृपाळु : शरणागत-जनवत्सलु ॥
आर्त्तां सीं निन्हां मयाळु : अनाथ-नाथु	॥ ३९४ ॥
आतां शरण आलों दातारा : अहो जी प्रभु श्रीचक्रधरा ॥
अ-निमित्य-बंधो करुणाकरा : सकळ हीं उपसाहावें	॥ ३९५ ॥
तूं न होतांसीं भृत्य-वत्सलु : न करितांसीं आनंदा चां सुकाळु ॥
तरि संसाररूप दुःकाळु : जीवां केवीं जातें	॥ ३९६ ॥
तूं न करितासीं उदारपण : नेदितांसीं आपुलें ज्ञान ॥
तरि घोर संसार-भ्रमण : जीव केवीं जातें	॥ ३९७ ॥
तूं नेदितांसीं आनंद-धणु : आपुलें सान्निधानु ॥
तरि जीवां सीं मोक्ष-साधनु : कवणु करितें	॥ ३९८ ॥
तूं नेदितांसीं कैवल्यपती : आपुली नित्यभक्तीं ॥
तरि परमानंदा ची प्राप्ती : केवीं होतीं	॥ ३९९ ॥
तूं निराकार निर्गुणु : जरि न होतांसीं सगुणु ॥
तरि पतितां चां कुढावा कवणु : करिता सांधें	॥ ४०० ॥

तूं परब्रह्मीचा राणा : जरि न करितासीं साकारपणा ॥
तरि जीवु बापुडे कवणा : उद्धरितें ॥ ४०१ ॥
तूं श्रीकृष्णा न करितासीं अवतारू : तरि कवणु फेडिता भूमी चा भारू
दैत्यां चां करौनि संहारू : कवण स्थापिते देवां तें ॥ ४०२ ॥
तूं न होतासीं आदिकारण : तरि आम्हां कैचें ब्रह्मपण ॥
कर्म फलीं समर्पण : देवां सीं कैचें ॥ ४०३ ॥
तुझे सहजगुण ऐसें : अवतरलासीं मायावेषें ॥
कैवल्य देआवेआं दोषें : शरणागतां सीं ॥ ४०४ ॥
ऐसें अनंत अवतारू : एकैकीं पंवाडे केले अपारूं ॥
वरि गुणवतीं परमाणु तारूं : परि तें न वाणवतीं ॥ ४०५ ॥
मीं देवा कांई करीन स्तुती : सांघें माझी केउतीं मती ॥
जो भूलवीला एकी शर्का : तुमचिआ ॥ ४०६ ॥
परि लेकुरुआं चें बोबडें बोलणें : मायबापां कोडिसवाणें ॥
तैसें माझें स्तुती करणें : श्रीकृष्णा तुज पुढें ॥ ४०७ ॥
दीपें ओवाळिजे दिणकरूं : क्षीराब्धां दुधा चां पाहोनेरूं ॥
तैसा तुज पुढां मती चा विस्तारू : आइके सर्वज्ञनाथा ॥ ४०८ ॥
जरि होअे रवी ची दिप्ती : तरि डोळे सकलां तें देखती ॥
तुझेनि प्रसादें वाणीजेती : चरित्रु तुझें ॥ ४०९ ॥
तुझियां पुण्यकथां नाइकितां : जीवां नाहीं पवित्रता ॥
तरि परमार्गी योग्यता : केवि होअे ॥ ४१० ॥
ऐसें कवणुसें आचरितु : जेणें चोखाळे आत्मतत्त्वु ॥
एक तुझें चरित्रामृतु : वांचौनिआ ॥ ४११ ॥
जर्‍हीं देखिजैलु इंद्रियां तें : जाणिजैलु मनां-पवना तें ॥
तरि न पाविजे पर-पथा तें : तुझिअे कृपे विण ॥ ४१२ ॥
यम-नियमु-आसनीं : सकलै योगुसाधनीं ॥
तुझें नि बोलें विणु ब्रह्मज्ञानीं : रीगावां नाहीं ॥ ४१३ ॥

अहंकारें मुक्ति मानिती : परि आत्मतत्वां नेणतीं ॥
प्रकृती वेगळें न होतीं : कव्हणीं काळीं ॥ ४१४ ।
पवनादिकीं धारणा : जीवां नाहीं चोखाळेपणा ॥
तेथ कर्मा चीं केउतीं गणना : मुक्तिमार्गी ॥ ४१५ ।
सहजें ची आवडे प्रकृती : वरि श्रवणीलिं फलां ची श्रुती ॥
तेणें दुणाविली जीती : ते जीवें न संडे ॥ ४१६ ।
जे प्रवर्तैले कर्म-मार्गीं : नवासिअें सूति बंधना लागीं ॥
तें वद्ती नाशिलें वीत-रागीं : सांडिलें प्रकृती तें ॥ ४१७ ।
आपणेआं सारिखें न देखती : तेआ तें कर्मनष्ट ऐसें भणेतीं ॥
जैसिआं पण्यागणां हासेती : कुलिस्त्रिआं तें ॥ ४१८ ।
जैसा विरहिणीं चंद्रु ताविता : चंद्नु न होअें नीवविता ॥
तैसें पढियासति निवृतां : कर्म जडां सीं ॥ ४१९ ।
एकु प्रवृत्ती उपदेशिती : एकु तिआं ची तरलों भणती ॥
एकमेकां तें वाणितीं : निंदीती ब्रह्मविदां तें ॥ ४२० ॥
कर्मा चिअें वरगणे पाडिलें : अर्थ कामीं लुब्ध जालें ॥
ते तुज वीणे कवणा चेनि बोलें : निवृत्त होती ॥ ४२१ ॥
जेणें पंच पदार्थु मैळें : तेणें धूतां कहीं चि नुजळे ॥
अपवित्रु संगें कवणी वेळें : पवित्रु नोहें ॥ ४२२ ॥
तैसा कर्मे कर्म-बंधु न फिटे : जेविसंबंधें मोहो न तुटे ॥
हे अघटितु वटे : जरि तूं कृपा करीसी ॥ ४२३ ॥
तैं ची मुक्ती चें द्वार उघडलें : जरि संतां चा संगु घडे ॥
उदंड आइकीं जेति पवाडें : श्रीकृष्णा तुझें ॥ ४२४ ॥
तरीं ची भव-बंध तूटितीं : जरि भक्तां सीं होअें संगती ॥
तुझीं लीलां नामें गाइजेसी : जेहीं हाकारिला एसीं ॥ ४२५ ॥
जें पररूप निर्गुण : ते जाणवैल कवण ॥
नामरूपवर्णा ची खूण : जेथ नाहीं ॥ ४२६ ॥

जें सर्व-गत निराकारू : मना वाचे अगोचरू ॥
कूटस्थ भाणिजे अक्षरूं : कैवल्य रूप ॥ ४२७ ॥
परि हें सांवळें साकारूं : जेथ गुण असेति अ-पारूं ॥
तें तुआं लीळां धरिलें सुंदरू : मनुष्य रूप ॥ ४२८ ॥
या चें करीं भणीं वर्णनां : तरि श्रुती सीं न होअे गुणा-गणना ॥
पवाडें सहस्रवदनां : वाखाणजेति ना ॥ ४२९ ॥
तूं सकलां चा पति : ऐसें हें देव तूं ते नेणती ॥
एऱ्हवीं अहंता कां उपजेति : देहादिकीं ॥ ४३० ॥
तूं एकु कैवल्याचा राणा : ऐसें जीवा होतें जाणपण ॥
तरि कैचें जन्ममरण : संसारा माजीं ॥ ४३१ ॥
अवधारीं कैवल्यपती : आधीं ची जीवु तूं तें नेणती ॥
वरि पडिलें महा-मोहा चां हातीं : तेणें बांधौनि नेलें ॥ ४३२ ॥
अहंते चें हुंबरगळां : ममते चें हात-खोडें सकळां ॥
वरि कर्मा चिआं बहुतीं शांखळा : घातलिआं ॥ ४३३ ॥
कामक्रोधीं विभांडिले : अहंकारें विचंबिलें ॥
निऱ्हां भीके सवते केलें : मदमच्छरीं ॥ ४३४ ॥
तृष्णाजलीं बडलीजतांती : व्याधिवियोगा चें घाअे पडितांती ॥
ते व्हेंळीं भले तें करीं भणतांती : काकुलतेलें ॥ ४३५ ॥
लोभा चिअें आधारिअें घातिलें : ज्ञाने वीणु उपवासी पडिलें ॥
नाना मळीं मलीनु जालें : जीवु बापुडे ॥ ४३६ ॥
दीनानाथा चां कैवारी : सकलां बंध मोक्षु करी ॥
ऐसां न देखे सचराचरीं : तूं एक वाचौनि ॥ ४३७ ॥
तुआं देव सकळें सोडविलें : सुभट दैत्यु विभांडिलें ॥
राउ॰ बांदौडी हौनि काढिलें : असंख्यातु ॥ ४३८ ॥
आपुलें नाम एकें धाडी : जें बंदिशाले हौनि काढी ॥
बळें शांखळां खांडी : मोहाचिआ ॥ ४३९ ॥

तुझें पवाडें जेथें चालती : तरि महामोहा तें विभांडौनि फेडिती ॥
बांदिअें काढौनि आणिती : तुज पाशीं ॥ ४४० ॥
जें नेणतीं तुझा पथु : ते पडिलें संसारवनांतु ॥
जेआं चां आम्हीं नेणौ प्रांतु : ब्रह्मा भणे ॥ ४४१ ॥
अवतारी कान्हो जगजेठीं : तुझेआं ज्ञाना चीं पडैलु दृष्टी ॥
-तरि मोहोचि नाहीं इअें सृष्टीं : ऐसें होऔनी ठाकैल ॥ ४४२ ॥
नाना फळीं फळतें : सुखदुःख-रसा तें श्रवतें ॥
जेथ कर्म-तरू आंदोलते : ब्रह्मकठाह वेर्‍हीं ॥ ४४३ ॥
विचित्रा वेद्वेलीं : दिसतीं सहजें सिद्धांऔळीं ॥
भावाभाव चिआं झाडौली : चहौं कडे ॥ ४४४ ॥
मार्गु लोपती विषअे तृणें : इंद्रियें चौताळतीं हारिणें ॥
कव्हणा न येति संव्हरणें : जैसें प्राणा चे रोहीं ॥ ४४५ ॥
अहंकारूमद्-भद्र-जाती : लोभु मत्सरू महीषें जुंझती ॥
मोहादिव्याघ्रु धांवती : लाहा सि अविद्ये चिआं ॥ ४४६ ॥
बळें जागते विभांडुनु : डोडपणें राहिला मद्नु ॥
जेथ क्रोधपंचाननु : त्रसितु धर्म दिग्गंजा तें ॥ ४४७ ॥
गर्वाभिमानुपर्वता : जेथ दरी तृष्णा ममता ॥
अज्ञानांधारें पडिता : भ्रमा चें काळवषें ॥ ४४८ ॥
कालभुजंगा चिआं घेरणी : तैसिआं दिठीं डंकिती कामिनी ॥
काम-विखें विखारा सर्पिणी : धुधुवातातीं ॥ ४४९ ॥
प्रियाप्रियेवशजालीं : दर्शनस्नेहदावानळीं ॥
तापत्रअें ज्वालावलीं : भूतें करपतांतीं ॥ ४५० ॥
आटाविअें भीतरील अंधारें : ज्ञानरवी ची प्रभा न संचरे ॥
भणऔनि दिशा भूलौलीं वनचरें : मोक्षमार्गीचीं ॥ ४५१ ॥
तूं आनंद-घनु मुरारी : प्रकटलासी वनां-माझारी ॥
तरि वरुषें अमृत-तुषारीं : आर्तजनांवरी ॥ ४५२ ॥

नीववी आपुलां बोलीं : अवलोकीं कटाक्षीं सरळीं ॥
जीवां ासि करीं नवाळी : कैवल्य-सुखाची ॥ ४५३ ॥
फेडावेआ अंधकारा तें : कांई वाणावें दिनकरा तें ॥
तोवि जीवोद्धारावेआं तू तें : विणवावें न लगे ॥ ४५४ ॥
तूं सकळांचा दातारू : अवतरिला सी ईश्वरू ॥
तुझिअें दृष्टिपुढां संसारू : उभा न ठकें ॥ ४५५
तुझेआ संगाची थोरी न वर्णवे : जेणें झाडां जालीं वंद्यपणें ॥
देविका महिमा कवणु जाणें : तें सांघें श्रीकृष्णा ॥ ४५६ ॥
महिमे चा नेणवे पारू : तूं ज्ञानविज्ञाना दातारू ॥
वेधवतीदीक्षा-गुरु : चराचरा सीं ॥ ४५७ ॥
तुझे पवाडें कांई वाणुं : अवतरिलासीं चतुर्भुज होंउनु ॥
वसुदेवऽदेवकीं मोहनु : बालकु जालासीं ॥ ४५८ ॥
विषदानुदेती पूतनाः ते तुआं पाटवीली वैकुंठ-भुवना ॥
वैरें मुक्ती देवकी नंदना : भक्तां कांई देसीं ॥ ४५९ ॥
तुझा शक्ती पराक्रमु पांता : कांईं काकबकतृणावर्ता ॥
रूखु मोडिलें हें वाणितां : थोरी न दिसे ॥ ४६० ॥
परि नवल एकु जालें : जे नारद-शापें वृक्षत्व पातिलें ॥
तें तुझेंनि स्पर्शे उद्धारिलें : कुमर धनदा चें ॥ ४६१ ॥
आणीक हीं पवाडे गहन : करिसीं कालिया चें दमन ॥
गोवर्धना चें उद्धरण : वामकरांगुलीं ॥ ४६२ ॥
केशिया उभा फाडौनी : चाणौर मोष्टिकु मोडौनि ॥
कंसादीकु वधौनी : बांदिअे ऽडंविसीं ॥ ४६३ ॥
जरा-संदु जीणसी समरीं : पांडवां चा होंसीं कैवारी ॥
गोपी सहितु द्वारकापुरीं : राज्य करीसीं ॥ ४६४ ॥
तूं अवतरिलासीं ईश्वरूं : भणऔनि ते हीं प्रतापु न होअे थोरू ॥
परि वाणितां होतसें उपकारूं : आर्त्तजनां सीं ॥ ४६५ ॥

अहो जी प्रभु करुणाकरा : हे विणवणी अवधारा ॥
उऴगो देंआं श्रीचक्रधरा : आणिकें काज नाहीं ॥ ४६६ ॥
जय जय परात्परा परमेश्वरा : जय निर्गुणा निराकारा ॥
जय प्रमाणां अगोचरा : परमपुरुषा ॥ ४६७ ॥
जय अंनंतरूपा अव्यक्ता : जय निर्गुणा गुणातीता ॥
जय चराचरूभर्त्ता : विश्वरूपा ॥ ४६८ ॥
जय जय श्रीकृष्णा मेघश्यामा : जय अमूर्त्ता परब्रह्मा ॥
जय गोपी-वल्लभा आत्मयारामा : जगमोहना ॥ ४६९ ॥
जय जय त्रिभुवनजीवना : जय सकलानंदघना ॥
जय सकलफलनिधाना : आदिपुरुषा ॥ ४७० ॥
जय अगाधबोधदायका : जय शक्तिप्रदा वेधका ॥
जय सकलभूतां नंदका : आनंदमूर्ते ॥ ४७१ ॥
जय सुरवरवंद्या मुकुंदा : जय नित्यानंदकंदा ॥
जय आर्त्ता अभयप्रदा : कृपावंता ॥ ४७२ ॥
जय सकलाधारूं अपारा : जय सर्वगत साकारा ॥
जय गोपवेष पेंढारा : कान्हो जगजेठीं ॥ ४७३ ॥
जय अनंतानंतमहिमा : जय अनामेआं सहस्रनांमा ॥
जय परदेवा परमधामा : परमात्मरूपा ॥ ४७४ ॥
जयाव्यथा कमलनअेना : जय अच्युता प्रसंन्नवदना ॥
जय सकलजीवुजीवना : आनंदरूपा ॥ ४७५ ॥
जय जय कैवल्यपती : जय भक्तजनां परमगती ॥
जय परममंगलमूर्ती : परमेश्वरा ॥ ४७६ ॥
स्तुती करितां देउ मानवला : ब्रह्मेआं नाभी-कारू दीन्हला ॥
मग तो वांसरुवें आणितां जाला : क्षेणा माजी ॥ ४७७ ॥
सत्यलोकीं आलखती बांधिली : तैसीं अमृतें दृष्टीं पातलीं ॥
मग तिअें गोपवांसुरुवें उगानिलीं : गोपिनाथें ॥ ४७८ ॥

मग देवा चेंनि राॲं श्रीचक्रपाणी : ब्रह्मेआं दीधली पाठवणी ॥
मग तो लागौनि श्रीचरणीं : विणविता जाला ॥ ४७९ ॥
अवधारीं कैवल्य-दानी : तूं चीं वसावा माझां मनीं ॥
सदां देखावांसी लोचनीं : श्रीकृष्णराया ॥ ४८० ॥
जें पातलें तुझा योगु : तेआं भक्तां चां मज देईं संगु ॥
जेथ तुझिॲं कथेचा प्रसंगु : होअे निरंतरू ॥ ४८१ ॥
आपुलेआं चा देउनि संबंधु : फेडिसीं महा-मोहा चा बंधु ॥
तरि तूं अगाधा चा अगाधु : सुखलभू होसीं ॥ ४८२ ॥
जेआं चीं आइकौनि गुणकीर्ती : तन-मन-प्राणु नावती ॥
तो तूं देखौनि कैवल्य-पती : कवणु सांडौ शके ॥ ४८३ ॥
परि तूं भणतांसीं तें करितां : थोर लाभुसें गोपिनाथा ॥
भणौनि घातिलें दंडवतां : चतुराननें ॥ ४८४ ॥
श्रीचरणीं ठेऔनि माथा : वदों लागेला सृष्टिकर्ता ॥
मीं असैनु श्रीकृष्णा तुझा होता : मग ठाकें तें करीं ॥ ४८५ ॥
असो ब्रह्मा निघाला निज-भुवनां : हें चरित्रु आइकौनि सुरगणां ॥
जयजयकारीं देवकी नंदनां : करीती पुष्पवृष्टी ॥ ४८६ ॥
तंवं सकेळीं सहितु गोपाळीं : श्रीकृष्णें आरोगणा सारिलीं ॥
मग वांसुरुवें आणिलीं : जिॲं चरुतें होतीं ॥ ४८७ ॥
मग पावेया चेनि सुसंदछंदें : हें चरित गातु परमानंदें ॥
बीजें केलें प्रभु-गोविंदें : गोकुळा माजी ॥ ४८८ ॥
गोपाळु सांघैति घरोघरीं : पडिलों सर्प-मुखा माझारीं ॥
आजि राखिलों एणें मुरारी : नंदा कुमरें ॥ ४८९ ॥
पर्वता सारिखा थोरू : तो लीळां वधिला विपारू ॥
तेआं नामु अघासुरू : ऐसें देउ भणौति ॥ ४९० ॥
हें चरित्रु ब्रह्मा निज-भुवनीं : वैकुंठीं नारदु महिमानी ॥
अमरावतिॲ वेधें सुरगणीं : गाईजतुसें ॥ ४९१ ॥

सदां एकैकें अवतारें : चरितें केलीं अपारें ॥
परि ययां एका पवाडेआं ईश्वरें : रूपें बहुतें धरिलीं ॥ ४९२ ॥
या चरित्रा ची महिमा : न-वर्णवे प्राकृतमती आम्हां ॥
जेथें देव-पिता महाब्रह्मा : भुलौनि गेला ॥ ४९३ ॥
जेहीं आराधिला ईश्वरू : तरावेआं घोर संसारू ॥
तेआं हा पवाडा निरंतरू : मनीं वसैलु ॥ ४९४ ॥
जेआं सकलां पासौनि निवृत्ती : श्रीकृष्णीं परमप्रीती ॥
तें चि जनु नीवतीं : एणें चरितामृतें ॥ ४९५ ॥
जेआं चें मनु विषयीं न वेचे : जें किंकरू परदैवां जें ॥
तेआं त्रिअें येई वाचें : चरित मुकुंदा चें ॥ ४९६ ॥
जेतुलीं तीर्थें इएं क्षिती : वृत-दानें वाखाणोति ॥
तेतुलीं सरीं न पवतीं : श्रीकृष्णचरिते सीं ॥ ४९७ ॥
आणिके हीं क्षेत्रें यागु यजनें : पवित्रता नाहीं कव्हणें ॥
एकें चरित्रश्रवणें : मुकुंदा चेनीं ॥ ४९८ ॥
धमनी चिआं कोंडी आईकीं जतीं : परि केलिआं फळें चि देतीं ॥
चरितुश्रवणें होअें भक्ती : परम-पुरुषां ची ॥ ४९९ ॥
सुर-गणां लावीनिला वेधु : भक्तां केला निज-बोधु ॥
जनु पाववला परमानंदु : जेणें श्रीकृष्णें ॥ ५०० ॥
तो मिआ महिमा वर्णिला नेणतां : परि हा संतोष मानिला महंता ॥
जेणें जालें श्रवणामृता : हरिकथे चें ॥ ५०१ ॥
आनंदतु भक्त सकळ : श्रोतेआं चें मन हो निर्मळ ॥
जनु पाओ परम-मंगल : भणे मुनी केशवराजु ॥ ५०२ ॥
हा सारासार वस्तू-विच्यारू : आइकावा करौनि आदरू ॥
भणे पंडित दामोदरू : श्रोतेआं तें ॥ ५०३ ॥

इति श्रीपरधर्म्मे महामोक्षैकसाधने श्री-नागार्जुनोपदेशे
श्रीदामोदरपंडितविरचिते वच्छहरण–श्रीमद्भागवती
कथासंपूर्णमगमत् ॥ छ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

समाप्त

# वच्छहरण कथा

# टीपा व स्पष्टीकरण

प्राकृत भाषेत 'त्स'बद्दल 'च्छ'चा उपयोग करतात, म्हणून या ठिकाणीं 'वत्स' याबद्दल 'वच्छ' असें आलें आहे. याचीं दुसरीं उदाहरणें--'मत्स्य' या[illegible] 'मच्छ', 'उत्संग' याबद्दल 'उच्छंग' अशीं पुष्कळ आढळतात. [illegible]याचा मराठी भाषा प्राकृताच्या जवळची असल्यामुळें ती प्राकृता-[illegible] अनुकरण करते.

**नमन**—प्रथम सच्चिदानंदाला नमन करून नंतर कवि चक्रपाणीस नमन करतो. हें नमन संस्कृतांत आहे. 'चक्रपाणे' हें पद संबोधनात्मक असल्यामुळें बाकीचीं विशेषणें संबोधनात्मक घ्यावीं. 'परब्रह्म' व 'परानंद' अशीं निरनिराळीं पदें असावीं. त्याचप्रमाणें 'जीवोद्धार विहार' व 'श्री-चक्रपाणे' हीं पदेंदेखील निराळीं घ्यावीं. 'स्वच्छंदोपातविग्रह' हें संस्कृतास अनुसरून 'स्वच्छंदोपात्तविग्रह' असें पाहिजे. परंतु जोडाक्षराच्याबद्दल साधें अक्षर वेण्याची प्राकृताची तऱ्हा येथें आली आहे. म्हणून या ठिकाणीं 'त्त'-बद्दल 'त' व 'च्छ'बद्दल 'छ' असें लिहिलें आहे.

**अर्थः**—जो परब्रह्म असून परमानंदस्वरूप आहे, ज्यानें स्वेच्छेनें शरीर धारण केलें आहे व जीवांचा उद्धार हाच ज्याचा विहार त्या तुला, हे श्रीचक्रपाणी माझें नमन असो.

ओंवी १—या ओंवींत परब्रह्माचें ध्यान केलें आहे. **जेआं**—'यत्' या संबंधीसर्वनामापासून 'ज' हें संबंधीसर्वनाम प्राकृतांत आलें व तेंच पुढें मराठींत येऊन 'ज' याचें षष्ठीचें एकवचन 'जेआ' असें झालें. अपभ्रंशांत व प्राकृतांत विकल्पाच्या सवलतीनें कोणताही स्वर विकल्पानें सानुनासिक होऊं शकतो. येथें आपणांस असे स्वर एकवचनी व अनेकवचनी सर्रास सानुनासिक असल्याचें आढळतें. म्हणून 'जेआं'तील 'आ'वर अनुस्वार

आहे. वास्तविक त्याची जरूरी नाहीं. उदा०—पहा, ओंवी २-साकारां, नमनां, त्रीभवतुं इ०.

**जन्मु**—जन्म यांत शेवटचें अक्षर उकारान्त आहे. अशी चाल अपभ्रंशांत फार आहे. ज्ञानेश्वरींतही प्रथमेचें एकवचन उकारान्त करण्याची चाल दिसते. या ग्रंथांतही पुष्कळ ठिकाणीं नामाचें प्रथमेचें एकवचन उकारान्त दिलें आहे. उदा०—आत्मारामु.

**पासौनि**—हें पंचमीचें एकवचनी रूप आहे. अशीं रूपें ज्ञानेश्वरींत आलीं आहेत. उदा०—क्लेशौनि, काष्टौनि इ०. हल्लीं आपण 'पासून' असें म्हणतों व त्याचा उपयोग शब्दयोगी अव्ययासारखाच आहे. पूर्वीं 'पासून' यांतील 'उ'चा 'औ' करीत असत व शेवटीं 'न'ला पादपूरक 'इ' लावीत असत. **गुरुप्रसादें** ही तृतीया आहे.

ओंवी २—**त्रीभुवनुंजीवनां**—'त्रि' असें ऱ्हस्व पाहिजे. तेथें दीर्घ लिहिलें आहे. 'भवनुं' येथेंही उकार व अनुस्वार आहेच. याबद्दल 'जेआं'-वरील टीप पहा.—ओंवी १. अर्थ:—त्रिभुवनाचें जीवन जो श्रीकृष्ण, त्याला.

ओंवी ३—**जें सकळ तीर्थांचें जन्मस्थान**—ज्यापासून सर्व तीर्थें उगम पावतात. **श्रीचक्रधर**—हा महानुभावपंथाचा मूळ संस्थापक होय. याच्यासंबंधें त्याच्या अनुयायींमध्यें फार पूज्यभाव व नितान्त निष्ठा असे. याची संपूर्ण माहिती कै० भावे यांनीं 'महाराष्ट्र सारस्वता'च्या तिसऱ्या आवृत्तींत दिली आहे. पंडित दामोदर हे महानुभावपंथीय असल्यामुळें त्यांनीं श्रीचक्रधराच्या चरणांना नमस्कार करणें साहजिक आहे.

ओंवी ४—**मिआं**—म्यां. उद्धरावेआं—उद्धारावया. प्राकृतांत ग, द, ह, य, क इ० व्यंजनांबद्दल 'अ' घालतात. त्याचप्रमाणें येथें होऊन शेंवटच्या 'य'चा 'इ' होऊन मागील 'व'त मिळाला.

ओंवी ५—उद्धव हा श्रीकृष्णाचा भक्त होता. **नागार्जुन** हा चक्रधराचा श्रेष्ठ शिष्य होता. चक्रधर बदरिकाश्रमाकडे गेला त्या वेळीं नागार्जुन त्याजबरोबर होता. **ब्रह्मविद्या शरणागता**—ब्रह्मविद्येला म्हणजे उपनिषदांतील ब्रह्मविषयक तत्त्वज्ञानाला शरण जाणाऱ्या. श्रीप्रभूचेआं—याचा संबंध 'उद्धवांदि भक्तां'कडे आहे.

ओंवी ६—**ॐवीप्रबधें**–ओंवीप्रबंधें–ओंवी वृत्तांत. **नागार्जुनाचेनि**–नागार्जुनत्येन+इ–नागार्जुनचेन+इ–नागार्जुनाचेन+इ=नागार्जुनाचेनि. शेवटीं लावलेली 'इ' पादपूरक आहे. 'नागार्जुनाचेनि' हें 'प्रसादें' याचें विशेषण असून दोन्ही तृतीया विभक्तींत आहेत.

**भणे**–म्हणें. प्राकृतांत 'म्ह'बद्दल 'भ' येतें. **केशवराजु मुनी** याच्या सविस्तर हकीकतीकरितां प्रस्तावना पहावी.

ओंवी ७—**स्मरौ**–स्मरुं. येथें सर्वत्र 'उ'बद्दल 'औ' केलेला आढळतो, **अनुवाद**–पुनरुच्चार, स्पष्टीकरण. **रसनां**–जीभ. **करीतुसें**–करीतसे–'त'-ला जोडलेला 'उकार' पादपूरक आहे. **वाणौ**–वर्णूं. ( वर्णू–**वाणूं**–वाणौ) **कवणु**–कोण. ( कः पुनः–कउण–कौण–कोण.)

ओंवी ८—**वाणावा**–वर्णावा. **अर्थः**–ईश्वराचा महिमा मनाला अज्ञात आहे. कवि त्याचें वर्णन कसें करणार ? या शंकेचा परिहार किंवा निरसन असें कीं, कवि ईश्वराचें वर्णन आपल्या बुद्धीनें करणार असून त्यायोगानें त्याची वाणी पवित्र होईल.

ओंवी ९—**निरौतें**–निरुतें–निश्चयात्मक. जीवु–जीव (कर्ता). **जेआं** येथें ही द्वितीया आहे. **श्रुतीं भणतीं नेती**–श्रुतींनादेखील ज्याचें यथार्थ आकलन झालें नाहीं. पहा–"अथात आदेशो नेति नेति,"–बृहदारण्यक, २।३।६. वेदांनादेखील परमेश्वराचें यथार्थ ज्ञान झालें नाहीं. **भक्ति**–तृतीया. **लगे**–लागे.

ओंवी १०—**जाणिजे**–ज्ञायते. **बोल**–बोल ( तृ.). **परिश्रवणें**–परिसणें. **विणु**–वीण–विना–शिवाय. **पविजे**–पाविजे–प्राप्यते. **आणिकें परि**–निराळ्या रीतीनें, श्रवणाशिवाय अन्य रीतीनें.

ओंवी ११—**अर्थः**–डोळ्यांत अंजन घातलें नाहीं, तर भूमिगत द्रव्य दिसणार नाहीं. नवी दृष्टि प्राप्त झाल्याशिवाय अंधकार जाणार नाहीं. **डोळां**–सप्तमी. **दिर्शी**–दृष्टि. प्राकृतांत कांहीं ठिकाणीं 'ऋ'ची 'इ' होते, व 'ष्ट'बद्दल 'श' होतो. **न वचे**–जात नाहीं. याला समानार्थक पहा–जैसें डोळ्यां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसि पाहांट फुटे। मग वास पाहिजे तेथ प्रकटे। महानिधि ॥—ज्ञानदेवी, १।२३.

ओंवी १२—**कांई**–काय. **चोखाळेंपण**–शुद्धि, निर्दोषत्व.

ओंवी १३—**अर्थः**—म्हणूनच आदिनाथ जो श्रीकृष्ण त्यानें सगुणरूप मायावेष धारण केला, एरव्हीं रूपरहित व निर्गुण अशा श्रीकृष्णरूपी पर-ब्रह्माचें शुकादिक महर्षि, वर्णन करूं शकले असते काय?

ओंवी १४—**वर्णुक**—वर्णन. उदा०—वागणें या क्रियापदापासून वागणूक, 'आराम'पासून 'आराणुक', 'नांदणें'—नांदणूक. **रंजउं**—रंजओ—रंजऊं. **पवाडे**—कीर्ति, मोठेपणा.

ओंवी १५—**प्राकृतजण**—अडाणी लोक. प्राकृतांत 'न'चा 'ण' होतो. **मानवतीं**—मान डोलावणें, संमति देणें. **ओडउं**—ओडओ—वोडवो—वोडऊं =पुढें करूं. पहा—'तेथ साउमा घेयावा उवावो। तंव वोडवला आनुप्रस्तावो —ज्ञानदेवी, १६।६२०. **जीवणु**—जीवन.

ओंवी १६—**अर्थः**—नागर किंवा सुंदर भाषेंत केलेलें सरस असें एकादें स्थल (प्रसंग) वर्णन व रसांचा अवलंब न करतां केलेलें श्रीकृष्णभजन या दोहोंपैकीं कोणतें चांगलें? **स्छल**—स्थल प्राकृतांत 'स्थ'बद्दल 'स्छ' येतें.

ओंवी १७—**आरिख**—आर्ष ऋषेरिदमार्षम्—ऋषिप्रणीत. प्राकृतांत 'र्ष' यामधील 'र' व 'ष' मध्यें 'इ' या स्वराचा समावेश होऊन 'रिष' झालें. त्याप्रमाणें आर्ष—आरिष पुढें 'ष'बद्दल 'ख' येऊन 'आरिख' असें रूप बनलें. **सें**—असे. येथें संस्कृत संधिनियमास अनुसरून 'अ'चा लोप झाला आहे.

ओंवी १८—**नाअेकु**—नायकः प्राकृतांत 'य'बद्दल 'ए' लिहीत, व 'ए'बद्दल 'य' लिहीत. पहा—'यरव्हीं'—ओंवी १३.

ओंवी १९—प्रस्तुत कथेसंबंधीं म्हटलें आहे. **हे**—ही कथा.

ओंवी २१—**अमृतपाण**—अमृतपान. **वस्तू**—भूमिगत धन.

ओंवी २२—**वर्णिजैलु**—वर्णन केलें जाईल. हें लभविष्याचें कर्मणिरूप आहे. शेवटचा उकार पादपूरक आहे.

ओंवी २३—'**चंद्रुचकोरां**'—हीं दोन निरनिराळीं पदें समजावीं. 'चंद्रु' हा कर्ता आहे. **नीववी**—शांत करी. **नीराजन**—ओवाळण्याची आरति, नीलंजन. **कळावंतु**—चंद्रास कलावान् म्हणतात. **एके गुणें**—एका कापसा-च्या वातीनें. **मानी**—तो मानून घेतो.

**अर्थः**—जो कलावान् चंद्र चकोरपक्ष्याचें जीवन असून सर्व जगाला आपल्या अमृतानिस्यांद किरणांनीं शांत करतो, तोच भक्ताची कापसाच्या वातीच्या

निर्लंजनानें केलेली आरति गोड मानून घेतो. चंद्रास ओंवाळण्याची चाल आपणांस पुष्कळ ठिकाणीं आढळते.

ओंवी २४—**तो** याबद्दल '**ते**' असें असावें. कारण 'संतोखतीं' हें क्रियापद अनेकवचनीं आहे. **तोकड़ेआ**–( हिंदी ) तोकड्या–थोकड्या-थोकडे–लहान, अल्प. संस्कृत–स्तोकम् पहा–आमुचेया काजाचेनि पाडे। देखती आपलें जीवित थोकडें।–ज्ञानदेवी, १।१।१२. **संतोखतीं**–संतोषती. प्राकृतांत 'ष'बद्दल 'ख' लिहीत.

ओंवी २५—**निन्हां**–अगदीं, केवळ. **निर्मळ, मती**, हे दोन शब्द निरानिराळे असावे.

ओंवी २६ पासून ३० पर्यंत श्रीकृष्णकथेची महति वर्णिली आहे.

ओंवी २७—**चंद्रे** (तृ.) **चंद्रकांता** (पंचमी घ्यावी).

ओंवी २८—**बैकार**–या शब्दाचा निश्चित अर्थ लागत नाहीं. कदाचित् 'व्याख्याकार' यांचें हें प्राकृत रूप असावें.

ओंवी २९—**नव्हे**–होत नाहीं. **उरंगे ना**–हीनरंग होत नाहीं. **साडे पव्हर**–साडेपंधर–उत्तम सोनें. पहा–" साडेपंधरा सोने होते पालवण्या " —नामदेव अभंग. 'ध'बद्दल 'व्ह' आलें आहे.

ओंवी ३१—**कैवल्यकंदू**–कैवल्याचा सांठा.

ओंवी ३२—**गोपांगणा**–गोपांगना. ॐविर्अे–( तृतीया ). **दिगंगणा** दिशारूपी अंगना. प्राकृतांत 'न्' व 'ण'चा विवेक नसे. तीच चाल मराठी-नें येथें उचलली आहे.

ओंवी ३४—**भोगावती–पाताळगंगा. वेधें**–छंदें.

ओंवी ३६—शुकानीं परीक्षितीस सात दिवसांत भागवत सांगितलें. सात दिवसांत सहा रात्रीं येतात.

ओंवी ३८—**श्रीकृष्णनामी** ( सप्तमी ) येथपासून ४३ पर्यंत श्रीकृष्ण-नाम महात्म्य सांगितलें आहे.

ओंवी ३९—**लीलां**–तृतीया.

ओंवी ४०—**आनां**–अन्य.

ओंवी ४१—**देश-धडी होणें**–वाताहात होणें.

ओंवी ४२—**कृष्णमहिमेसीं**–कृष्णमहिम्याशीं. ही सहार्थी तृतीया आहे.

अशा प्रकारचीं उदाहरणें ज्ञानेश्वरींत पुष्कळ आहेत. उदाहरणार्थ—आदरेंसी १।५५. प्रपंचेंसी ६।४७५. **आथी**—( अस्ति )आहे किंवा आहेत या अर्थीं. पहा—जैसा स्वभावो माय-बापांचा । अपत्य बोले जरी बोबडा वाचा । तरी अधिक तयाचा । संतोषुचि आथी ॥—ज्ञानदेवी, १।६४.

ओंवी ४३—तथैं जन्मैलीं श्रीचरणीं - पहा—ओंवी ३ री.

पुन: ४४ पासून श्रीकृष्णकथामहात्म्य सांगितलें आहे.

ओंवी ४४—**तरणी**—सूर्य. **निशानी**—रणभेरी, डंका. पहा—" घाव घातला निशाणी "—रुक्मि०, ५।१९. **सांघीजैल**—सांगिजेल—सांगितली जाईल.

ओंवी ४६—**वाचा**—तृतीया. **सरतेआं**—सरते—ग्राह्य, मान्य कृतकृत्य. या शब्दाच्या उपयोगाकरितां पहा—" तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें । करून घ्यावें हें तुमतें । विनवीत असें ।"— ज्ञानदेवी, १।८०. "तुका म्हणे माती । केली कस्तूरीनें सरती ।"—तुकाराम.

ओंवी ४७—**जेआं कवी** ( द्वितीया ). पढिअें—पढियें—आवडता.

ओंवी ४८—**भुलीं**—भूल. ईकार पादपूरक आहे. **ठेलीं**—राहिली.

ओंवी ४९—**तो वांचौनि**—येथें 'वाचौनि' या शब्दयोगी अव्ययामागें प्रथमा विभक्ति आली आहे. ज्ञानेश्वरींत शब्दयोगीअव्ययामागें, द्वितीया, तृतीया, चतुर्थी किंवा षष्ठी येते. जसें—उपायेविण, पापावाचोनि. **आण**—अन्य ( अन्य—आन—आण ).

ओंवी ५०—**योगिअें**—प्रथमेचें अनेकवचन. ज्ञानेश्वरीप्रमाणें येथेंही अनेकवचनीं 'ए' प्रत्यय लागला आहे. **तापत्रयो**—प्राकृतांत विसर्गाचा नामाच्या प्र० एकवचनी ओ होतो, तो येथें राहिला आहे. या 'ओ'चाच अपभ्रंशानें 'उ' होतो. आपणांस उकारांत नामें या ग्रंथांत पुष्कळ सांपडतात. तापत्रयामध्यें आधिदैविक, आध्यात्मिक, आदिभौतिक अशा तीन ऐहिक दुःखांचा समावेश होतो.

५१ व्या ओंवीपासून ५४ व्यापर्यंत श्रीकृष्ण हा 'नवां रसांचें विधान' कसा आहे, तें स्पष्ट दाखविलें आहे. त्या त्या प्रसंगाला, त्या त्या रसाची श्रीकृष्ण केवळ मूर्तिच होती हें या चार ओंव्यांत सुंदर वर्णिलें आहे. पण येथें आठच रस सांगितले आहेत. वीररसाचा उल्लेख येथें केलेला नाहीं.

पहा—श्रृंगार वीर करुण रौद्र हास्य भयानकाः। बीभत्साद्भुत शांताश्च नवनाट्ये रसाः स्मृताः ॥—नाट्यशास्त्रे भरतमुनिः।

ओंवी ५१—**जै**–जेव्हां. • दे॓ॐ देओ–देवो–देवः. • **मौळेनी,** तृ॰ श्रृंघारु–श्रृंगाररस.

ओंवी ५२—**जसोदा**–यशोदा–तृतीया. प्राकृतांत 'य'बद्दल 'ज' व 'श'बद्दल 'स' येतें.

**भेडाविला**–भिवविला. 'भी' धातूचें प्रयोजकरूप–'आव' या प्रयोजक प्रत्ययामागें 'ड' घालण्याची चाल गुजराथीवरून घेतली आहे.

**उठाविला**–उत्थापिला (प्रयोजक). **विखारु**–विषारु. हल्लीं आपण 'विषारी' असें म्हणतों.

**जिंतिला**–जिंकिला. **तै रुद्रु जाला**–त्यावेळीं रौद्ररसाची मूर्ति झाला.

ओंवी ५४—**आणिवारु**–अनिवार. **तेथचि असे**–तें त्याचें नित्यस्वरूपच आहे.

५६ व्या ओंवीपासून ब्रह्मस्वरूप श्रीकृष्णाचें विरोधाभासात्मकवर्णन सुरू होतें. हें उपनिषदांतील 'ब्रह्मा'च्या वर्णनाप्रमाणेंच आहे.

ओंवी ५८—**अनामआ**-अनामा. मूळांत 'म' व 'आ' जो प्रत्यय त्यांचा संधि केला नाहीं. • **कुमरे**–मुलगे. **आंतौरें**–अंतौरी–अंतुरी–स्त्री. येथें 'आंतौरे' हें अनेकवचनी रूप आहे. पहा—तैसें प्रकृतिजालेपणें। पुरुषा गुण भोगणें। उदासु अंतौरिगुणें। आतुडे जेवी ॥"–ज्ञानदेवी,–१३।१०१४.

**आतम–आंरामा.** (द्वितिया) संधी न करतां तसाच शब्द ठेविला आहे. पहा—'अनाम-आ'—ओंवी ५८.

ओंवी ५९—**पालकीं**–पालखीं पाळण्यांत. पहा—"आधारशक्तीचा अंकीं। वाढविसी कौतुकीं। हृदयाकाशपल्लकीं। परिये देसी निजे:॥" —ज्ञानदेवी, १२।५.

**सूते**–(सूणें या प्राकृत क्रियापदापासून) सूणें–घालणें, ठेवणें. येथें कर्मणी प्रयोगाप्रमाणें उपयोग केला आहे. हा अधिकालंकार आहे.

ओंवी ६१—**आती**–आथी–अस्ति.

ओंवी ६२—**आतप्रसंग**–मर्यादेचें उल्लंघन.

ओंवी ६३—**कवन**–कवण–कोण. • **दैवें**–नशीब, दैव.

गोकुळें-(तृ.) गोकुळानें-कधीं कधीं नामें एकारान्त दृष्टीस पडतात. **अर्थः**-गोकुळाचें हें केवढें भाग्य!

ओंवी ६४—**परदैवं**-परदेव-श्रेष्ठदेव. **गोपी परिअे देती**-गोपी झोकें देती. पहा-" माझेनि स्मरणें जाण। परिये देणें बालका।-एकनाथी भागवत, १२।१७९. "हृदयाकाशपल्लकीं। परिये देसी निजे"-ज्ञानदेवी, १२।५.

ओंवी ६६—**प्रांमाणां**-प्रमाणां प्रत्यक्ष, अनुमान व आगम अशीं तीन प्रमाणें आहेत. **वासुरुवे**-वासरूं या उकारांत नपुंसकलिंगी नामाचें प्रथमेचें अनेकवचन. असे प्रयोग ज्ञानेश्वरींत पुष्कळ आढळतात. उदा० गोरुवें, हातिरुवें इ०.

ओंवी ६७—**आखरीं**-(सप्तमी)-आखर-गांवाजवळील शेत. ज्ञानेश्वरींत हाच शब्द 'आगर' असा आला आहे.

ओंवी ६८—येथें सर्व संवगड्यांचीं नांवें आलीं आहेत. **पेंधा**-पांगळा, मोडका. **वडजा**-अत्यंत कुरूप मनुष्यास दिलेलें विशेषनाम.

**सुधामा**-सुदामा असावा. **बागडा**-खेळकर, थोटा. पहा गुजराथी "बगडो"

ओंवी ६९—**गोवळें**—गवळी. **मुखरीं**-मुख्य.

**एरूं सहस्र संख्या वेन्ही**-दुसरे सहस्र संख्येच्यावर होते.

**मीनले**-मिळाले.

ओंवी ७०—येथें तोंडानें वाजाविण्याच्या वाद्यांचीं कांहीं नांवें आलीं आहेत.

**तोरमी**-वाद्यविशेष. **मोहरी**-पुंगी, मुरली. पहा-रामविजय, २५।१४३. तुकाराम, २३८६. **डांगा**-काठ्या. पहा-ज्ञानदेवी, १५।२५१.

**नीगेतां**-निघतां. **गार्जीनिले**-गर्जिन्नलें-गाजले. जुन्या मराठींत भूतकालवाचक धातुसाधित अव्ययापुढें 'ल' जोडण्याची चाल आहे. संस्कृतमध्यें 'त' या भूतकालवाचक धातुसाधित प्रत्ययाऐवजीं पुष्कळ धातूंना 'न' लावतात. हीच रीत मराठीनें व हिंदीनें पद्यामध्यें उचलली आहे. मराठी कवितेंत या 'न' पुढें 'ला' जोडतात. पहा—"ते दोन्ही शब्द अचाट मिळाले एकवट।"—ज्ञानेश्वरी. कधीं कधीं 'न' द्वित्त असतो. जसें—"धर्माप्रति धाविन्नला"—रुक्मिणीस्वयंवर. येथें आपणांस "गार्जीनिले"

असें रूप गार्जितले–गर्जिनलें–गार्जिन्नलें–गाजीनले–गाजीनिलें अशा पायर्‍यांनीं आलें आहे. 'निलें' यांतील 'इ' पादपूरक आहे.

ओंवी ७१—देव विमानांतून श्रीकृष्णाचा खेळ पाहण्यास येतात.

ओंवी ७२—**अमरावती**–इंद्राची राजधानी.

ओंवी ७३—**विसुरैले**–विसरलें. **अन्मीखें**–उन्मिखें–उन्मेष–ज्ञान, उल्हास. पहा–"देव उन्मेष सूक्ष्मेक्षणु। विघ्नराजु।"—ज्ञानदेवी, १।१५.

ओंवी ७४—**तेतुलेआं**–तितक्या. **पथीं लाविते जाले**–मार्गाला लाविते झाले.

ओंवी ७५—**अर्थः**—तेव्हां एकत्र जमलेल्या गोपाळांनीं म्हटलें कीं, "अरे वासरांचे वेगळे वेगळे कळप करा."

**थोवेकारी**—एकत्र जमलेले. **कल्पीं** कळपीं. (प्रचलित मराठींत 'ल' 'व' 'प'मध्यें 'अ' शिरला आहे.) तुकडीमध्यें.

**एक टेकितु महि-बळें पाबळीं**–कांहीं अशक्त (पामर) अशी पृथ्वीच्या–जमिनीच्या आश्रयानें राहोत, हालचाल न करतां तेथेंच बसोत, व कांहीं समोर जावोत. **पाबळी**–तुच्छ. पहा–ज्ञानदेवी, २।३१३.

**साउमा**—सामोरा. **नीगेता**–निघोत.

ओंव्या ७७–७८—यांत गोपाळांचें स्वरूप व वेषवर्णन आलें आहे.

ओंवी ७७—**धातु**–गैरिक धातु, गेरू, काव, पिवडी इ०.

**एकें**—कांहींजण. **बाहाकाते**–बहकते–फांकतें. पहा–"आयोध्येमाजि सुवास बहकत"–रामविजय, १०।२१. तुलनेकरितां पहा–गुजराथी 'बेहेक'.

**वरी**–आणखी. **मसी**–शाई. **बाउली**–टिकली.

ओंवी ७८—**मोरविसा**- मोरपिसां. (तु.) 'प'बद्दल 'व' घालण्याची चाल. **वेठी**–वेष्टी–वेष्टण.

७७ व ७८ ओंव्यांना समानार्थक पहा.

फुलांचे गळां घालिती दिव्य हार, स्वनाथासवें ते करीती विहार ॥
स्वकौशल्य ज्या गुंज माळांत, नाना गळां घालिती, ते करिती तनाना ।
शिरीं बांधिती मोरपत्रें विचित्रें, शरीरावरी रेखती दिव्य चित्रें ॥ १ ॥
नसोनी उणें रत्नमुक्तां सुवर्णा, उगाळूनियां मृत्तिकावर्ण वर्णा ॥

—वामनपंडित, वनसुधा, १।१६, १७, १८.

ओंवी ७९येथून ८२ पर्यंत श्रीकृष्णरूपवर्णन दिलें आहे.

**सोनेसळा**—जरतारी पीतांबर. पहा–" पांघुरली होती सोनेसळी । ते फेडोनियां वेगळी । "—ज्ञानदेवी, ६।२८४.

ओंवी ८०—**वीरागंठी**-वीरगुंठी–वीराला शोभण्यासारखी केसांची गांठ. पहा–" अविरळ कुरळांची मस्तकीं वीरगुंठी "- सामराजकृत रुक्मिणी-हरण, ८।११८.

ओंवी ८१—**वेताटी**-छडी. **मरगज**-मरकत–हिरवा. **हटोपरीं**-हट्टानें.

**तोडरी**-तोडर–पादभूषण. **बाउली**-बाहुली, मूर्ति.

**तोडरी बाउली घालणें किंवा काढणें**-तोडरावर दैत्यांचीं चित्रें काढलीं होतीं. कदाचित् त्यांच्यावरील जयाचें हें चिन्ह असेल.

ओंवी ८२—**अर्थः**–श्रीकृष्णाच्या मनोहर स्वरूपास दृष्ट लागेल म्हणूनच जणुं त्याच्या कपाळीं काळी टिकली लावली होती.

ओंवी ८३—**सवैल**-(वि०) सोबत्यांचे. पहा–ज्ञानप्रबोध ( मानभावी ग्रंथ) २४२.

द्वितीयार्धाचा **अर्थः**—पेंढारी ( चोरणारा ) श्रीकृष्ण आपल्या खेळ-गड्यांना म्हणाला, " जा रे तुम्हीं दैत्य व्हा "–" तुम्ही दैत्यांचीं सोंगें घ्या " व त्याप्रमाणें ते ( संवगडी ) ब्रिदें–वहाणा करूं लागले.

ओंवी ८४—**ठाइं ठाइं**-स्थानीं स्थानीं. **ॐडतुंतु**–ओंवी १५ वरील टीप पहा. **वातु**—वाजतो. **सुहावें**-आवडीनें पहा–ज्ञानदेवी, १५।१६८.

**पवाढ**-गीतें. **दैत्यु विभांडाचें**-दैत्याचें निर्दलन करणाऱ्याचें ( श्रीकृष्णाचें ).

८५ पासून ८८ पर्यंत गोपाळांच्या खेळाचें वर्णन दिलें आहे.

ओंवी ८५—**शशी निरणें**–एक प्रकारचा खेळ. कोणता तें निश्चित सांगतां येत नाहीं. **हमामा**-एक खेळ. **हुंवळी**–हमामा **वेली**–वेळीं.

ओंवी ८६—**तगर**–मेंढा. कानडींत 'ठगर' म्हणतात.

ओंवी ८७—**राजहंसागति**–'राजहंसा' हें 'गती'चें विशेषण आहे. दोन्ही शब्द एका विभक्तींत आहेत. ही रीत संस्कृताची आहे.

**तिंतुरबाउली**-तित्तिरपाउलीं. येथेंही 'प'बद्दल 'व' आलें आहे. कदाचित् ही वाचणाराची चूक असेल.

या क्रीडावर्णनास समानार्थक पहाः—वामनपंडित-वनसुधा.

खगाचिया साउलिच्याच संगें । ते धांवती हास्यरसप्रसंगें ॥
हंसाचियां दाखविती गतीतें । जे लाधले हंसगुरूगतीतें ॥
मुखें वासुनी लोचनभ्रूतटातें । उभारूनियां वांकुल्या मर्कटातें ॥
अहो ! दाविती शब्द तैसे करिती । असे खेळती बाळ निःशंकरीती ॥
वनीं देखती मेघनीळास मोर । प्रमोदें करी नृत्यलीला समोर ॥
तयासारिखे नाचती तोक सारे । खुणावूनि अन्योन्य कीं 'तो कसारें!'

ओंवी ८८— **रुंझी**-रुंजी-गुंजारव. **पसाअेदान**-पसायदान-प्रसाददान. पहा-" आता विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषौनि मज द्यावें । पसायदान हें "—ज्ञानदेवी, १८।१७९४.

इतक्यांत कंसानें कृष्णवधार्थ अघासूर नांवाचा दैत्य पाठविला व तो सापाच्या रूपानें तेथें आला. त्या दैत्याचें वर्णन ८९ पासून सुरू होतें.

ओंवी ९०—त्या दैत्याच्या तोंडाचा विस्तार आकाशाप्रमाणें व्यापक होता.

ओंवी ९१—त्या दैत्याच्या मनांत असें होतें. कीं, " ज्यानें पूतना व बकासूर मारले तो नंदाचा मुलगा आपण गिळून टाकावा. या एकट्या श्रीकृष्णाच्या संहारानें सहजच सर्व गौळ्यांचा संहार होणार आहे.

**पूतनाणि**-पूतनां+आणि. **गिळौ**-गिळूं.

ओंवी ९२—**पैजा** पैज. 'पैजा' शब्द ज्ञानेश्वरींत आला आहे. पहा-" अमृताचेनि पैजा जिंके " **वंदावन**-वृंदावन. प्राकृतांत कोठें कोठें 'ऋ'चा 'अ' होतो. **कळौ**-कवळो.

द्वितीयार्धाचा अर्थः-- काळ महाकाळास ग्रासावयास यावा त्याप्रमाणें म्हणजे काळाकडून महाकाळास ग्रासणें जसें अशक्य त्याप्रमाणें अघासुराकडून श्रीकृष्णाचा नाश होणें अशक्य. येथें काळसर्परूपी अघासुर, महाकाळ ( श्रीकृष्ण काळया रंगाचे होते ) श्रीकृष्णास ग्रासावयास आला आहे. श्रीकृष्ण काळांचे काळ असल्यामुळें त्यांना अघासुरानें गिळणें केवळ अशक्य आहे पहा-" कालः कलयतामहम् "—भगवद्गीता, १०।३०.

ओंवी ९३—**अर्थः**-पतंगानें अग्नीस किंवा अंधकारानें सूर्यास ग्रासणें जितकें अशक्य तितकेंच अघासुरानें श्रीकृष्णास ग्रासणें अशक्य.

होय. तो ( अघासुर ) जणुं काय आपला देह श्रीकृष्णास समर्पण करून त्याच्याजवळ मुक्ति मागण्याकरितांच आला आहे. श्रीकृष्णाकडून अघासुर-वध खात्रीनें होणार हा कविसंकेत होय.

**आपणवे**—आपणपे.—स्वतः आपण. पहा-ज्ञानदेवी, १४।५.१.

येथेंही पुनः 'प'बद्दल 'व' आहेच.

ओंवी ९४.—**आंगवण**—शक्ति. पहा—ज्ञानदेवी, ७।९२.

**पातानिले**—पातले. **लागीनिले**—लागले. ( याकरितां ७० व्या ओंवींतील 'गाजीनिले'वरील टीप पहा ).

ओंवी ९५—**निरुतें**—खरें. **ठाकितें**—ठाकतें—साध्य. पहा—ज्ञानदेवी, १०।१८०.

ओंवी ९६—बाळगोपाळांना प्रचंड: सर्परूपी अघासुर पर्वताप्रमाणें वाटला व त्यांची दिशाभूल झाली.

याला समानार्थक पहा—

" ऐसें विचारूनिच राजवाटे निजे, पहातां गिरिराज वाटे ।
मोठा धरी देह भुजंगमाचा जो नाशकर्ता स्थिरजंगमाचा ॥ ७ ॥

—वामनपंडित, बनसुधा, २.

ओंवी ९७—**घाटु टेकाडिआ तेंचि दशन**—टेकड्या व घाट असावे त्याप्रमाणें त्याचे दांत. **उजुवाट तेंचि रसना**—त्याची जीभ एक सरळ लांब रस्ताच होती. **कपाटु तेंचि वदना**—त्याचें तोंड म्हणजे एक मोठें कपाटच होतें.

ओंवी ९८—**साउमे**—समोर. पहा—ज्ञानदेवी, १६।६२.

ओंवी ९९—**अर्थः**—तो पर्वतच आहे अशा बुद्धीनें—समजुतीनें ते समोर गेले व त्याचा शब्द ऐकतांच ते त्याला सर्प म्हणूं लागले. यांप्रमाणें त्यांना ( गोपाळांना ) त्याचें ( अघासुराचें ) खरें सर्परूप समजलें.

ओंवी १००—**वरिपडे होणें**—प्राप्त होणें, सांपडणें. पहा—ज्ञानेश्वरी, २।२०१. " आणिक नका करूं चेष्टा । व्हाल कष्टा वरपडे "—तुकाराम अभंग.

ओंवी १०२—**अर्थः**—त्याप्रमाणें पुढें होते ते गोपाल भुलले व मागें होते ते पाहतां पाहतां ( त्या सर्पाच्या पोटांत ) शिरले.

**न विचारिता**—विचार न करतां. **मैळलेनी**—मळलेल्या. पहा–इंग्रजी Beaten Track.

ओंवी १०३—**अर्थः**–याप्रमाणें बहुतेक गोपाळ त्या सर्परूपी अघासुराच्या पोटांत शिरले व तितक्यांत श्रीकृष्ण त्याच्या दृष्टीस पडला. नाहींतर त्यानें तितक्या सर्वांना मिठी मारून गडप केलें असतें.

ओंवी १०४—**तेसनी**–तेवढीं (तत्समान). **किडरुवें**- सर्पानें. (तृतीया) त्या सर्पानें एका कुशींतच सर्व वासरें व गोपाळ सामाऊन टाकले म्हणजे त्यांचा समावेश करून टाकला.

ओंवी १०५—**आतां काइ कीजे**–आतां काय करावें ?

ओंवी १०६—**तडवा**–तळवा-तळहात. **आपलेआंचा**–आपल्या गोपाळांचा व वासरांचा.

ओंवी १०८—अभिमन्यूची पत्नी उत्तरा इच्या पोटांतील गर्भाचा नाश अश्वत्थाम्यानें ब्रह्मास्त्रानें केला. उत्तरेच्या विनंतीवरून श्रीकृष्णांनीं तो गर्भ पुनः जिवंत केला. तोच पुढें परिक्षित या नांवानें प्रसिद्ध झाला.

ओंवी १०९—**जोहरीं**–अग्निप्रलयांत. पांडवांस लाक्षागृहांतून श्रीकृष्णांनीं वाचविलें त्यास अनुलक्षून आहे.

**कां कोपलेल्यां दुर्वासुमुनी**–दुर्वास ऋषि रागावून द्रौपदीचें सत्त्व घेण्याकरितां भोजन मागूं लागले. त्या वेळीं श्रीकृष्णानें पांडवांची लाज राखून दुर्वासास तृप्त केलें.

ओंवी ११०—द्वारकेंतील एका ब्राह्मणाचे पुत्र जन्मतःच मरत असत. या गोष्टीचा दोष ब्राह्मणानें श्रीकृष्णावर लादल्यामुळें श्रीकृष्णांनीं अर्जुनासह यमलोकांस जाऊन ब्राह्मणाचे सर्व मृतपुत्र परत आणले. अशी महाभागवतांत कथा आहे.

**जमलोकीं**–यमलोकीं. **अर्जुनेन सीं**-(सहार्थी तृतीया)–अर्जुनासह.

**मृत्यापत्यें**–मृतापत्यें-(द्वि०).

ओंवी ११३—**हर्खु**-हर्ष. **द्वितीयार्धाचा अर्थ**–सृष्टीचा संहार ही ज्या श्रीकृष्णाची केवळ लीला, त्याचें बळ तो राक्षस कसा जाणणार ?

ओंवी ११४—**अघासुरपणु**–अघासुरपण–दैत्यत्व.

ओंवी ११५—**मनु पवन**–मनाची व प्राणाची.

ओंवी ११६—**अर्थ**:–अघासुराचा आत्मा ब्रह्माकडे लागला व ब्रह्मस्वरूप परमात्मा श्रीकृष्ण अघासुराच्या पोटांतून बाहेर आले. मग त्यांनीं आपले सर्व आश्रितजन दैत्याच्या पोटांतून बाहेर काढले.

ओंवी ११७—**पवनीं**–प्राणवायूमध्यें. **मनपवनु**–मन आणि पवन–प्राण.

ओंवी ११८—**अर्थ**:–अघासुराच्या शरीरापासून जो तेजःपुंज असा आत्मा निघाला तो श्रीकृष्णस्वरूपीं मिळून गेला. याप्रमाणें आत्मा परमात्म्याच्या ठिकाणीं लय पावला. अघासुराचा येणेंप्रमाणें अंत झाला.

ओंव्या ११४, ११५, ११६ व ११८ यांना समानार्थक श्लोक पहा—

स्वभक्तांसि जो देव सर्वस्व दे हा । अघाच्या मुखीं वाढवीतो स्वदेहा; ।
जसा वायु दाटे, तसें दुःख वाटे । निघे प्राण तो ब्रह्मरंध्राच वाटे ॥ १ ॥
भुजंगांतुनी मूर्ति जेव्हां निघाली । अघज्योति तैं झेप येऊनि घाली; ।
तयांतूनि बाहेर जो देव यावा । नभीं दाखवी तेज तों दिव्य यावा ॥ २ ॥
सवत्सें मुलें जीं मृतें त्यांस देवें । पहातांचि तीं ऊठती हो सदैवें ।
तयायुक्त बाहेर जेव्हां निघाला । हरी मुक्ति दे ज्योतिरूपा अघाला ॥ ३ ॥

—वामनपंडित, वनसुधा, ४.

ओंवी ११९—**अर्थ**:–श्रीकृष्ण अघासुराच्या शरीरांत शिरल्यावर त्यांनीं त्याला कांहीं दिलें असलें पाहिजे, म्हणूनच त्याचें अंतरंग आत्मज्ञानानें प्रकाशमान झालें, किंवा त्यामध्यें विशेषप्रकारचें ज्ञान प्रकटलें, तें मोठे लोकच जाणतील. **दिन्हले**–'दिन्ह' हें 'दा'पासून झालेल्या दिण्ण या पालि किंवा प्राकृत अव्ययाचें रूप आहे. यालाच 'लें' हा प्रत्यय 'दिन्हलें' असें रूप बनलें आहे.

ओंवी १२१—**तृणचरें**–वासरें. **एके मुक्ति पाववीली वैरें**–अघासुराला त्याच्या श्रीकृष्णाबद्दलच्या वैरानें त्याच्या हातून मरण येऊन मुक्ति मिळाली.

ओंवी १२२—**जवळिकां**–जवळ असणाऱ्यांना. **अवदीप्ती**–थोर तेज ज्ञान. **ब्रह्मसुखा**–'ब्रह्ममुखा' असें असावें.

ओंवी १२३—**तिर्यंचे**–पशुपक्ष्यादि.

ओंवी १२७—**आपण देउँ वाणी जेआं** तें-ज्यांचें वर्णन देव आपणच करतो. **शरीरसंपत्ती**-( तृ० ).

ओंवी १२९—**सदाफल**-असा एक शब्द असावा.

ओंवी १३०—**श्रवतां**-स्रवतां. **साद्रव** सद्रव-रसार्द्र.

**फलपुष्परस**-असा एक शब्द असावा. **पुडुरा**-पुढारा-पुंडारा-पुढें. त्यावरूनच नंतर श्रेष्ठ, वरिष्ठ असा अर्थ झाला.

ओंवी १३१—**पापिअे**-पापी लोक. **मोकारा**-मोकाटा-मोकळीक.

ओंवी १३२-**अर्थः**—वृंदावनाच्या सुनीलवर्णानें तें केवळ आकाशाचें प्रतिबिंब वाटे व तेथील नवविकसित पुष्पें तारागणासारखीं भासत. ही उपमा अत्यंत हृद्य आहे. पुढील ओंवींतील कवीची उत्प्रेक्षाही बहारीची आहे.

ओंवी १३३—**अर्थः**-"दिवसां तारागण दिसत नाहीं या दोषाचें उसनें फेडावयासच जणुं काय ( नक्षत्रांनीं आकाशाला वेढावें त्याप्रमाणें ) वनश्रीनें वृंदावनाला वेढून टाकिलें होतें." फुलें हीं तारागणाप्रमाणें उज्ज्वल असल्यामुळें व वृंदावनही आकाशाप्रमाणें निळें असल्यामुळें, तारागणांचा दिवसां न दिसण्याचा दोष नेहमीं विकासणाऱ्या वृंदावनपुष्पांनीं भरून काढली अशी कविकल्पना आहे. **दी**-दिवस.

येथून १३४-१३९ पर्यंत वृंदावनांतील वृक्षांचें वर्णन दिलें आहे. एक ओळ झाल्यावर त्याच्या आंत दुसऱ्या झाडांची ओळ, त्याच्या आंत तिसरी अशी एकंदर वनाची रचना आहे.

ओंवी १३४—**अर्थः**-"वनाच्या बाहेर असणारे पण विशाल आकाराचे साल ताल तमालादि वृक्ष आपल्या अंगानें ( जणुं काय आंतील सुवास जतन करून ठेवीत होते. ते वृक्ष ) रक्षणकर्तेच होते.

**राखणाइतु**-राखणाथित-रक्षणयिता-रक्षणयितृ. पहा-"भक्तांचा वेळायितु"—मुकुंदराज.

ओंवी १३५—**भीतरीली**-आंतली. **उच्चां**-उंच.

**आंदोळतांती**-झोकें घेतात. उंचपणामुळें झाडें वाऱ्यानें हालत, त्याचें शब्दचित्र दिलें आहे.

ओंवी १३६—**आंतुली आंगी**-आंतल्या अंगाला.

**साकरनिंबोनी**–साकरालिंबू. **मधुकाकडिआं**—मधुकाकड्या–एक प्रकारचीं वाळकें. **मातुलंगो**–म्हाळुंग.

ओंवी १३७—**वारेखतु**–वरिषतु–वर्षत. **वडप**–वृष्टि.

**मोप**–अमुप (वि०)–पुष्कळ. पहा–" तें आपुलेपणें अमुप "–एकनाथी भागवत, १।२३. येथें मोप हें नाम आहे.

ओंवी १३८—**पाजतिक**-प्राजक्तिक–पारिजातक.

ओंवी १३९—**आरू**–अंगविस्तार. आवार.

वरिल वृक्षवर्णनास समानार्थक पहा.

झाडें पुष्पफळें करूनि सुफळें केळी बरी पोफळें ।
नरेळें सजळें विचित्र उजळें हीं रम्य सीताफळें ॥
तैसी हीं प्रबळें स्वसंचित बळें जीं तुंबळें जांबळें ।
पुष्पें हीं विमळें अशोक बकुळें कुंदादिकांचीं कुळें ॥

—वामनपंडित, वनसुधा, ४।८.

ओंवी १४० पासून १५३ पर्यंत वृंदावनांतील सरोवरांचें वर्णन केलें आहे.

ओंवी १४०—**चंद्रमंडळाकारें**–सरोवरें. चंद्राच्या निरनिराळ्या आकारासारखी वर्तुलाकार, अर्धवर्तुलाकार होतीं: व त्यांचा पृष्ठभाग चंद्रबिंबाप्रमाणें स्वच्छ असे.

या सरोवरवर्णनास समानार्थक पहाः—

पाळीयुक्त तळीं असी न सुतळीं स्वर्गीं न वा भूतळीं ।
वायूतें विमळीं जळीं सकमळीं जी पाळिती शीतळीं ॥
अंतर्बाह्य अली महाशतदळीं भृंगावळी सांवळी ।
बिंदू त्याच दळीं कसा डळमळी घे पैज मुक्ताफळीं ॥ ८ ॥

—वामनपंडित, वनसुधा, ४.

ओंवी १४१—वृंदावनांतील सरोवराचें जल प्राशन करतांना पशूंनीं देखील परस्परांतील वैरभाव विसरला. बाणाच्या कादंबरींतील जाबाली ऋषीच्या आश्रमवर्णनाची येथें आठवण होते. पहा—" अयमुत्सृज्य मातरमजातकेसरैः केसरिशिशुभिः सहोपजातपरिचयः प्रक्षरत्क्षीरधारमापिबति कुरंगशावकः सिंहीस्तनम् । एष मृणालकलापाशंकिभिःशशिकरधवलं सटाभारमामीलितलोचनो बहुमन्यते द्विरदकलभैराकृष्यमाणं मृगपतिः । इदमिह

कपिकुलमपगतचापलमुपनयाति मुनिकुमारकेभ्यः स्नातेभ्यः फलानि। एते च निवारयंति मदांधा अपि गंडस्थलीभांजि मदजलपाननिश्चलानि मधुकरकुलजानि जातदयाः कर्णतालैः करिणः।" पुनः कालिदासाच्या ऋतुसंहारांतील निदाघवर्णन पहा—"अवाङ्मुखो जिम्हगतिः श्वसन्मुहुः। फणी मयूरस्य तले निषीदति॥ १३॥" "न हंत्यदूरेपि गजान्मृगेश्वरो। विलोलजिव्हश्चलिताग्र केसरः॥ १४॥" "प्रवृद्धतृष्णोपहता जलार्थिनो न दंतिनः केसरिणोऽपि बिभ्यति॥ १५॥" "कलापिनः क्लांतशरीरचेतसः। न भोगिनं घ्नंति समीपवर्तिनं। •कलापचक्रेषु निवेशिताननं॥ १६॥" "उत्प्लुत्य भेकस्तृषितस्य भोगिनः। फणातपत्रस्य तले निषीदति॥१८॥" "विषाग्निसूर्यातपतापितः फणी। न हंति मंडूककुलं तृषाकुलः॥ २०॥"

ओंवी १४२—**रोवंतांती**—रुवंति—ओरडतात. **चितळ**—चित्रमृग. यास लहान शिंगें असून पाठीवर पांढरे ठिपके असतात.

ओंवी १४३—**विकाशत**—विकासते.—'श' 'ष'बद्दल प्राकृतांत 'स' येतो. **झांका**—झापड. चक्कर. **कुंद**—एक पुष्पवेल.

ओंवी १४४—**स्फुटिका**—स्फटिक.

ओंवी १४५—**सोवाणी**—सोपानी. पहा—ज्ञानदेवी, ११।४२४.

**काल्हो**—कान्हो असें असावें.

१४६ पासून पुढें ७ ओंव्यांत वृंदावनाच्या सरोवरावरील मुनिजनांचें तपश्चर्यावर्णन दिलें आहे.

ओंवी १४६—द्वितीयार्ध—कांहीं मुनी लाकडासारखे ताठ होऊन परमतत्त्वामध्यें (श्रीकृष्णरूपी परब्रह्मामध्यें) लय पावले होते.

'काष्टीभूत' असा एक शब्द पाहिजे. 'अभूततद्भावे च्विः'—पाणिनीसूत्र.

ओंवी १४७—निरोपिती—सांगती. याला समानार्थक पहा—"कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमन्ति च।"—भगवद्गीता.

ओंवी १४८—प्रथमार्ध—कांहींजण जीव व परमात्मा एक मानीत होते. (या ठिकाणीं शांकरमताचें दिग्दर्शन केलें आहे.) व कांहींजण परमात्मा हा सेव्य व जीव हा सेवक या भावानें उपासना करीत होते. (हा रामानुजपंथ होय.) **निराळंबी**—निराश्रय, शून्य.

ओंवी १४९—कांहींजण इडा, सुषुम्ना व पिंगला यांपैकीं मधल्या सुषुम्ना नाडीचा ( शक्तीचा ) आधार घेऊन व पुरुषार्थचक्र, विशुद्धचक्र व अग्निचक्र या तीन चक्रांवर ( वज्रांवर ) आघात करून, शरीरांतील अग्नीमध्यें फुकट जाणाऱ्या अमृताच्या उपयोगानें शरीर अमर करीत होते.

ओंवी १५०—कांहींजण, सुषुम्नेवर जोर देऊन व आधारचक्र, मूलचक्र व नाभिचक्र या तीन पीठांना ओलांडून व अग्निचक्राच्या द्वारानें ( पूर्णगिरी ) जाऊन ब्रह्मरंध्रामध्यें असणाऱ्या चित्कलेचा आस्वाद घेत होते.

ओंवी १५१—कांहींजण नाभिचक्र; मूलचक्र, आधारचक्र, अग्निचक्र, विशुद्धचक्र व पुरुषार्थचक्र या शरीरांतील सहा चक्रांच्या सरळ मार्गानें जाऊन, प्राणायामानें पुरुषार्थचक्र, विशुद्धचक्र व अग्निचक्र हीं मेरूचीं तीन शिखरें ओलांडून, आत्मा ब्रह्माण्डीं नेत होते.

वरील वर्णन हटयोगाचें आहे. प्राणायामानें एकाग्रचित्त करून आत्मा ब्रह्माण्डीं नेण्याचे हे निरनिराळे प्रकार सांगितले आहेत. सर्वांचा उद्देश चित्कलेचें आस्वादन हाच होय. अशा प्रकारचें वर्णन ज्ञानेश्वरींतील सहाव्या अध्यायांत विस्तारानें आलें आहे. पहा–" इडा पिंगळा एकवाटती । गाठीं तिन्ही सुटती ॥ साही पदर फुटती । चक्राचे हे ॥ " ६।४४. गोरक्षगीतेंतही असें वर्णन आलें आहे.

ओंवी १५२—'सोऽहं' किंवा 'तत्त्वमसि' इत्यादि वाक्यांची प्रतीति होऊन राहिलेले. कांहींजणांना परब्रह्माच्या सहजानंदाचा बोध झाला होता. पहा–" आनंदम् ब्रह्मणो विद्वान्न बिभेति कदाचन । "

**उन्मनी अवस्था**–विरक्तावस्था.

ओंवी १५४-१६१—फुलझाडांचें वर्णन.

ओंवी १५४—यांतील मंदार व कल्पलता यांना दिलेली उपमा अनुरूप आहे. **ॐतवरा**–ओतवरा–ऊत, भर, झोत. परंतु याचा निश्चित अर्थ लागत नाहीं. 'उत' यापासूनच हा झाला असावा. पहा–ओथिवळा A common trem for the Droppings from a tree after a Shower–मोल्स्वर्थ. हा शब्द १६३ ओंवीमध्यें पुन्हा येतो. तेथें थोडा निराळा अर्थ आहे.

ओंवी १५५—**अर्थ**:–कांहीं वृक्षांना रसभरित फळें होतीं तर कांहीं

सुवासिक फुलांनीं फुलले होते. कांहींचीं कंदमुळें व पानें अमृताचीं होतीं, त्यांचीं नावें कांहीं ठाऊक नाहींत, इतकीं तीं पुष्कळ आहेत.

ओंवी १५६—**योजनसुगंध**–ज्यांचा सुवास एक योजनभर पसरत होता. पहा–'योजनगंधा'. **पाडळ**–पाटलवृक्ष.

**अलीकुळामंदबकुल**—पहा–" यैनामंदमिलिंदे, दलदरविंदे दिनान्यना-यिषत । "

ओंवी १५८—**उधाती**–उधवणें, उंसळणें, भडकणें. ( सं०–उद्धूत ). **लावनी**–लागवड.

ओंवी १५९—**खेळकुलिआं**–खेळकुल्या–खेळण्याच्या जागा. पहा–घरकुल. पहा–".साहित्याचिया खेडकुलिया : सुदेशिया बोलांचिया चिपुळिया :—मानभावपंथीय भास्कर कविकृत शिशुपालवधांतील उतारा. —भावे–सारस्वत, आ. २, पा. ८६.

**बाहाकणें**–पहा–टीप ७७ ओंवी. **आणुआणी**–अग्रांअग्रांतून, अंकुरांतून.

ओंवी १६१—**दीवसें**–धिवसें–प्रबळ इच्छेनें.

ओंवी १६३—**द्विजवरूं**–पाक्षिश्रेष्ठ.

ओंवी १६४—**सवादेति**–संवादेति.

ओंवी १६५—**आडी**–आदिपरंपरा असा अर्थ असावा. **क्षेणु**–क्षणु–क्षण. देव यमुना नदी पहावयास येतात. १६८ पासून कालिंदीचें उत्प्रेक्षा-युक्तवर्णन सुरू होतें.

ओंवी १६९—**ओळगितां**—आश्रय करतां. **सायुज्यता**–मुक्तीचे चार प्रकार आहेत. समीपता, सलोकता, स्वरूपता व सायुज्यता. सायुज्यता म्हणजे परमेश्वरामध्यें मिळून जाणें. सरूपता म्हणजे परमेश्वरस्वरूप पावणें. द्वितीयार्थ–ज्या श्रीकृष्णाचें सान्निध्य प्राप्त झाल्यामुळें कालिंदीसारख्या जड वस्तुलाही सरूपता प्राप्त झाली. कारण दोघांचाही रंग एकच निळा.

ओंवी १७०—**तरंगिणी**–यमुनानदी.

ओंवी १७१—**पढियासलें**–प्रतिभासलें. तरंगांना हस्ताची दिलेली उपमा संस्कृत काव्यांत आढळते. पहा–तरंगहस्त :—कालिदास, रघुवंश.

ओंवी १७३—**फुण**–पुनः, **मणीं**–मनीं.

ओंवी १७५—**अर्थः**–अगोदर पुराणांत वर्णिलेली व त्यांत आणखी देवाच्या पायाला स्पर्श करून आलेली त्यामुळें तिला तिर्थांची अग्रगण्य असें नांव प्राप्त झालें. **विरुद**–ब्रीद. 'ब्र'मध्यें एक उकार शिरला आहे. बिर+उ+द.

ओंवी १७६—**सोमकांत**-चंद्रकांतमणि. **मुक्तागर्भ सूक्तिशंपुट**–ज्यांच्या पोटांत मोतीं आहेत असें शुक्तिसंपुट.

ओंवी १७७—**किळ**–प्रभा, तेज. **के**–काय! **मौवाळ**–मोवाळ–मृदु. पहा–" पहा हे मऊ शीतल स्वच्छ वाळू । रुचे अन्न येथें क्षुधा-तुच्छवाळू ॥ —वामनपंडित, वनसुधा, ४।६.

ओंवी १७८—**अर्धांग**–स्त्री. **आंगाथिलें**–पुष्ट होणें, पहा–बळाथिलें, तेजाथिलें. **ठीकलग**–टिकलग–शोभिवंत. **सप्तांग**–२ हात, २ पाय, २ कान व मस्तक; असे सात अवयव.

ओंवी १७९—**उचलनी**-उत्थान.

ओंवी १८१—चक्रवाकपक्षी आपल्या सहचरीला एक क्षणभरही सोडून रहात नाहीं आणि यज्ञ करतांना यजमान व त्याची पत्नी जंवळ असावे लागतात, म्हणून चक्रवाकपक्ष्यांना यज्ञदीक्षिताचें दिलेलें साम्य यथार्थ आहे. **ढोंक**–ढोंग, किंवा " disproportionately lofty and long " असा मोल्स्वर्थनें दिलेला विशेषणासारखा अर्थ घ्यावा.

ओंवी १८३—**जडें**-जड वस्तु.

ओंवी १८४—**पांखिरुवें**–पांखरें. अनेकवचनी 'रु'चें 'रुवें' होतें. **वेधु** (तृ.). १८६ व १८७ ओंव्यांमध्यें पुन्हा पशूंच्या निर्वैरत्वाचें वर्णन आलें आहे. याकरितां १४१ वरील टीप पहा. येथें आलेलें वर्णन विस्तृत आहे.

ओंवी १८६—**पांखवां**–(स.)–पंखाखालीं. **हातिरु**–हत्ती.

ओंवी १८७—**पालखतीं**–पालखटीं–पालखट=नागपुराकडे मांडी. आलखट पालखट असें आम्ही हल्लीं म्हणतों. **पानिअेडा**–(स.)–जळ-पात्र, हा शब्द ज्ञानेश्वरींत आला आहे. पहा–ज्ञानेश्वरी, ९।२१४; १६।२२८. " सत्राावियेचे पाणियाढें "—एकनाथी भागवत, ९।१२७. पाणोठा हा

शब्द असावा. मानवडा हा शब्दही ज्ञानेश्वरींत आला आहे. (१८।४०७)—धुण्याची किंवा आंघोळ करण्याची जागा.

ओंवी १८८—**पाळांति**-टेहळतात. हल्लीं ब्राह्मण 'पाळत ठेवणें' असें म्हणतों.

ओंवी १९१-१९३—नुसत्या कर्ममार्गाच्या आचरणानें ईश्वरप्राप्ति होत नाहीं.

ओंवी १९२—**अघमर्षणीं**-संध्येंतील. अघमर्षण मंत्र " ॐ ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यजायत । " इ०.

ओंवी १९३—**घाटीं**-घाटांवर. **कोडी**-कोटी.

ओंवी १९४—**अरुतें**-अलीकडे.

ओंवी १९५—**दवडो पांती**-दवडूं पाहातात. **परावस्तूते**-परब्रह्माला.

ओंवी १९६—**विषयारामा**-विषयामध्यें रममाण होणाऱ्यांना. पहा—" अघायुरिंद्रियारामो मोघः पार्थ स जीवति "—भगवद्गीता, ३.

ओंवी १९७—**साउमीली**-पुढें होतें.

ओंवी १९९—श्रीकृष्ण यमुनेच्या वाळवंटावर भोजन करण्याची सूचना करतात.

ओंवी २००—**थडिंवा**-तीरावर. **टेंकिली**-लागली. पहा—ओंवी ७५.

ओंवी २०१—**मोटा**-गांठोडी. पहा—तुकाराम, २७१७.

ओंवी २०२—**चारित्र**-( कर्ता ).

ओंवी २०३—**नीडें**-नीटें-थेट, बरोबर. **अघव**-सर्व. याला समानार्थक असे श्लोक पहाः—

" निजमुख कवणाही आड दृष्टी असेना
रचुनि बसवि ऐसी भोंवतीं बालसेना ।
हरिवदन पहाया सर्व दृष्टी भुकेल्या
म्हणुनि बहुत पंक्ती मंडलाकार केल्या ॥ "

" असे कर्णिका अंबुजामाजि जेंवी, मुलां मध्यभागीं बसे कृष्ण जेवी ॥"

ओंवी २०४—**विश्वतोमुख हे श्रुती**-" विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतो बाहुरुत विश्वतस्पात् । संबाहुभ्यां धमति संमदत्रैर्द्यावाभूमि जनयन्देव एकः ॥ " **साचु केली**-खरी केली.

ओंवी २०५–२०९—श्रीकृष्णासभोंवतीं गोपाळ कसे जमले होते याचें वर्णन निरानिराळ्या कविकल्पनांनीं केलें आहे.

ओंवी २११—**पांतीकरी**–पंक्तीस बसणारा—ज्ञानेश्वरी, ११।२.

ओंवी २१२—**पोमिनी**–'पद्मिनी' याचें प्राकृतरूप असावें.

ओंवी २१४—**अर्थः**–श्रीकृष्णांनीं हातावर धरलेला दहीभात व आंवळे वेल जणुं काय आपल्या गोपाळांना उदारपणानें देऊं केलेलीं ब्रह्मपदेंच होतीं.

ओंवी २१६—**रळिया रापदळिया**–रळी–विनोद. पहा–ज्ञानेश्वरी, ११।५४४. " भीमक्या भली केली रळी "—रुक्मिणीस्वयंवर, (माडगांवकर –ज्ञानदेवी). 'रापदळिया' हें राभदळ–राभस्य असें रूप असावें. कारण मानभावी ग्रंथांत " परीं इहीं अधुना कव्हणी हीं रळीं राभस्ये शब्दु नेदावा पां " असें वाक्य आढळतें, पहा–सारस्वत, आ. ३ री, पान ६३. कदाचित् हा शब्द 'रवंदळ'–दाणादाण " या शब्दापासून झाला असेल. यावरूनच पुढें चेष्टा असा अर्थ आला असावा.

ओंवी २१७—**आडपडनुं**–आडपड–नु असे निरनिराळे शब्द असावे. आडपड–आडपडदा–मर्यादा. किंवा आड पडणें–नमस्कार घालणें. गोपाळांची हसून मुरकुंडी वळत होती. पहा–" तेया आडपडौनि प्रायश्चित्त घेयावें " –सारस्वत–भावे, आ. ३ री, पान ६३. ज्ञानेश्वरींत हा शब्द आला आहे. १३।३७६;

ओंवी २१८ पासून श्रीकृष्णाचें वर्णन आलें आहे. या सर्व वर्णनास समानार्थक पहाः—

" वंशी नादतटीं तिला कटितटीं खोवूनि पोटीं पटीं
कक्षे वाम पुटीं स्वशृंग निकटीं वेताटिही गोमटी ।
जेवी नीरतटीं, तरूतळवटीं श्रीश्यामदेहीं उटी
दाटी व्योम घटीं सुरां, सुख लुटी घेती जटी धूर्जटी ॥

—वामनपंडित, वनसुधा, ४।३१.

ओंवी २२१—चंद्रकिरणांचा स्पर्श होतांच चंद्रकांतमणि द्रव पावतात, तद्वत्च श्रीकृष्णापदनखांचा स्पर्श होतांच भक्तांतःकरण द्रव पावतें.

ओंवी २२३—**ओहरतें**–ओसरतें. निमुळतें असा अर्थ असावा.

**घनीं**–घणानें. आपण घोंटीव असें म्हणतों.

ओंवी २२४—**पव्हरे यशे निरंगे-रंगेला**-पव्हरे यशोनि रंगे-रंगिला असें असावें. 'पव्हर'बद्दल ओंवी २९ पहा. **मालगंठी**-रेशमी किंवा जरतारी मालाबद्दल प्रसिद्ध अशा देशाचें नांव असावें. २९९ सारस्वत पहा—"सेलामध्यें प्रदेशीं मिरवितु सजनी मालगंठीं पवेशा." भास्कराच्या ईशस्तुतींतील उतारा.—सारस्वत-भावे, आ. ३री, पान ९२.

ओंवी २२५—**क्षुद्र घंटिका**-लहान घंटा. पहा—"त्याचि रुणझुणिती क्षुद्र घंटिका अर्थध्वनि।"—ज्ञानदेवी, १।७.

ओंवी २२६—**सांभव वेधु**-सामवेद.

**परिवंटा**-कडोसरीं. हा शब्द कोशांत सांपडत नाहीं.

ओंवी २२७—**अर्थः**-श्रीकृष्णरूपी ब्रह्मांडगोलाच्या आंत येण्या-जाण्याचें द्वारच जणुं काय असें जें नाभिकमळ त्यांवर केंसाचा भोंवरा शोभत होता.

ओंवी २२८—**अर्थः**-(रोमावळीवर कवीची कल्पना) मुक्तिरूप क्षेत्रा-मध्यें आनंदरूपी वेल लावली आहे कीं काय अशी श्रीकृष्णाच्या हृदया-वरील रोमराजि पाहून वाटत होतें. किंवा ती रोमावळी म्हणजे मुनि-जनरूपी भ्रमरांची ओळच होती.

मानभावपंथीय कवि—भास्कराच्या ईशस्तुतींतील उतारा पहा—भावे-सारस्वत, आ. ३री पान ९२.

"नाभीस्थानीं सुखोली विकसितु भ्रमरीं सुंदरा रोमराजी."

ओंवी २२९—**त्रिवळी**-पोटावरील तीन वळ्या. पहा—"वलित्रयं चारु बभार बाला।"—कुमारसंभव. **उल्लास**—भरती येणें असा अर्थ असावा.

ओंवी २३०—**कौस्तुभ सें**-असे दोन निराळे शब्द असावे. **एकावळी**—**एकावली**—एकपदरी माळ. सें-असें. 'अ'चा लोप झाला आहे. इंग्रजींत आपण 'it is'बद्दल 'ts असें लिहिलेलें पाहतों.

ओंवी २३२—**संग**-संघ. **फूटा**-पांघरण्याचें पांढरें वस्त्र किंवा शेला. मानभावी ग्रंथांत हा शब्द पुष्कळ ठिकाणीं आढळतो. पहा—मोकळे केश कळापु : कटीप्रदेशीं फूटा :—भास्कर कविकृत श्रीकृष्ण चरित्रांतील उतारा—भावेकृत सारस्वत, पान ९४. पुनः "श्रीमुकुटीं टोंपरें उ्ळगवीती : गोसावी फूटा प्रावर्णुकरीती :"—भावे देवव्यासकृत पूजा अवसर (नित्य दिनचर्या)

यांतील सारस्वतांत घेतलेला उतारा—भावे—सारस्वत, पान ९८. पुनः "बाहिर-वासु उ्ळगवीती : फूटा प्रावर्णु करीती—सारस्वतं, पान १००.

ओंवी २३५—**अर्थः**-श्रीकृष्णाच्यां मुखाचें चांगुलपण काय वर्णावें! तें, सदोदित किती प्रसन्न! जर चंद्रावर कलंक नसता तर तो श्रीकृष्ण मुखाचीं सेवा करण्यास योग्य झाला असता. चंद्रावर डाग असल्यामुळें श्रीकृष्णमुखाची सेवा करण्यासही तो योग्य नाहीं. व्यतिरेक अलंकार.

ओंवी २३६—**पांता**-पाहतां. **घडे**-घडा. Calm reliance or satisfaction. **घडे पडणें**-दिपणें असा अर्थ असावा. **पडतां**—पडतं—एक काना जास्त दिला आहे.

ओंवी २३७—**अर्थः**—श्रीकृष्णाचा प्रत्येक अवयव म्हणजे मदन त्यांच्या-वरून ओंवाळून टाकावा असें त्यांचें चांगुलपण! त्या श्रीकृष्णमुखासारखा भाग चंद्राला कोठून असणार!

ओंवी २३८—**पढळ**-पटल.

ओंवी २४०—**जैसे काने मातुतु**—कानाला एखादी गोष्ट ऐकविण्यास जातात कीं काय? आपांग-दृष्टीचें हें लक्षण आहे.

ओंवी २४१—**भूमंडळें**—भ्रूमंडळें—भुंवया.

ओंवी २४२—**माजीं**—मध्यें. **खेवनी**-णी—जडाव.—ज्ञानेश्वरी, १५. **ठेंगणी होणें**—हलकी वाटणें.

ओंवी २४३—यांतील कल्पना अत्यंत मनोहर आहे. श्रीकृष्णांच्या कपालप्रदेशावर अर्धचंद्राकृति टिळा होता. त्यांचे कृष्णकुरल कुंतल हे जणुं एक भ्रमरांची ओळच व ती भ्रमरावली श्रीकृष्णांच्या मुखकमलाच्या सुवासाला लुब्ध झाली होती. श्रीकृष्णाचे सुंदर कुरळे केस मुखापर्यंत लोळत होते. पहा—" लोळत कच मुखमधुवरि।" विद्याहरण—खाडिलकर.

ओंवी २४४—**निहटीं**-तळाला. **बिरलीं**-बिरडी—दोरी.—हरि-विजय, ७।१।८४.

ओंवी २४५—द्वितीयार्ध. तो माझ्यासारख्या प्राकृत माणसाकडून एका जिभेनें वर्णन करणें शक्य नाहीं.

ओंवी २४६—**आरोगन**—भोजन. **पांतु ठेले**—पहात राहिले.

ओंवी २४७—**अन्नब्रह्म हे वचन**—" अन्नंब्रह्मेति व्यजानात्."

ओंवी २५०—सर्व देव श्रीकृष्णांचें तें वनभोजन पाहून आपल्याशींच विचार करतात.

ओंवी २५१—**पारुखे ना**-पारुखणें, बंद होणें.

**आगमन**-जन्ममरणाची यातायात.

ओंवी २५२—**निभ्रांति**-निश्चयपूर्वक.

ओंवी २५३—**अर्थः**-श्रीकृष्णाचें उष्टें मिळावयाला जर सायास किंवा त्रास वाटतात तर मग तेथें त्याच्या सेवेची इच्छा कसली? (सर्व देव म्हणतात) श्रीकृष्णाच्या कृपेशिवाय आपण होऊनच या भोजनसमारंभांत आपण शिरूं नये. **उसिटे**-उष्टे-उषिटे-उसिटे. 'ष' व 'टे' यामध्यें इ हा स्वर येऊन 'ष'चा 'स' झाला आहे. **आसु**-आस, इच्छा.

ओंवी २५४—ब्रह्मदेवाला मोठा विस्मय वाटतो व तो बोलूं लागतो.

ओंवी २५५—**कावीं**-कानीं. लिहिणाराची ही चूक असेल.

ओंवी २५६—यांतील 'कें कें'नीं केलेली वाक्यरचना संस्कृतांतील क्व, क्व या वाक्यरचनेप्रमाणें आहे.

ओंवी २५७—ब्रह्मदेव येथें वासरें चोरून नेण्याचा विचार करतो. यावरूनच याला 'वच्छ-हरण' असें नांव दिलें आहे. श्रीकृष्णानें मागल्यासारखाच अवतार याही वेळीं घेतला आहे किंवा अगदीं नवीनच अवतार घेतला आहे, याची ब्रह्मदेव परीक्षा करूं इच्छितो. **निरधारु**-निर्धार. येथेंही 'र' व 'ध' यांमध्यें 'अ' शिरला आहे. **नवाइसें**-'नवाई' व 'सें' असे दोन शब्द असावे.

ओंवी २६०—**चरतें चरितें**-चरत चरत. **नटणा**-लीला असा अर्थ.

ओंवी २६१—येथें ब्रह्मदेव गोपाळांचेंही हरण करतो. **जमनु**-यमुनेकडे.

ओंवी २६२—**अर्थः**-ज्या ईश्वराच्या प्रवृत्तीनें कोटि ब्रह्मदेव उत्पन्न होतात, त्याला वासरांना परत आणण्यास त्रास कसला?

ओंवी २६३—**पवाडा**-कीर्ति.

ओंवी २६४—**अर्थः**-या कारणाकरितां श्रीकृष्णांनीं अज्ञान पांघरलें, तों इकडे ब्रह्मा आपल्या स्थानास निघून गेला व त्यानें तीं गोपवासरें

देवाचीं या भावनेनें त्यांना चांगला सुकाळ केला. **सुरुवाडु**–सुकाळ, सुख. **राऊळीचीं**–देवाची, राज्यमंदिराची.

ओंवी २६५—ब्रह्मदेवानें वासरें आपल्या ब्रह्मलोकास नेलीं यावर कवीच्या कल्पना पुढील चार श्लोकांत आल्या आहेत.

ओंवी २६६—**ईश्वराचें पण**–ईश्वरत्व.

ओंवी २६७—श्रीकृष्णरूपीं ब्रह्माचें सांनिध्य मिळाल्यामुळें वासरांना व गोपाळांना जणुं सिद्धावस्थाच प्राप्त झाली किंवा ब्रह्मदेवानें त्यांना ऋद्धि भोगण्याकरितांच सत्य लोकाला नेलें असेल.

ओंवी २६८—**साहानुक**–सानक–निर्वाहार्थ दिलेली इनाम जमीन. **शेखीं**–शेवटीं.

ओंवी २७०—**निऱ्हां**. ओंवी २५ वरील टीप पहा.

ओंवी २७२—**जीवन-मुक्त**–जीवन्मुक्त.

ओंवी २७४ ( श्रीकृष्णानें वत्सांचें व गोपांचें रूप घेतल्यानंतर ) ज्यांची जशी जशी प्रकृति, आकृति किंवा वर्तणूक असेल त्या त्या प्रमाणें त्यानें एका वेळेस त्यांचीं रूपें घेतलीं.

ओंवी २७५—जर अज्ञानी लोक "एकटा श्रीकृष्ण अनेक गोपाळ व वासरें कसा झाला" अशी शंका घेतील तर तिचें समाधान असें कीं, एकच चंद्र शंभर घटांमध्यें प्रतिबिंबित होतो. तीं वासरें व ते गोपाळ श्रीकृष्णाचीं प्रतिबिंबेंच होतीं.

ओंवी २७६—मण्यांच्या ओळीमधील दोऱ्याप्रमाणें किंवा आकाशांतील मेघावलीप्रमाणें परमेश्वर हा सर्व भूतांच्या ठायीं आहे किंवा सर्वभूतांचाच समावेश त्याच्यामध्यें झाला आहे. पहा–सूत्रे मणिगणा इव–गीता.

ओंवी २७७—वेदांनाहीं करण्यास अशक्य असा वरील संशयाचा निकाल कोण करणार आहे? ज्या वेळीं आदिगुरु श्रीकृष्ण कृपा करील त्याचवेळीं वरील सर्व संशय फिटून जाईल.

ओंवी २७८—**कामारी**–( सं० कर्मकारी )–काम करणारे चाकर. पहा–ज्ञानदेवी, १६।३५३. "कामारी वाटिक सेवेचे सेवक"–तुकाराम अभंग.

ओंवी २८०—वासरें कोणकोणत्या रंगाचीं होतीं तें सांगतात.

**दूधवडीची**–दुधाच्या वडीच्या रंगाची. **सोनेखैरी** (?)

**रोदेची**–रगतरोडा किंवा रक्तचंदनाच्या वर्णाची असावी.

**कांबरी**–कबरी, कबऱ्या रंगाची. **भांगीरा तेजाथिलीं**–सुवर्णांतील तेजाचा आश्रय केलेलीं. 'आथिला' असें रूप जोडून केलेली पुष्कळ क्रियापदें मुक्तेश्वरापर्यंत आढळतात. पहा–" विराट नगरीं बळाथिळा "–विराटपर्व–मुक्तेश्वर. **जुआं सांगडीं**–(?) जोडीजोडीची असा अर्थ होऊं शकेल.

ओंवी २८१—**मोहरीं**–मोरीं–कबरीं, करड्या रंगाची. पारडीं–(?)

**वाघी**–वाघाच्या रंगाचीं. **चितळीं**–चित्रमृगाच्या रंगाचीं. **पुंडी**–पुंड्रक असलेली असा अर्थ होईल. **देशसाया**–(?) **कोसी**–रेशमी कोशाच्या रंगाची.

ओंवी २८२—**जाऊपें**–जुळें मूळ. **धवळीं**–धवळ रंगाचीं. **तांबी**–सूर्याच्या उदयास्ताच्या वेळच्या तांबड्या वर्णाची. **नेपाळी**-नेपाळचें तांबें लालपणांत प्रसिद्ध असावें. येथें नेपाळी हे तांबी याचें विशेषण घ्यावें लागेल.

ओंवी २८३—**बहत**–बृहत्, मोठें. **वानें**–वर्णें.

द्वितीयार्ध–तें श्रीकृष्णाचें मोठें काळें स्वरूप पोटांतील वासरांना दिसत असे.

ओंवी २८४—**अर्थः**–गोपींची गोष्ट काय सांगावी! त्यांचीही तीच स्थिति झाली. लाकडामध्यें "कीटकभृग" न्यायानें किडा ज्याप्रमाणें भृंग होतो त्याप्रमाणेंच त्याही श्रीकृष्णरूप होणार नाहींत काय?

ओंवी २८५—आतां गोपाळांच्या वर्णाचें व रूपाचें वर्णन सांगतात. **तारसें**–तरसाच्या रंगाचें. **वेंभळें**–वेंधळे असें असावें–बावळट.

**भुरळे**–भुरक्या रंगाचें. **पींगळें**–पिंगट रंगाचें. हल्लीं आपण " भुरटें, पिंगट " असें म्हणतों. पूर्वीं 'ट'करतां 'ळ'चा उपयोग करीत असत असें दिसतें.

ओंवी २८६—**दींघडें**-उंच, दीर्घ. **दांतिरे**–दांत पुढें आलेले.

**राखोडें**–ओंठ तुटके. **फेंगडें**-पाय फांकून चालणारें. **जामुन**–यामुन–काळ्या रंगाचें.

ओंवी २८५ व २८६—मध्यें सर्व गोपाळांचा उल्लेख नपुंसकलिंगामध्यें केला आहे. हें वात्सल्याचें लक्षण आहे.

ओंवी २८८—ज्यांचे जे जे श्रृंगार, वस्त्रें व अलंकार होते ते ते, तो आदिनाथ श्रीकृष्ण झाला.

ओंवी २८९—जीं जीं त्याचीं ( ब्रह्मदेवानें हरण केलेल्या गोपाळांचीं ) आयुधें होतीं, त्यांनीं, व जसजसे त्यांचे राजस-तामसादि स्वभाव होते तसतसे अंगिकारून त्यांनीं, श्रीकृष्ण नटला होता. त्या त्या गोपाळांबरहुकूम श्रीकृष्णानें भूमिका घेतली होती. 'तोरमी' याबद्दल येथें 'तारपी' आलें आहे. पहा—ओंवी ७०.

ओंवी २९०—**अवगौनि**—भासून, दिसून. **तो वाणौं नेणिजे**-तो वर्णन करण्याचें ज्ञान नाहीं.

ओंवी २९१—अमृताच्या एका तुषाराला ( थेंबाला ) जो राजी आहे, त्याला अमृताचा समुद्र मिळावा, किंवा ज्याला परमाणु दुर्लभ वाटतो त्याला तेजाचा पर्वत सांपडावा. **माणिजे**—मानिजे.

ओंवी २९२—**धस्पूसत**-गडबडीनें, असा अर्थ. हल्लीं आपण 'धुसफुसत' असें म्हणतों व त्याचा रूढ अर्थ निंदाव्यंजक झाला आहे.

ओंवी २९५—ज्यांच्या घरीं परब्रह्माचीं सालंकृत मुलें होतीं ( कारण श्रीकृष्णच तीं मुलें झाला होता ) त्याचें दैववर्णन करण्यास जरी शेषाकडे तोंडें मागितलीं तरी तें वर्णन करणें शक्य नाहीं.

ओंवी २९६—त्यांच्या दैवाची थोरवी किती उच्च कोटीपर्यंत पोंचली होती ! कीं गुण, आकाररहित असें परब्रह्म हट्ट करून गौळणीजवळ जेवण मागतें. **आळि**-हट्ट. पहा—ज्ञानेश्वरी, ११।५७९.

ओंवी २९७—**चाटु**—मनाला संतोष देणारा. जो श्रीकृष्ण मोठमोठ्या देवांना व योगीजनांना देखील दुर्लभ तो आपल्या भक्तांना कसा सुलभ झाला होता याचें वर्णन २९६ पासून ३०२ पर्यंत आलें आहे. यावरून 'देव भावाचा भुकेला' हा या श्लोकांचा इत्यर्थ आहे.

ओंवी २९८—**स्वाहाकार**—देवांना अग्निद्वारें हविर्भाग देण्याकरितां केलेला यज्ञ. **परी**—रीत, तऱ्हा.

ओंवी ३००—**सुलभु**-सुलभ. **देहाद्रिआं**—देहेंद्रिआ.

ओंवी ३०१—**अध्वरीं**—यज्ञांत.

ओंवी ३०२—**तो गोवळ गोळिआंसी**—गवळ्यांना तो आपल्यांपैकींच एक गवळी आहे असें वाटत होतें.

ओंवी ३०३—**विज्ञान**—माया, असा अर्थ घ्यावा.

ओंवी ३०४—**बाइला**—बायका. **पंढिअेताति**—पढियेणें—आवडणें.

ओंवी ३०५-३१५—श्रीकृष्णरूपी वासरांना व गोपाळार्भकांना पाहून गाईंना व गोपींना आवरूं नये असा पान्हा फुटला. त्याचें वर्णन कवीनें आपल्या उत्प्रेक्षांनीं सजविलें असून वासरांच्या रूपानें श्रीकृष्ण प्रत्येकाच्या घरीं वास करीत असल्यामुळें घरोघरीं होत असलेल्या उत्सवाचें वर्णनही बहारीचें केलें आहे.

ओंवी ३०५—**ओरसे**—वोरसे—पान्हा सोडणें. **न धरे**—न आंवरे.

ओंवी ३०६—**दूधपीरू**—दूध पिणारा पूर्वीच्या मराठींत 'रू' प्रत्यय लावून क्रियापदाचीं नामें करीत असत.

**पाहोंनरूं-पाहुणेर**-आतिथ्य. **मज पांतां**—गाईच्या व गोपींच्या पान्ह्यांनीं भरलेली नदी म्हणजे क्षीरसागरच व तो सर्व देखावा आपण पाहतों आहों असें कवीस वाटतें. इंग्रजींतील me-thinks पहा.

ओंवी ३०८—**परगुणें**—पक्वान्नें—पहा—" कां पाहालेन सुयाणें ! जालया परगुणें । पंढियंतें ये पाहुणें । स्वर्गोनियां ॥—ज्ञानदेवी, १४।२१६.

**मादणें**—स्नान असा अर्थ असावा. पहा—" सर्वज्ञा आठादिसा क्षौरूं. चौ दीसा मादनें : "—भावे सारस्वत, पान १००.

ओंवी ३०९—**षडर्षी**-षड्रसीं. प्राकृतांत जोडाक्षराबद्दल साधें अक्षर येतें. **नींवलोण**-दृष्ट काढण्यासाठीं कडू लिंबाचीं पानें, मीठ इ० पदार्थ ओंवाळून टाकणें. **सह्वाणु**—सहवासु असें असावें.

ओंवी ३१०—**क्षीरोदक**-पीतांबर—पहा 'क्षीरोदक नेसविला'—मुक्तेश्वर. आदिपर्व, ययाति आख्यान, अ० १९. **पासवडेआं**-दुहेरी जाड वस्त्र. पहा—" चांदाणिया पासौनि कोंवळा : मृणाल सुतांचा पासवडा घातला "—भास्करकृत, शिशुपालवध. **वीजणें**—वारा घालणें.

ओंवी ३११—**पाहातेआं पाहारां**—पाहाटेच्या पाहऱ्यांत. प्रहर—पाहरा **उपहौंडलें**—पहुडले—निजले हल्लीं आपण 'उ' गाळून टाकतों.

ओंवी ३१३—**चतुर्विधा दंडी**—चार प्रकारचे छंद किंवा तंतुवाद्यें.

**सुहावीं**–आवडीनें. पहा–ज्ञानदेवी, १५।६८. **नागारां**–नगरात राहणारे लोक. पहा–" गोसावी श्रीमंता श्रीकरीं, नागरापरी गुळणा करीती "–भावे –देवव्यासकृत पूजा ( अवसर ). **जाणाचा**–ज्ञानाचा.

ओंवी ३१५—**मंगलेच्यारु**–मंगलेच्चारु. प्राकृतांत 'च्च'बद्दल 'च्य' लिहितात.

आतां श्रीकृष्ण बलरामाबरोबर नित्याप्रमाणें वांसरें चारण्यास वृंदावनास जातात.

ओंवी ३१७—**खीरारीं**–गवळी.

ओंवी ३१९—**माडांची**–मातांची.

ओंवी ३२०—**बंबाळैलिआ न संवरेति**–मोठ्यानें ओरडून ध्वनि केला तरी त्या आवरत नव्हत्या. **संवरेति**–सावरणें, आवरणें. त्या धेनू जणुं काय ईश्वराच्या शक्तिच होत्या, कारण ईश्वराची शक्तिदेखील आवरणें शक्य नाहीं.

ओंवी ३२१—**आघाडा**–अर्धकडा या संस्कृत शब्दापासून झाला असावा.

ओंवी ३२२—त्या गाईचें व गोपांचें प्रेम म्हणजे एक दुधानें भरलेली आनंदरूपी सागरास मिळणारी नदी, किंवा ती वांसरांवर व अर्भकांवर वर्षाव करणारी मेघवृष्टिच होती.

ओंवी ३२३—किंवा तें प्रेम म्हणजे एक साधूचें मन किंवा ती दहा उपनिषदांर्गत श्रुतिचं किंवा शंकरादिकांची मूर्तिच होती.

**पाळांति**–टेहळणी करतात.

ओंवी ३२४—गोवर्धन पर्वत उतरतांना गडबडीनें येणाऱ्या गाई मनाला कशा भासल्या ? जणुं काय त्या श्रीकृष्णाच्या छंदानें आकाशांतून देवांगनाच उतरत होत्या. **धापसिया**–धापा टाकणाऱ्या, अर्थात् गडबडीनें जाणाऱ्या. पहा–" जा तुम्हीं एकी धापसिया : तुम्हा लागलिया गोमाशिया " –भावेकृत सारस्वत पान ८८. **पढिअसल्यां**–प्रतिभासल्या, ओ. १७१.

**वारौनि**–वरून. **अंतराळ**–आकाश.

ओंवी ३२५—**सहस्रवदनु**–शेष. त्याला शंभर तोंडें आहेत असें मानलें आहे.

ओंवी ३२६—**जाणी**—ज्ञानी. **धातु आदिकरौनि**--गैरिक धातु, पिवडी काव इत्यादि. **ओळतांती**—पाझरतात.

ओंवी ३२७—**स्तनधान**—स्तनदान. **न सावरे**—आवरत नाहीं.

ओंवी ३३०—**आलिंगण**—आलिंगन. **भोवतीं** नीवती असें असावें.

ओंवी ३३१—न समजतां जर अमृतपान घडलें तर मनुष्यांना अमरपण प्राप्त होतें. त्याचप्रमाणें येथें श्रीकृष्णरूपी परब्रह्मानेंच आपल्या पुत्रांचीं रूपें घेतलीं आहेत हें न जाणून गोपींनीं जे पुत्रस्वरूपी परब्रह्माला आलिंगन दिलें त्यानें त्यांना निर्वाणसुख प्राप्त झालें. **निर्वाण**-मोक्ष. पहा—" स्थित्वा-स्यामंतकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति । "—भगवद्गीता. **ब्रह्मनिर्वाण**—ब्रह्मा-मध्यें मिळून जाण्याचा मोक्ष.—गीतारहस्य.

ओंवी ३३२—सगुणोपासनेचें महत्त्व वर्णिलें आहे.

ओंवी ३३३—**रांम**—बलराम. श्रीकृष्णाचा वडील भाऊ.

ओंवी ३३५—**एणें मुखामाजीं दाविलें त्रिभुवन**—यशोदेनें लहानपणीं माती खाल्ली म्हणून हात बांधून तोंड उघडण्यास सांगितलें असतां श्री-कृष्णांनीं तिला आपल्या मुखांत त्रिभुवन दाखविलें, ती कथा येथें उल्लेखिली आहे. **शोखण**—शोषण.

ओंवी ३३६—**अर्जुनाचे वृक्ष मोडिले**-नित्याप्रमाणें श्रीकृष्णाला उखळाला बांधून यशोदा कामास निघून गेल्यावर श्रीकृष्ण तें उखळ ओढीत जवळच असलेल्या दोन अर्जुन वृक्षासन्निध गेला. श्रीकृष्णाचा स्पर्श होतांच ते वृक्ष मोडून खालीं पडले. कारण ते अर्जुनवृक्ष म्हणजे नारदशापानें वृक्ष झालेले कुबेरपुत्र होते. अशा प्रकारें त्यांचा उद्धार झाला.

**दिव्यपुरुष**—दोन कुबेरपुत्र, जे त्या मोडून पडलेल्या वृक्षापासून प्रकट झाले.

ओंवी ३३८—प्रकृति व पुरुष यांच्या साहचर्यानें सर्व संसाराची उत्पत्ति होते. तोच पुरुष प्रकृतीपासून निराळा झाला असतां संसारबंधाचा नाश होतो. **आर्ती**—आर्ति—पीडा.

ओंवी ३३९—**पाळाइलें**—टेहळून पाहिलें. पहा—पाळांति—ओंवी ३२३. **द्वितीयार्ध**—त्या वेळीं सर्वच वत्स व गोपाळ मूर्तिमंत ब्रह्मस्वरूप भासलीं. कारण श्रीकृष्णानें त्या सर्वांचें रूप घेतलें होतें व खरें वत्स-गोपाळ ब्रह्मदेवानें हरण करून नेलें होतें.

ओंवी ३४१—**ब्रह्मां अपमानिला**-नानारूपें धारण करणाऱ्या एकाच शक्तीनें तूं ब्रह्माचा गर्व हरण करून, त्याला खालीं पाहावयास लाविलें आहेस.

ओंवी ३४५—**से**–स्मरण, आठवण. पहा–" म्हणोनि यथा वारवाणा–। पासीं से आली चौगुणा । ना म्हणों नये देखणा । होसी ज्ञानी ॥

—ज्ञानदेवी, १३।६४६.

ओंवी ३४६—**संवत्सर**–साठ वर्षांचा एक विभाग. आपण वासरांचें हरण केल्यानंतर त्याचा काय परिणाम झाला हें पाहावयास ब्रह्मदेव येतो.

ओंवी ३४७—**विवरों**–स्पष्टीकरण करूं लागला.

ओंवी ३४८—ब्रह्मदेवाला ईश्वराचा महिमा कळला नाहीं. ज्यानें सर्व त्रिभुवनाला आनंद दिला तोच त्याच्या व्याकुळपणाला कारण होईल हें कसें घडेल? वांसरें नेल्यावर सर्व गोकुळ व स्वतः श्रीकृष्ण हवालदील झाले असतील अशी ब्रह्मदेवाची कल्पना होती पण ती निराधार होती.

ओंवी ३४९—**असासित**–अशासित–निरर्गल. पहा–" एसें बोलोनि असासीत । पाठी धाविन्नली आक्रंदत । "—मानभावपंथीय भास्करकवि-

सारस्वत पान ९१.

ओंवी ३५०—ब्रह्मदेवांचें स्वगत भाषण येथून सुरू होतें. वांसरांचें हरण झालेलें पाहून श्रीकृष्ण गप्प बसले हें पाहून त्याला आश्चर्य वाटलें. ज्यानें पूर्वीं मोठमोठे राक्षस मारून पराक्रम केला त्याचा तो पराक्रम, अभिमान व सामर्थ्य आज लयाला गेलें किंवा काय अशी ब्रह्मदेवाच्या मनांत शंका आली. श्रीकृष्णानें मनुष्यरूप धारण करून पृथ्वीवर अवतार घेतल्या-कारणानें तो कदाचित् वांसरांची मुक्तता करण्यास आपल्या सत्यलोकाला यावयास भ्याला अशीही कोती कल्पना ब्रह्मदेवास आल्यावांचून राहिली नाहीं.

**चोरशंख**–एका दैत्याचें नांव. यानें देवांना जिंकून वेद चोरले व समुद्राच्या तळाला नेऊन ठेवले. तेथून ते विष्णूनें मत्स्यावतार घेऊन परत आणले.

**हिरण्याक्ष**–हा हिरण्यकशिपूचा भाऊ असून, त्यानें पृथ्वीस समुद्रतळाला नेली. तेथून विष्णूनें वराहावतार घेऊन तिला वर आणली. पहा—महा-भागवत स्कंध ३ अ० ३-१३.

ओंवी ३५१—**अवक्रियें**–अपमानास.

ओंवी ३५२—**बिहाला**–भ्याला.

ओंवी ३५४—**वातांती**–वाजतात. पहा–ओंवी ८४.

ओंवी ३५५—ब्रह्मदेवास गोपाळ व वासरें श्रीकृष्णाचें भजन करीत असलेलीं गोकुळांत दिसलीं.

ओंवी ३५६—आपण मर्त्यलोकास आल्यावर श्रीकृष्णानें तीं वासरें नकळत इकडे आणलीं असतील म्हणून ज्ञानदृष्टीनें पाहूं जातां तीं ब्रह्मदेवास आपल्या सत्यलोकांत दिसून आलीं.

ओंवी ३५७—पुनः त्यानें पृथ्वीवरील गोकुळांत दृष्टि फेंकतांच त्याला तीं वासरें व ते गोपाळ श्रीकृष्णासह असलेले आढळून आले. ब्रह्मदेवास गोपाळ व वासरें, दोन्ही ठिकाणीं श्रीकृष्णांनीं आपल्या विज्ञानशक्तीनें दाखविलीं. **निरोपमु**–निरुपमु असें असावें.

ओंवी ३५९—ब्रह्मदेवास आणखी विशेष असें दिसून आलें कीं, सर्वच गोपाळ चतुर्भुज व शंखचक्रादि आयुधांनीं युक्त असे आहेत. सारांश, सर्वच कृष्णरूप दिसूं लागले.

ओंवी ३६०—**खेवनी**-कोंदण. ( मागें पहा.) **मिरवणी**–थाट, शोभा.

ओंवी ३६१—**पाटवर्धन**–अधिकार पदवी वाढविणारे.

**श्रीवत्सलंछन**–विष्णूच्या छातीवर शंकरांनीं खूण केली त्यापासून श्रीवत्स असें नांव पडलें. **आधवे**–आघवे.

ओंवी ३६२–३६४—आणखी एक चमत्कार झाला. विस्मित होऊन ब्रह्मदेव पहिल्या चमत्काराबद्दल मनाशीं निर्णय करतो, इतक्यांत प्रत्येक गोपाळाजवळ एक एक ब्रह्मदेव असा प्रकार त्यास दिसून आला. सर्व तत्त्वें, सर्व शक्ति, सर्व देवता, समुद्र, कुलपर्वत इत्यादि त्याला मूर्तस्वरूपांत प्रत्येकाच्या परिवारासह तेथें दिसले.

ओंवी २६४—**सकलसव्हान**–सकलसवाहन.सर्व आपल्या वाहनासहित.

ओंवी ३६६—**व्हेळीं**-वेळीं. **थोरे**–थोडे. **विसुर असें**–असे दोन शब्द असावे. **दाखाळा**-दाखला. या शब्दाबद्दल शंका वाटते.

ओंवी ३६८—**नारायणुनाभिकमळीं**–असा एक समास पाहिजे. **कूकें**–ओरडे.

* *

ओंवी ३७०—**साटकेचे**–हाटकाचे–सोन्याचें. **अग्निस्तंभन**–अग्नि-स्थायी करणें.

ओंवी ३७२—**रोमकूप**–शरीराच्या कातडीचें रंध्र. **एकीकडी**–एकीकडे.

ओंवी ३७३—ईश्वराची–श्रीकृष्णाची–करणी समजून घेण्याकरितां ब्रह्म-देव जातीनें मृत्युलोकास आला ! आपण ईश्वराचे बालक, म्हणून सुखानें सत्यलोकांत रहावयाचें नव्हतें ! एवढा उपद्व्याप कशाला पाहिजे होता ?

ओंवी ३७७—नारद गोकुळास येऊन तो श्रीकृष्णाची भेट घेतो.

ओंवी ३७८—नारद श्रीकृष्णास म्हणतात, " माझ्या वडिलांकडे ( ब्रह्मदेवाकडे ) पाहिलें तर ते मोठ्या भ्रांतींत पडले आहेत. तर हे सर्वज्ञ-नाथ श्रीकृष्णा, याचा दोष कोणाकडे याचा विचार तूंच कर." **वळां**–(तृ०).

ओंवी ३७९—**मशंका**–मशका - घुंगुरटें. **ताराण**–तारुण्य–ज्वानी. पहा–त्राण, सत्त्व.

ओंवी ३८०—**राउळीची**–श्रीकृष्णाच्या मंदिराची. **उपसाहावा**–क्षमा करावी. **पूर्वधरी**–पूर्वापार चालत आलेला.

ओंवी ३८१—**म्हातारपणें भूलैला**–ब्रह्मदेवाला म्हातारचळ लागला.

ओंवी ३८२—**वाओ**–मिथ्या.—ज्ञानदेवी, ८।२४८ **साचु**–सत्य. ( सत्य - सच्च–साच - साचु ).

ओंवी ३८४—**आरोगित**–भोजन करीत.

ओंवी ३८५—ओंवी २१३ पहा. **फडतरीं**–शब्द कोठेंही निघत नाहीं. फडकें किंवा पान असा अर्थ घ्यावा.

ओंवी ३८६—ब्रह्मदेव श्रीकृष्णाजवळ येऊन अत्यंत विनयानें आपलें शिर खालीं नमवून दोन हात जोडून त्यांस विनंती करतो.

ओंवी ३८८—**केसनी**–केवढीं. पहा—'तेसणी'. ओंवी १०४. **सरी**–बरोबरी. **परी**–तऱ्हा.

ओंवी ३८९—**खगपती**–गरुड. **विरूळे आं**–विरोळ्यास–विरोळा–एक प्रकारचा पाण्यांतील साप. **शेखेंसीं**–शेपेंसीं–सहार्थीं तृतीया. **सरीसीं**–सरशी, श्रेष्ठत्व.

ओंवी ३९०—**बिरुदावली**–ब्रीदावळी.

ओंवी ३९१—**जीतीं**–जगतात.

ओंवी ३९२—**सांघे**-सांग.

ओंवी ३९३—**भूतांग्रामांते**-भूतांच्या समुदायास. संस्कृतप्रमाणें येथें नामाप्रमाणेंच त्यांच्या विशेषणांची विभक्ति कायम ठेविली आहे. नाहीं तर " चतुर्विध भूतग्रामांते " असें चाललें असतें. **संवरितें**-सांवरीते, धारण करितें.

ओंवी ३९४—**मयाळु**-मायाळु.

ओंवी ३९५—**आनिमित्य**-आनिमित्त.

ओंवी ३९७—**नेदितासीं**-न देतासीं.

ओंवी ४००—**कुढावा**-रक्षण.

ओंवी ४०४—**दोषें**-अपराधानें.

ओंवी ४०५—गुणयुक्त परमाणुदेखील तारक होतात. किंवा तारणारे परमाणु पुष्कळ सांगतां येतील.

ओंवी ४०६—**जो भूलविला एकीशक्ती**-ओंवी ३४१ पहा.

ओंवी ४०७—**कोंडिसवाणे**-मनोहर.

ओंवी ४१०—**परमार्ग**-मोक्षमार्ग.

ओंवी ४१३—**रीगावा**-शिरकाव.

ओंवी ४१४—त्रिगुणात्मक जड प्रकृति व सचेतन पुरुष यांची जोडी जमली म्हणजे सृष्टींतील कर्में सुरू होऊं लागतात; पण ज्या दिवशीं प्रकृति वेगळी व पुरुष वेगळा असें पुरुषास ज्ञान होतें त्या दिवशीं तो प्रकृतीच्या या खेळापासून मुक्त होतो. परमपुरुषास न जाणतां जे प्रकृतीपासून वेगळे होत नाहींत ते सृष्टिनियमानुसार जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतात. मग मोक्ष कुठला ?

ओंवी ४१६—अगोदर माणसाला त्रिगुणात्मक प्रकृतीची आवड, त्यांत आणखी त्याला वरून गोड ( पण परिणामीं कटु ) अशीं फलें ऐकावयास मिळालीं म्हणजे, त्याचे जन्म दुप्पट होतात व त्याचा जीव जन्ममरणाच्या चक्रांत सांपडतो.

ओंवी ४१७—येथून केवळ कर्ममार्गी लोकांची निंदा सुरू होते. जे कर्ममार्गाचेच केवळ अवलंबन करतात ते जणुं काय लवसानेंच आपणास बंधनांत अडकवून घेतात. वीतराग ( सर्वसंगपरित्यागी ) लोकांनीं जो

त्रिगुणात्मक प्रकृतीचा त्याग केला आहे तो त्यांच्या ( कर्ममार्गी लोकांच्या ) मतें मोठाच प्रमाद होय. अशाच प्रकारच्या कर्मकांडनिंदेकरितां पहा—भगवद्गीता, २।४२–४६.

ओंवी ४१९—**तात्रिता**—ताप देणारा.

ओंवी ४२१—**वरगणे**—वांटणींत.

ओंवी ४२३—**वटे**—घटे असें असावें—घडे. येथून कृष्णभक्तीचा व संतसंगाचा महिमा सांगितला आहे.

ओंवी ४२५—**हाकारिला**—हाकारणें—हाक मारणें.

ओंवी ४२८—**लीळां**—( तृ० )

ओंवी ४३३—**हुंबर-गळां**—दोन निरनिराळे शब्द असावे. **हुंबर**—(?)—लोडणें. **हातखोडा**—गुन्हेगाराचे हात अडकविण्याकरितां केलेली लांकडाची चौकट. **सांखळा**—शृंखला.

ओंवी ४३४—**त्रिचंबिले**—श्रम पावले. पहा—ज्ञानदेवी, ६।४९.

ओंवी ४३५—**बडलीजतांती**—बुडलीजतांती असें असावें.—बुडले जातात.

ओंवी ४३७—**तूं एक वाचौनि**—येथेंदेखील 'वाचौनि' याच्यामागें प्रथमाच आहे.

ओंवी ४३८—**बांदोडी**—बंदीवास.

ओंवी ४४०—**बादिअें**—बंदिए-बंदीजन.

ओंवी ४४३—**अवते**—स्रवलें. **ब्रह्मकटाह**—ब्रह्माण्ड. **वेन्ही**—पर्यंत.

ओंवी ४४४—**वेधवेली**—वेदवेली-वेदरूपी वेली. **झाडोली**—झाडोरा, दाट झाडी.

ओंवी ४४५—विषयरूपी तृणांनीं परब्रह्माचा मार्ग झांकून गेलेला आहे व इंद्रियरूपी हरीण चवताळलें असून त्यांचा रोध केला असतां ते प्राणाप्रमाणें कोणालाच आवरत नाहींत.

ओंवी ४४६—**भद्रजाती**—हत्ती. पहा—ज्ञानदेवी, ११३३.

**लाहासी**—ल्हासी.

ओंवी ४४७—**डोडपणें**—दोडपणें—द्वाडपणें. **जागतें**—जागृत असणारे.

ओंवी ४४८—**काळवपें**—काळोख. **पडतां**—पडत—आकार वृत्तसुखार्थ.

ओंवी ४४९—**घेरणी**–घेरणें किंवा हेरणीं न्याहाळणें. **डंकिती**–डंखणें, –दंश करणें. **धुधुवातातीं**–धुधुवणें–फुत्कार टाकणें. पहा–ज्ञानदेवी, १८।७१२.

ओंवी ४५०—**'प्रियाप्रिये वश जालीं'**–अशीं तीन तुटक पदें असावीं.

ओंवी ४५१—**भीतरील**–आंतील. **आटवी**–अरण्य.

ओंवी ४५३—**नव्हाळी** प्राप्ति. पहा—ज्ञानदेवी, ४।१५८. "तुझी जाहालिया नव्हाळी ॥ करिसी अज्ञान कंडोळी" कथा कल्प०. १।१.

ओंवी ४५४—**विगवावे**–विनवावें.

ओंवी ४५६—**झाडां जालीं वंद्यपणें**–झाडांना देखील वंद्यपणा आला.

ओंवी ४५७—**वेधवती**–वेदवती–पृथ्वी. किंवा वेधवती–चित्तवेधक.

ओंवी ४५९—'विष दानु देती' अशीं तीन निराळीं पदें असावीं. **देती**–देणारी.

ओंवी ४६०—**काक बकत्तृणावर्त**–राक्षसविशेष. **रुखु मोडिले** इ० ३३६ ओंवीवरील टीप पहा.

ओंवी ४६३—**केशि**–राक्षसविशेष. **चाणूर मुष्टिक**–कंसाच्या पदरचे कृष्ण हननाकरितां ठेवलेले राक्षस पहिलवान.

ओंवी ४६७ पासून ४७६ पर्यंत ब्रह्मदेव श्रीकृष्णाची स्तुति करीत आहे.

ओंवी ४७५—**कवलनअेना**–कमलनयना.

ओंवी ४७७—**मानवला** मानवणें–मान डोलावणें, मान्य करणें. पहा—ज्ञानदेवी, १८।८७१.

**नाभीकारू**–नाभिकार भिऊं नको असें म्हणणें, अभय. पहा–"दैविकी उदारवाचा। जैं उद्देश दे नाभिकाराचा। तैं नवरसद्वीपींचा। थाऊ लाभे ॥" —ज्ञानदेवी, १०।७. **क्षेणा**–क्षणा.

ओंवी ४७८—**आलखती**–अलक्ष्य–अदृश्य. **उगानिलीं**–उगाणणें–झाडून एकंदर सांगणें. पहा–ज्ञानदेवी, १६।४१. "नाणी कांहीं मना। करुनि पापाचा उगाणा ॥" तुकाराम अभंग. **अमृतें**–वासरांचें विशेषण आहे.

ओंवी ४८२—**सुखलभू**–सुखलभ्य–सुखेन लभ्यः.

ओंवी ४८३—**नात्रती**–नीव्रती असें असावें.

ओंवी ४८४—ब्रह्मदेव श्रीकृष्णास दंडवत्–साष्टांग नमस्कार घालतो.

ओंवी ४८५—**मी असैनु श्रीकृष्ण तुझा होता**–यापुढें मी तुझा झालेला असा राहीन.

ओंवी ४८७— **चरुतें**–चरत. 'उकार' पादपूरक आहे हें मागें सांगितलेंच आहे.

ओंवी ४८८—**सुसंदछंदें**–सुशब्द छंदे. **बीजें**–गमन. पहा–" तिजेंकडोनी येतुसे वारा । देखौनि धांवे सामोरा । आडपडे म्हणे घरा । बीयें कीजो ॥—ज्ञानदेवी, १३।३७६. " म्हणे उसणें आणितें मेळवूनि । करावें बिजें शीघ्र आतां पतींनीं । "—कचेश्वरकृत सुदाम चरित्र, श्लोक.

ओंवी ४९१—**गाईजतुसे**–गाइलें जातें.

ओंवी ४९७—**व्रत-दाने**–व्रतें दानें. **पवतो**–पावती.

ओंवी २९९—योगशास्त्रामध्यें कांहीं शिरांचा कोंडमारा करतात असें ऐकण्यांत येतें, पण तो योगनिरोध केल्यावरच त्याला फल मिळतें. या श्रीकृष्णचरित्राच्या श्रवणानें मात्र परमपुरुषाची भक्ति घडते. तुलनेकरितां पहा.

" वितरत्यभिवांछितं दृशा, परिदृष्टः किलकल्पपादपः ।
हृदये स्मृत एव धीमते नमतेऽभीष्टफलप्रदो भवान् ॥ "

—उपमन्युकृत शिवस्तुतिः ।

हीं श्रीकृष्णचरित्रश्रवणाची फलश्रुति सांगितली आहे.

**श्रीकृष्णार्पणमस्तु ।**

परिशिष्ट पहिलें

# 'वच्छ-हरणां'तील कठीण शब्दांचा कोश

### अ

अर्धांग–स्त्री
अवदीप्ती–तेज, ज्ञान
आखर–गांवाजवळची जमीन
आंगवण–शक्ति
आथी–आहे
आंतौरे–स्त्रिया
आंदोळणें–झोंके घेणें
आपणवे–आपल्या आपण
आरु–आवार
आरोगन–भोजन
आलखती–अलक्ष्य
ओडवणें–पुढें होणें-करणें, प्राप्त होणें
ओतवरा–भर
ओळगणें–आश्रय करणें

### उ

उगाणणें–झाडून सांगणें
उपसाहणें–क्षमा करणें
उपहौडले–निजले

### क

कामारी–काम करणारे चाकर
किडरु साप
किळ प्रभा
कुढावा–रक्षण

### ग

गुण–कापसाची वात

### च

चोखाळणें–निर्मळ होणें

### ज

जाउपें–आवळें जावळें मूल

### त

तडवा–तळहात
तरणी–सूर्य
तृणचरे–बांसरें
तेसनी–तेवढी
तोकडे–अल्प

### द

दी–दिवस
देखोवेखीं–पाहतां पाहतां

### ध

धमनी–नाडी
धातु–गेरु, काव इ०

### न

नवाळी–प्राप्ति
निधान–भूमिगत द्रव्य
निरवधि–अमर्याद
निरालंब–निराश्रय
निरौते–निश्चयात्मक

निऱ्हा–अगदीं, केवळ
निवाड–निवड
निशानी–रणभेरी, डंका
नेटकें-सुंदर

**प**

पडिसाद–प्रतिशब्द
पढिअें–आवडतें
पडिआसलें–प्रतिभासलें
परगुणें–पक्वान्नें
परिअे–झोंके
परिहार–निरसन
पवाडे–कीर्ति
पसाएदान–प्रसाद देणें
पाईकपण–सेवा
पाजातिक–पारिजातक
पांती–पाहती
पांतीकर-पंक्तीस बसणारा
पाळक-पाळणा
पाळांती-न्याहाळती

**ब**

बाउली-टिकली, चित्र, मूर्ति
बीज–गमन
ब्रीद–बहाणा

**भ**

भोगावती–पाताळगंगा

**म**

मातु–गोष्ट
मोकारा–मोकळीक
मोहरी–पुंगी

**र**

रसना–जीभ
रोंवणे–ओरडणें

**व**

वच–जाणें
वडप–वृष्टि
वरिपडे–प्राप्त
वस्तु–भूमिगत द्रव्य
वाणावे–वर्णावें
विरुळा पाणसर्प
वरिगुंठी–वीरानें बांधलेली केसाची गांठ.
वेताटी–छडी
वेधें–छंदानें

**श**

शेखीं–शेवटीं

**स**

संवरणें–सावरणें
साउमें–सामोरे
साचु–खरें
सुहाव–आवड
से-स्मरण
सोवाण–सोपान

**ह**

हमामा–एक खेळ
हातिरु–हत्ती
हुंबली–हमामा

परिशिष्ट २ रें

# 'वच्छ-हरणा'च्या भाषेस लागू पडणारे भाषाशास्त्राचे सामान्य नियम

(१) यकारांत व हकारांत विरहित अकारांत नामें अथवा विशेषणें उकारांत होतात. उदा०–परिहारु (८),दूषणु (९), अखंडितु (२५), सुरवाडु (२६४).

(२) ष किंवा क्षच्याऐवजीं ख येतें. उदा०–संतोखती (२४), मनुष्यवेखें (६३), पाखरां (१८६), हर्खु (११३).

(३) ज्या शब्दांत रेफयुक्त ष आहे, त्यांतील षबद्दल ख होऊन रेफाबद्दल त्याच्यामागें रि किंवा री येते. उदा०–आर्ष–आरिख (१७).

(४) ऋ चा अ, इ, उ होतो. उदा०–ऋजुकारे–रुजुकारे (१५१), बृहत्–ब्रहत (२८३), दृष्टी–दिर्शी (११), वंदावनमार्गीं (९२).

(५) प् ज्या वेळीं शब्दाच्या आरंभीं नसेल तेव्हां त्याचें व होतें. उदा०–आमणवे (९३), सोवाणी (१४५).

(६) संस्कृतांतील 'प्रति'करितां पाढि किंवा पडि येतें. उदा०–पाढि-आसलें (१७१), पडिसाद (३५४).

(७) शब्दांच्या आरंभीं ट नसतां त्याचें ड होतें. उदा०–पाडळ (१५६), कोडी (३७२), नीडे (२०३).

(८) शब्दारंभीं न नसतां त्याचें ण होतें. उदा०–माणिजे (२९१), गोपांगणा (३३).

(९) श, ष, बद्दल स येतें. उदा०–दोसें (१३३), जसोदा (५२), सिंग (७०), असासित (३४९).

(१०) त्य चा च होतो व च बद्दल च्य येतें. उदा०–साचु (२४७), मंगलोच्यारु ( ३१५ ).

(११) ज्या दोन व्यंजनांचें एक जोडाक्षर होतें, त्यांपैकीं एकांत किंवा दोन्हींत मध्येंच स्वर येऊन मिसळतो. उदा०—ब्रीद—विरुद (१७५), उष्टें—उसिटे (२५३), त्राण—ताराण (३७९), जीवन्मुक्त—जीवनमुक्त (२७२).

(१२) जोडाक्षराकरितां साधें अक्षर येतें; व असें होतांना जोडाक्षरामागें असणारा वर्ण दीर्घ होतो. उदा०—प्राजक्तिक—पाजतिक (१३८), प्रसाददान—पसाअेदान (३१४), कर्मकारी—कामारी (२७८), पंक्तिकरी—पांतिकरी (२११).

---

REFBK-0003448

REFBK-0003448

# शुद्धिपत्र

## मूळग्रंथ

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | २१ | हो औनि | होऔनि |
| ,, | २६ | प्रसंगु | अतिप्रसंगु |
| ६ | २० | आला | आली |
| ७ | २४ | तिंतूरवाउली | तिंतुरवाउली |
| १५ | ११ | झाकोळतेंआं | झाकोळलेआं |
| १७ | ८ | वाणीर्ति | वाणीतिं |
| १९ | ११ | एककीं | एकैकीं |
| २२ | २२ | देशशाया | देशसाया |
| २३ | २४ | लकुरुवें | लेकुरुवें |
| ,, | २६ | जेवण | जेवन |
| २४ | २५ | नींब लोणु | नींब-लोणु |
| ,, | २६ | वीडां | वीडा |
| २६ | ६ | तें सहस्रवदनु | सहस्रवदनु |
| २७ | १५ | लागेला | लागेला |
| २८ | २६ | देखिअले | देखिअलें |
| ३२ | २१ | आत्मतत्त्वु | आत्मतत्वु |
| ३६ | २४ | गोषी | गोषीं |

## टीपा व स्पष्टीकरण

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३ | १८ | भाक्ति | भक्तीं |
| ,, | २० | बोल | बोलु |
| ६ | २६ | विधान | निधान |
| ७ | २८ | आतप्रसंग | अतिप्रसंगु |
| ८ | २७ | मिळाल | मिनले |

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| | १८ | ॐड तुतु | ॐडवतु |
| ,, | २० | पवाद | पवाडे |
| ११ | ११ | अघासूर | अघासुर |
| १३ | १७ | कोपलेल्यां | कोपलेआं |
| १४ | २१ | प्रत्यय | प्रत्यय लागून, |
| १५ | ५ | फलपुष्परस | फलपुष्परसु |
| १६ | ९ | मधुकावडिआं | मधुकाकडिआ |
| ,, | २६ | आश्रमवर्णाची | आश्रमवर्णनाची |
| ,, | २६ | मुसृज्य | मुत्सृज्य |
| ,, | २७ | क्षीरघारमा | क्षीरधारमा |
| १९ | ११ | वंधांतील | वधांतील |
| २० | ५ | शंपुट | संपुट |
| २१ | २८ | संमदत्रैर्यावाभूमि | संपदत्रैर्यावाभूमी |
| २३ | १ | रंगेला | रंगिला |
| ,, | ९ | परिवंटा | परिवटां |
| ,, | २४ | ‘ ts | ’ ts |
| २४ | १४ | मातुत | मातुतें |
| २६ | २४ | श्रीक्रुण | श्रीकृष्ण |
| २७ | २ | भांगीरा | भांगारी |
| ३० | १९ | शंकरादिकांची मूर्तिच होती | सामवेदादिकांच्या मूर्तिच होत्या |
| ,, | २५ | पढि असल्यां | पढिआसलिआं |
| ३१ | २७ | भासलीं | भासले |
| ,, | २९ | नेलें होतें | नेले होते |
| ३७ | १८ | कवलनअेना | कमलनअेना |
| ३८ | ७ | वीये | वीजें |
| ,, | १२ | २९९ | ४९९ |